३६०

म. ग्रं. सं. ठाणे

विषय चरित्र

सं. क्र. ३६०

१८२९
१८८
१९०३

ज्ञान
१९०३

REFBK-0000124

॥ श्रीः ॥

# श्रीशुकचरित्र.

हा ग्रंथ

असं ज ल

विष्णु वा[illegible]कडे लक्ष्य दि[illegible]

[illegible]रचे ग्रंथ म[illegible]

( [illegible]तश्लोकीविवरण, अपरोक्षानुभूतिविवरण, पंचदशी-

विवरण इत्यादि ग्रंथांचे कर्ते )

यांनी लिहिला

[illegible] ग्रंथालय ठाणे
दा. क्र. १२४
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

वाई येथें मोदवृत्त छापखान्यांत छापून प्रसिद्ध

REFBK-0000124

आवृत्ति

१९०३

किंमत ८ आणे.

( ग्रंथकारानें या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क राखून ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

परमपूज्य शुकाचार्यांचें चरित्र ज्या हृदयस्थ नियंत्याच्या अप्रतिम कृपेमुळें मला लिहिण्याची स्फूर्ति झाली, त्याला अति विनयानें प्रणाम करणें हें माझें आद्य कर्तव्य आहे, असें मी समजतों. ' निरतिशयसामर्थ्यवान् ईश्वर मुक्यालाही बृहस्पति करितो ' असें जें ह्मणतात त्याचा, माझ्या स्थितीकडे व संस्काराकडे लक्ष्य दिलें कीं, कांहींसा अनुभव येतो. अशाप्रकारचे ग्रंथ माझ्यासारख्या अप्रबुद्धांच्या हातून शेवटास जाणें हें एक ईश्वरी लीलेचेंच द्योतक आहे.

देवीभागवतांतील श्रीशुकांचें आख्यान वाचल्यावर तें सोप्या मराठी भाषेंत लिहून महाराष्ट्रांतील स्त्रीपुरुषांना अर्पण करावें अशी एके दिवशीं मला सहज इच्छा झाली. तिचा बुद्धीवर परिणाम होऊन तिनें माझ्या जड इंद्रियांना प्रेरणा केली व त्यांनीं तिच्या आज्ञेप्रमाणेंच संस्काररूपानें अंतःकरणांत राहिलेलें हें चरित्र जड अक्षरांनीं व्यक्त केलें. पूज्य पुरुषांचें वर्णन केल्यानें बुद्धीचे दोष नष्ट होत असतात, असें पुष्कळ ठिकाणीं सांगितलेलें आहे. त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवून मी केवळ स्वार्थाकरितां या कृत्यास प्रवृत्त झालों आहें. शिवाय आजकाल लोकांची प्रवृत्तिच अशी झाली आहे कीं, त्यांना कथापुराणश्रवण करण्यापेक्षां गद्यात्मक ग्रंथ वाचणें अधिक आवडतें.

पुराणाला क्षणभर जाऊन बसण्यापेक्षां एकादें व्याख्यान ऐकण्याकडे त्यांची प्रवृत्ति अधिक होते. हा जरी केवळ कालमहिमा आहे तरी त्याच्या अनुरोधानें वागल्यावांचून व्यवहारांत तरी गत्यंतर नाहीं.

शुक्राचार्यांचें पुराणांत जेवढें आख्यान आहे तेवढेंच येथें देण्याचा मूळ संकल्प होता. पण सांप्रतकाळीं बहुतेक मराठी वाचकांचा कादंबऱ्या व नाटकें वाचण्याकडेच विशेष ओढा असल्याचें मनांत आल्यामुळें या चरित्रांत केवल पुराणोक्त कथाभागावरच भिस्त न ठेवतां मी कादंबरीच्या पद्धतीवर त्यांत शक्य तितकी रमणीयता आणली आहे. ह्मणजेच शाकुंतलाप्रमाणें किंवा विक्रमोर्वशीयाप्रमाणें यामध्यें मूळ कथेचा आधार मात्र घेऊन ठिकठिकाणीं श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माचें यथाशास्त्र प्रतिपादन केलेलें आहे. शास्त्रांशीं विरोध न येईल अशाप्रकारें वर्णन करण्याचा जरी मीं शक्य तितका प्रयत्न केला आहे, तरी माझ्या अज्ञानामुळें त्यांतही असंख्य दोष राहिले असतील हें मी जाणून आहें. पण प्रेमळ वाचक दोषांचें निरीक्षण करून ते मला निर्भीडपणें कळवितील अशी मी आशा करून आहें. दोष दाखविल्यावांचून मला समजणार नाहींत. कारण, कोणत्याही प्राण्याला त्याची कृति निर्दोषच वाटत असते.

मनोरंजन व धर्मज्ञान व्हावें; ईश्वराविषयीं शुद्ध भक्ति वाढावी; उन्मार्गापासून लोकांनीं निवृत्त व्हावें; व्यक्तीचें, राष्ट्राचें व समाजाचें हित व्हावें; वर्णाश्रमव्यवस्था अबाधित रहावी; प्रत्येकानें आपापल्या धर्माचें आदरपूर्वक

आचरण करावें व त्यामुळें सर्वांचें ऐहिक व पारलौकिक कल्याण व्हावें हा पुराणांचा मूळ उद्देश आहे. पण विधर्मी लोकांच्या मनसोक्त, कुत्सित व अज्ञानप्रचुर प्रलापामुळें आणि दुरभिमान, अश्रद्धा, पूर्वजांविषयीं तुच्छ बुद्धि व अज्ञान या आमच्या दोषांमुळें तो आजकाल सफल होईनासा झाला आहे. सध्यां प्रत्येक वैदिकधर्मीय पोटाच्या मार्गे लागलेला असून जणुं काय त्याला आपल्या परमपूज्य पूर्वजांनीं आपल्या नित्य कल्याणाकरितां काय तजवीज करून ठेविली आहे हें माहीतच नाहींसें झालें आहे. आपल्या वंशांत उत्पन्न होणारांचें कल्याण व्हावें ह्मणून यथाशक्ति तजवीज करणें हें पूर्वजांचें कर्तव्य आहे व तें त्यांनीं योग्य रीतीनें केलें कीं, त्यांचें काम झालें. पुढें त्या तजविजीचा शहाणपणानें योग्य उपयोग करून घेणें हें पुढील पिढींचें काम आहे. तें जर त्यांनीं न केलें व त्यामुळें त्यांची हानि झाली तर त्याबद्दल पूर्वज अपराधी ठरत नसून त्यांचे वंशज अपराधी ठरत असतात. आमच्या पूज्य पूर्वजांनीं आमच्याकरितां जी व्यवस्था करून ठेविली आहे ती खरोखरच अतिशय शहाणपणानें व मोठ्या कनवाळुपणानें केलेली असल्यामुळें तिचा जरी आह्मीं असंख्य पिढ्या लाभ घेतला तरी ती क्षीण होणार नाहीं किंवा बिघडणार नाहीं अशी आहे. पण एकाद्या दुर्दैवी व व्यसनी कुलदीपकाला जशी वडिलांची व्यवस्था निरुपयोगीं वाटते, तशी ती आह्मांस आज कुचकामाची वाटत आहे; व त्यामुळें त्या उत्तम व्यव-

स्थेचा उपयोग करून घेण्याची आह्मांस बुद्धि होत नाहीं. आमची खरोखरच जर कशानें हानि होत असेल तर ती पूर्वजांविषयीं, त्यांच्या कृतीविषयीं, श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्माविषयीं व वर्णाश्रमाचाराविषयीं व्यक्त होत असलेल्या आमच्या अनादरानेंच होत आहे. या विस्तृत भारतवर्षांत जोंपर्यंत वर्णाश्रमव्यवस्था उत्तम प्रकारें प्रचलित होती तोंपर्यंत आह्मी ऐहिक व पारलौकिक सुखाच्या शिखरावर जाऊन बसलों होतों. पण जसा जसा तिचा आह्मीं अव्हेर करूं लागलों तसे तसे क्रमानेंच खालीं आलों. सांप्रतकालीं जी अवस्था आह्मां वैदिकांना प्राप्त झाली आहे ती तरी अधोगतीची परमावधि आहे असें नाहीं. अजूनही जर आह्मी जागे न झालों तर याच्याही अजून किती खालीं जाऊं याची कल्पना करवत नाहीं. ‘ ज्या प्राण्याला स्वतःविषयीं व स्वतःच्या पूर्वजांविषयीं आदर वाटत नाहीं तो पशु ’ असें एका कवीनें ह्मटलें आहे; व तें अक्षरशः खरें आहे असें मला वाटतें. आह्मी मनुष्याच्या आकाराचे आहोंत; हें निःसंशय आहे. पण मानुष कृत्यें आमच्या हातून होतात कीं नाहीं हा प्रश्न आहे व तीं जर होत नसतील तर आकारानें आह्मी मनुष्य असलों काय व पशु असलों काय सारखेंच! पशूंना धर्म नसतो; पूर्वजांचा अभिमान नसतो; वर्णाश्रमाचार नसतो व शिष्टाचाराचें बंधन नसतें. आह्मीही जर तसेच झालों तर आमचें मनुष्य हें नांव गौण होईल. फार काय पण आह्मांस ‘ पशु ’ हें सुद्धां नांव शोभणार नाहीं.

कारण, ते जरी अज्ञ असले तरी त्यांना स्वजातीचा एक प्रकारें अभिमान असतो व आहारविहारामध्यें ते फार नियमित असतात. पण आमची स्थिति तशी नाहीं. आह्मी थोड्याशा ऐहिक स्वार्थाकरितां हवें तें करण्यास तयार होतों. भर्तृहरींच्या **जातिर्यातु रसातलं** इत्यादि उक्तीप्रमाणें आमची आज अवस्था झाली आहे. शिवाय बकवृत्ति ( दांभिक ) लोक, ही संधि साधून, आह्मांला ह्या हीन स्थितीपासूनही च्युत करूं पहात आहेत. आज हजारों वर्षांपासून चालत आलेल्या शास्त्रोक्त रूढीला अन्यथा ठरवून अगोदरच जमिनदोस्त झालेल्या आह्मां दुर्दैव्यांना ते अधिक परावलंबी करण्याचा दीर्घ प्रयत्न करीत आहेत. खरोखरच ‘ भल्याचा काळ ह्मणजे दुर्जनाचा सुकाळ ’ असें जें ह्मणतात तें खोटें नव्हे. तेव्हां असल्या प्रसंगीं निदान ब्राह्मणांनीं तरी सावध न होणें ह्मणजे सर्व वैदिक धर्माचा नाश करणें होय. एक ब्राह्मण ज्ञाति शास्त्रोक्त रीतीनें धर्माचरण करूं लागली कीं, सर्व वर्णाश्रमव्यवस्था सुस्थित झाली असें निःशंकपणें समजण्यास कांहीं हरकत नाहीं. वैदिक धर्माचा खरोखरच जर कधीं नाश झाला तर त्याचा सर्व दोष ब्राह्मणांकडेच येणार आहे.

इत्यादि सर्व प्रकार ध्यानांत आणून मीं हा प्रयत्न केला आहे. कादंबरीप्रमाणें सामान्यतः करमणूक होऊन त्याबरोबरच वाचकाला श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मांचें ज्ञान

---

१ धर्मशब्दांत नीति, शिष्टाचार, पुण्याचरण इत्यादिकांचा अंतर्भाव होतो.

व्हावें या उद्देशानें मी यापुढें क्रमानें दाशरथि भरत, लक्ष्मण, हनुमान्, अर्जुन, भीष्म, कृष्ण, धर्म इत्यादि पवित्र व पुण्याचरणी पुराणोक्त पुरुषांचीं चरित्रेंही लिहिणार आहें: संकल्प करणें एवढाच मनुष्याचा अधिकार असतो. तो सिद्धीस नेणें सर्वस्वी नियंत्याकडे आहे. ज्या सज्जनांना माझी ही कृति बरी वाटेल त्यांनीं माझ्या वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांची एक एक प्रत घेण्याचें जरी मला आश्वासन दिलें तरी तें मी बहु समजेन.

असो. शुकाचार्यांचें चरित्र निरनिराळ्या पुराणांत निरनिराळ्या प्रकारें वर्णिलेलें आहे. भागवत हें पुराण शुकाचार्यांनीं परीक्षिताला सांगितल्याचें प्रसिद्ध आहेच. पण त्याचा देवीभागवतांतील त्यांच्या आख्यानांत कोठेंच उल्लेख नाहीं. परंतु तें त्यांनीं चारी आश्रमांच्या अनुष्ठानानें अष्टसिद्धि प्राप्त करून घेतल्यानंतर यदृच्छेनें इहलोकीं येऊन सांगितलें असावें असें समजणें सयुक्तिक दिसतें. कारण, भागवताच्या उपक्रमप्रसंगीं असें वर्णन आहे. शुकाचार्य बारा वर्षें मातेच्या उदरांतच होते. तिला फार त्रास होऊं लागला असतां व्यासांनीं त्यांना रागानें बाहेर पडण्याविषयीं सांगितलें व ते एकदम बारा वर्षांचे होऊनच बाहेर पडले अशी एका पुराणांत कथा आहे. ते बालब्रह्मचारी होते अशी त्यांची ख्याति असून शुकरंभासंवाद तर आबालवृद्धांना माहीतच आहे. " मी जन्मतःच सिद्ध होतों, त्यामुळें मी व्यासाश्रमांत न राहतां त्रैलोक्यांत कोठें तरी राहूं लागलों. पण त्यामुळें व्यासांना

महद्दुःख झालें. यास्तव, मी छायारूपानें त्यांच्या आश्रमीं राहून स्वतःच्या आकारानें वाटेल तेथें रहातों. या छायारूप शुकालाच कीर्तिसंज्ञक कन्या व चार पांच पुत्र झाले." अशीही कथा आहे. देवीभागवतांतही शुकाचार्य अरणींतून उत्पन्न होतांच हां हां ह्मणतां बारा वर्षांचे झाले; त्यांना सर्व वेदविद्या न शिकवितांच आली; असा उल्लेख आहे. तात्पर्य, सर्व पुराणांतल्या आख्यायिकांची पूर्णपणें एकवाक्यता होणें जरा अशक्य वाटल्यामुळें किंवा आज माझा तेवढा अधिकार नसल्यामुळें मी या माझ्या प्रथम कृतीमध्येंच त्याच्या भरीस पडलों नाहीं. शिवाय आख्यायिका तात्पर्यतः धर्माचें प्रमाण होत असतात, असें शास्त्रकारांना मान्य आहे. यास्तव, विशेष विसंगतपणा न वाटेल अशारीतीनें व परमपूज्य शंकराचार्य व कुमारिलभट्ट यांच्या मीमांसेला व धर्मशास्त्राला अनुसरून असें हें अल्प चरित्र मीं लिहिलें आहे.

अलीकडील पद्धतीप्रमाणें या चरित्रांत शुकाचार्यांच्या कालाचा निर्णय करणें अवश्य होतें. पण तो केवळ कल्पनामयच होणें शक्य आहे. शिवाय पुराणांतील आख्यायिकांचा काल ठरविणें जरा अप्रयोजकही आहे; असें मला वाटतें. यास्तव, मी त्या भानगडींत पडलों नाहीं. ज्यांना कसा तरी काल ठरविण्यांतच पुरुषार्थ वाटत असेल त्यांनीं तें काम खुशाल करावें. याठिकाणीं मला एवढेंच सांगतां येण्यासारखें आहे कीं, हे आचार्य वेदान्ताचे प्रवर्तक होते. कारण, नारायण, ब्रह्मदेव, वसिष्ठ, शक्ति, परा-

शंर, व्यास, शुक, गौडपाद, गोविंदयोगींद्र, शंकराचार्य, पद्मपाद, हस्तामलक, त्रोटक, सुरेश्वर इत्यादि वेदान्त-सांप्रदायी ईश्वरस्वरूप पुरुषांत यांचें नांव आहे.

असो. या माझ्या वेड्यावांकड्या कृतीनें तो सर्वनियंता ईश्वर प्रसन्न होवो अशी प्रार्थना करून, मीं हें पुस्तक त्या **निष्कारण** परम **आप्ताला** प्रेमपूर्वक अर्पण करितों.

**ग्रंथकार.**

स्वतः। ॥श्री:॥

# श्रीशुकचरित्र.

## प्रकरण १ लें.

### जन्मवृत्त.

श्रीसच्चिद्धन रामचंद्रचरणारविंदीं मस्तक ठेवून परमेश्वर-प्रीतिद्वारा अंतःकरण शुद्ध व्हावें ह्मणून मी हें श्रीशुकाचार्याचें चरित्र लिहितों.

पूर्वी द्वापरयुगांत श्रीपराशर ह्मणून एक सिद्ध मुनि होऊन गेले. त्यांना कृष्ण नांवाचा एक मोठा विख्यात पुत्र होता. त्याच्या मातेचें नांव सत्यवती असें होतें. ती एका द्वीपामध्यें प्रसूत झाल्यामुळें तिच्या ह्या कृष्णसंज्ञक मुलाला द्वैपायन असेंही ह्मणत. हा पराशरांचा पुत्र नारायणाचा सतरावा अवतार होय. ह्यानें कलियुगांत वैदिकधर्मी जन निर्बुद्ध, अल्पायुषी व विषयी होणार आहेत असें भविष्य जाणून वेदांच्या शाखा केल्या. बुद्धादि नास्तिकांचें कलियुगांतील आचार्यांना सहज खंडन करितां यावें ह्मणून स्वतः वेदांतदर्शन[१] केलें व शूद्र, स्त्रिया, संकर पावलेल्या

१ याला उत्तरमीमांसा असेंही ह्मणतात. ही मीमांसा सूत्ररूप आहे. यांत पांचशें पंचावन्न सूत्रें आहेत व त्यांवर निरनिराळ्या काळीं झालेलीं अशीं एकंदर चोवीस भाष्यें आहेत.

जाति इत्यादिकांवर उपकार करण्याकरितां वेद व धर्मशास्त्र यांनीं परिपूर्ण असें भारत व अठरा पुराणें केलीं. वेदांच्या शाखा केल्यामुळें त्यांना वेदव्यास असेंही ह्मणतात. या जगांत धर्म, शास्त्र, नीति, व्यवहार इत्यादिकांविषयीं जेवढें ह्मणून ज्ञान आहे तेवढें सर्व त्यांचें आहे. कारण, या वर सांगितलेल्या ग्रंथांत त्यांनीं त्याचा अक्षय सांठा करून ठेविला आहे. व्यास या नांवानें ते महर्षि आपल्या या भारतवर्षांतील बालगोपाळांना ठाऊक आहेत. त्यांचा विवाह झाला नव्हता. बालपणापासून चवदा विद्यांच्या अध्ययनांत काल गेल्यामुळें त्यांना विवाहाविषयीं कधीं स्मरणही झालें नाहीं. या आमच्या वेदविद्येचा असाच प्रभाव आहे कीं, हिचा जो एकदां स्वीकार करितो त्याला जगांतील सर्व सुखें तुच्छ वाटूं लागतात. आमचे लोक ऐहिक सुखांचीं साधनें संपादन करण्यांत जे आजकाल इतके मागें पडल्यासारखे दिसत आहेत त्याचें कारण ही अप्रतिम वेदविद्याच होय. या ईश्वरस्वरूप व्यासांनीं आपलीं अवतारकृत्यें संपविलीं असतां आपल्याला एक सर्वोत्तम पुत्र असावा असें त्यांना वाटलें. व्यासासारख्यांना आपला पुत्र आपल्यासारखाच विद्वान्, गुणी, जितेंद्रिय, प्रगल्भ, शांत, उदार व दीर्घायुषी असावा असें वाटणें साहजिक आहे. कारण, व्यवहारांतील सामान्य पुरुषांना सुद्धां माझ्याप्रमाणेंच माझ्या मुलानें व्यापारी व्हावें; मोठी हुद्याची नोकरी करावी; द्रव्य मिळवावें; असलेलें वित्त संभाळावें; अन्य कोणाला त्याला हात लावूं

देऊं नये; असें वाटतच असतें. राजाला आपला मुलगा राजा व्हावा असें वाटतें; प्रधानाला त्यानें प्रधान व्हावें असें आवडतें; विद्वानाला त्यानें विद्या संपादन करावी अशी इच्छा असते; इत्यादि प्रकार आपण नेहमीं पहात असतोंच. या न्यायानें व्यासांसारख्या पुरुषाला चवदा विद्येमध्यें निष्णात असा आपणांस पुत्र असावा असें वाटणें युक्तच होतें. असो. अशा पुत्राच्या इच्छेनें त्यांनीं तपश्चर्या[1] करण्यास आरंभ केला. मेरूच्या रमणीय शिखरावर जाऊन ते ध्यान करूं लागले. तें स्थळ जनरहित असल्यामुळें स्वभावतःच शांत होतें. एखाद्या मोठ्या लोकवस्तीच्या ठिकाणीं जसा सहज व क्षणोक्षणीं मनाला विक्षेप होत असतो तसा तेथें होत नव्हता. त्या निर्जन अरण्यामध्यें सामान्य मनुष्याला जरी मोठी भीति वाटणें साहजिक होतें, तरी व्यासांसारख्या ‘ आत्मवत् सर्व भूतें ’ मानणाऱ्यांना व्याघ्र, सिंह, सर्प इत्यादि दुष्ट प्राण्यांची भीति वाटत नव्हती व त्यामुळें त्यांना तें जंगल मंगलरूप भासूं लागलें. पृथ्वी, उदक, अग्नि, वायु व आकाश यांच्यासारख्या वीर्याचा मला पुत्र व्हावा अशी दृढ भावना धरून त्यांनीं त्या विविक्त ( एकांत ) स्थळीं ईश्वराचें ध्यान करण्यास आरंभ केला. शंभर वर्षेंपर्यंत त्या मुनीनें आहार सुद्धां केला नाहीं. ईश्वराच्या ज्ञानस्वरूपाचें सतत चिंतन करीत

---

१ तपश्चर्येच्या योगानें प्राण्याला पाहिजे तें संपादन करितां येतें; असा शास्त्राचा सिद्धांत आहे. वैद्यकांत कृच्छ्रचांद्रायणादि व्रतें, उपासना, तप इत्यादिकांच्या योगानें भयंकर रोग सुद्धां बरे होतात असें सांगितलेलें आहे.

राहिल्यामुळें त्यांना बाह्य सृष्टींत काय चाललें आहे व ध्यान करावयास लागल्यापासून केवढा काळ निघून गेला हेंही समजलें नाहीं. ह्याप्रमाणें पुत्राच्या इच्छेनें त्यांनीं घोर तपश्चर्या केली असतां त्यांची अंगकांति अतिशय वाढली; ते अग्नीसारखे देदीप्यमान दिसूं लागले; इंद्रादि देवांनाही त्यांच्याकडे पाहवेना व त्या स्थळीं राहणाऱ्या सर्व प्राण्यांना त्यांची भीति वाटूं लागली. वस्तुतः श्रीव्यास जरी ध्यानस्थ होते व कोणत्याही प्राण्याला आपल्यापासून पीडा न व्हावी अशी त्यांची मनापासून इच्छा होती, तरी तपश्चर्येमुळें त्यांच्या शरीरावर जें ' एकप्रकारचें ' तेज आलें होतें त्याच्या योगानें प्राण्यांना त्रास होऊं लागला. शेवटीं तपश्चर्येनें प्रसन्न झालेले भगवान् शंकर त्या ठिकाणीं प्रगट झाले. व्यासांना देहाचेंही भान नाहीं असें पाहतांच त्यांना फार समाधान वाटलें आणि योगनिद्रेंत स्वस्थ असलेल्या त्या व्यासरूपी नारायणाला त्यांनीं स्पर्श करून जागें केलें. ज्या ईश्वराला इतके दिवस मी अंतःकरणांत पाहत होतों तोच हा नियंता आज प्रत्यक्ष माझ्यासमोर उभा आहे असें पाहतांच व्यासांना धन्यता वाटली. आनंदानें त्यांच्या हृदयाला भरतें आलें; प्रेमाश्रूंनीं त्यांचे नेत्र भरले व अनन्य भावानें त्यांनीं त्या जगच्चालकाचे पाय घट्ट धरिले. त्यांची अशी अप्रतिम भक्ति व अवर्णनीय विनय पाहून शंकरांनाही मोठें नवल वाटलें. कारण, विद्वत्तेचा विनय हा जरी एक धर्म आहे तरी तो क्वचित् आढळतो आणि विद्वत्तेच्या ठिकाणीं भक्तीचा लेश

असणें ही तर जवळ जवळ अलौकिकच गोष्ट होऊन राहिली आहे. त्यामुळें व्यासासारख्या अलौकिक विद्वानाच्या ठिकाणीं असामान्य भक्ति व विनय पाहून शंकरांना आश्चर्य वाटणें युक्तच होतें. असो. शंकरांनीं त्यांच्या मस्तकीं हात ठेविला व हात धरून त्यांना वर उठविलें आणि ह्मणाले " बा सत्यवतीपुत्रा, मी तुझ्या या दीर्घ तपश्चर्येनें प्रसन्न झालों आहें. मी सर्वज्ञ असल्यामुळें मला तुझा इष्ट हेतुही समजला आहे. व्यासा, अत्यंततेजस्वी, ज्ञानी, आपल्या कुलाची कीर्ति वाढविणारा, सर्व लोकांना आवडणारा, महाबुद्धिमान् व अति सात्त्विक स्वभावाचा असा तुला एक पुत्र होईल ". हें त्या ईश्वराचें भाषण श्रवण करितांच कृतज्ञताबुद्धीनें व्यासांनीं त्यांचे पुनः पाय धरिले व "महाराज, मी धन्य आहें; माझा जन्म सफल झाला; मी कृतकृत्य झालों; मला माझ्या प्रयत्नाचें फल मिळालें " इत्यादि भाषण केलें. नंतर शंकरांनीं त्यांना आपल्या आश्रमीं जाण्यास सांगितलें व ते स्वतः कैलासपर्वतावर निघून गेले.

इकडे व्यास आपल्या आश्रमांत परत आल्यावर पूर्वीप्रमाणें अग्नि संपादन करण्याकरितां ते अरणीचें मंथन[१] करूं

---

१ यतीवांचून इतर आश्रमांतल्या लोकांना अग्निचयन ( सतत अग्नि राखणें ) अवश्य आहे. कांहीं अडचणीमुळें तें अशक्य झाल्यास त्याचा समिधेमध्यें समारोप करून ती समिधा तरी त्यांनीं जवळ राखणें अवश्य आहे. अडचणीचा काल निघून गेल्यावर अरणीचें मंथन करून ह्म० त्या एकमेकांवर घांसून त्याला उत्पन्न करावें लागतें. अरणींच्या घासण्यालाच अरणिमंथन असें ह्मणतात.

लागले. तें करीत असतांना त्याच्याकडे पाहूनच त्यांच्या मनांत असा विचार आला:— " अग्नीच्या उत्पत्तीला जशी अरणीची व मंथाची आवश्यकता असते तशीच पुत्रोत्पत्तीला क्षेत्ररूप मातेची व बीजरूप पित्याची आवश्यकता आहे. पण मला तर स्त्री नाहीं. तेव्हां शंकराचा वर खरा कसा होणार ? विवाह करण्याविषयीं मनांत आणावें तर गुणवान्, रूपवान्, कुलीन, पतिव्रताधर्म पाळणारी अशी कन्या कोठें मिळेल ? बरें, जरी एखादी योग्य कन्या मिळाली तरी शृंखलेप्रमाणें असलेल्या स्त्रीचा माझ्यासारख्या ज्ञानी पुरुषानें कसा स्वीकार करावा ? दक्ष, सद्गुणी, पुत्रवती अशी स्त्री मिळणें हें एक भाग्याचेंच लक्षण होय आणि जरी कोणाला तशीही स्त्री मिळाली तरी ती त्याच्या स्वभावसिद्ध वृत्तीला थोडा तरी आळा घालतेच. आतां तो जर वाईट वृत्तीला घातला तर त्यापासून ऐहिक व पारलौकिक हित होतें. पण जर कां तो चांगल्या वृत्तीला न समजतांही पडला तर मात्र मोठी हानि होत असते. तात्पर्य, स्त्री हा एक पुरुषाला प्रतिबंध होय. श्रीशंकरासारखा निःस्पृह व सर्वज्ञ परमेश्वर सुद्धां जर कामिनीच्या पाशांत बद्ध झाला तर माझ्यासारख्या पामराची काय कथा ? तात्पर्य, गृहस्थाश्रम हा अति कठिण आहे. मला पुत्र न झाला तरी पतकरेल. पण तो कष्ट देणारा स्त्रीपरिग्रह नको. कारण, एक विवाह करितांच अनेक काळ-

---

१ घुसळण्याची रवि.

२ पतीला सुख देणारी; त्याच्या सदा आज्ञेंत वागणारी.

ज्यांनीं प्राणी परतंत्र होऊन जात असतो ". असा विचार करून त्यांनीं विवाह न करण्याचा निश्चय केला व पूर्वी-प्रमाणें अग्नीकरितां अरणीचें मंथन सुरू केलें. इतक्यांत घृताचीनामक अत्यंत सुस्वरूप अशी एक अप्सरा त्यांना समोर दिसली. तिला पहातांच व्यासांचें मन अति चंचल झालें. जरी ते दृढनिश्चयी व महातपस्वी होते तरी संकल्पानें त्यांनाही कांहीं वेळ परस्वाधीन करून सोडिलें. पण त्यांनीं आपल्या त्या अनावर मनाला पुनः स्वाधीन करून घेतलें व ते आपल्या पूर्व उद्योगाला लागले. इकडे व्यासांच्या मनांत कुकल्पना आली आहे असें समजतांच घृताचीला मोठी लज्जा वाटली व तिनें आपलें मनुष्यरूप टाकून एकदम शुकीचें रूप धरलें. घृताचीला व्यासांची भीति वाटल्यामुळेंच तिनें हें रूपांतर केलें होतें. शुकीचें रूप घेऊन ती भयभीत झालेली स्त्री पळून गेली आहे असें पहातांच त्यांना मोठें आश्चर्य वाटलें व ते त्याविषयींच चिंतन करूं लागले. त्या तपस्वी ऋषीनें जरी आपलें मन मोठ्या धैर्यानें कांहीं वेळ स्वाधीन ठेविलें होतें तरी चिंतनाच्या योगानें विक्षिप्त झालेलें तें मन त्यांना पूर्णपणें आंवरतां येईना आणि त्यामुळें त्यांच्या शरीरावर अनिष्ट परिणाम झाला. असो. तरी सुद्धां त्यांनीं तिकडे दुर्लक्ष्य करून अर-

---

१ या ठिकाणीं व्यासांच्या अवस्थेविषयीं व शुकांच्या उत्पत्तीविषयीं कांहीं व्यावहारिक प्रकार वर्णिलेला आहे. पण तो विद्यार्थी व स्त्रिया यांना विशेष उपयुक्त नसल्यामुळें येथें अधिक स्पष्ट केला नाहीं.

णीचें मंथन मोठ्या जोरानें चालविलें. पुष्कळ वेळ जोरानें मंथन करूनही अग्नि उत्पन्न न झाल्यामुळें व्यासांना जरा खेद वाटला. पण ते उत्तम पुरुष असल्यामुळें हताश न होतां त्यांनीं आपला उद्योग तसाच चालू ठेविला. कारण, जे उत्तम पुरुष असतात ते आरंभिलेलें कार्य अनेक विघ्नें आलीं तरी शेवटास नेल्यावांचून रहात नाहींत. बऱ्याच वेळानें अग्नि उत्पन्न होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अर्थात् व्यासांना समाधान वाटलें. आपण एकादें कृत्य केल्यावर त्याच्या फलाचीं चिन्हें दिसूं लागलीं असतां आपणांस सुद्धां केवढें समाधान वाटतें बरें ! असो. आतां अग्नि निर्माण होणार असें जों श्रीकृष्णद्वैपायन ह्मणत आहेत तोंच त्या अग्नींतून अत्यंत सुस्वरूप, जणुं काय दुसरा व्यासच, असा एक बालक निघाला. त्याचें तें नक्षत्रासारखें तेज, काळेभोर केंस, रुंद कपाळ; गरगरीत व काळे डोळे, सरळ नाक, सारख्या व धनुष्याकृति भुंवया, रुंद वक्षःस्थल ( छाति ), गुटगुटीत व चिमुकले हात व पाय, लाल कमलासारखे रक्तवर्ण व लुसलुशीत पंजे व तळपाय, बारिक बोटें, सूक्ष्म नखें, नाळासह नाभि ( बेंबी ) आणि तो रडण्याचा कोमल पण खणखणीत ध्वनि हें

१ हा प्रकार सृष्टिनियमाविरुद्ध आहे असें कित्येक आधुनिक विद्वान् व विधर्मी लोक ह्मणतील. पण असल्या सर्व असंभाव्य गोष्टींचें आह्मीं श्रीकृष्णचरित्रांत एकदमच मंडन करणार आहों. यास्तव, ईश्वरकृपेनें तें अप्रतिम पुस्तक आमच्या हातून पार पडेपर्यंत वाचकांनीं तात्पर्याकडे लक्ष्य देऊन हें असेंच आहे असा निश्चय ठेवावा.

सर्व पाहून व्यासांचा आनंद गगनांत मावेना! त्यांना ईश्वराच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल व वात्सल्याबद्दल मोठें कौतुक वाटलें. कधीं जन्मांत न पाहिलेलें असें हें अर्भक आपल्यापुढें रडत पडलें आहे असें पहातांच त्यांना काय करावें हें सुचेना. कोणा शेजाऱ्यापाजाऱ्याला हाक मारावी तर तो निर्जन प्रदेश. स्वतः दुग्धादि मिळविण्याकरितां जावें तर हें कोमल व रमणीय बालक एकटें रहाणार! इत्यादि अनेक विचार मनांत येऊन त्यांचें मन क्षणभर गोंधळून गेलें. पण ह्मणतातना, कीं—ईश्वराला कीडमुंगीची सुद्धां काळजी असते; तें खोटें नव्हे. व्यासांच्या अंतःकरणांत काळजी उत्पन्न होत आहे तोंच तेथें वनदेवता घृत[1], मधु[2], दर्भ, दुग्धाकरितां गाय इत्यादि घेऊन आल्या. तेव्हां योग्य प्रसंगीं साह्य करणाऱ्या त्या देवतांचे आपल्यावर अनंत उपकार झाले असें व्यासांस वाटलें. प्राणी असल्या उपकारांमुळेंच व्यवहारांत अधिकाधिक अडकतो. कारण, त्याला ज्यांचे ज्यांचे ह्मणून आपल्यावर उपकार आहेत असें वाटतें, त्यांच्या त्यांच्या करितां त्याला बद्ध व्हावें लागतें; असा नियम आहे. आपल्या अज्ञानावस्थेंत प्रत्येक क्षणीं आईनें साह्य केलें व मजकरितां गर्भारपण, बाळंतपण, दूध पिण्याचा काळ इत्यादि अवस्थेंत असह्य कष्ट सोसले, हें मनांत आलें कीं ‘ मातृदेवो भव ’ ( मातेला देवासारखें मान ) हा बंध आला. पित्यानें आपला देह झिजवून मातेसह माझें

१ तूप. २ मध.

रक्षण केलें; मी मागेन तें मला आणून दिलें; माझे सर्व लाड पुरविले व विद्या शिकविली इत्यादि मनांत आलें कीं 'पितृदेवो भव' (पित्याला देव मान) हा नियम मागें लागला. हाच प्रकार गुरु, भाऊ, बहिण, आप्त, शेजारी, स्त्री इत्यादिकांविषयीं आहे.—तर मग आईबापांचे आमच्यावर उपकार झालेच नाहींत असें समजावें; ह्मणजे बद्ध होण्याची भीति नाहीं; असें कोणी अधार्मिक ह्मणतील. पण तें बरोबर नाहीं. कारण, आईबापांचे उपकार झालेच नाहींत असें समजणें हें मनुष्यपणाचें लक्षण नव्हे. निदान स्त्रीचे जे दास होऊन राहतात त्यांनीं तरी असें ह्मणणें ह्मणजे आपला अमानुषपणा व्यक्त करणें आहे. सारांश, जग हें परस्पर उपकारानें बद्ध झालेलें आहे. असो. व्यासांनीं वनदेवतांनीं आणिलेले ते पदार्थ घेतले व प्रथमतः त्या बालकाचा जातकर्म संस्कार केला. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांच्या कुलांत उत्पन्न झालेल्या बालकाचा नाळ कापण्यापूर्वीं जातकर्मसंस्कार[१] करावा व त्यावेळीं सुवर्णाच्या पदार्थानें तूप व मध त्याच्या तोंडांत घालावा असें शास्त्राचें विधान आहे. व्यास हे उत्तम वैदिक असल्यामुळें व योग्य वेळीं द्विजाचे संस्कार झाले असतां तो पुढें महातेजस्वी निपजतो हें त्यांना निःसं-

---

१ प्रसूत झालेल्या स्त्रीच्या अशक्तपणामुळें जरी हा संस्कार आह्मां दक्षिणी लोकांमध्यें अलीकडे योग्य कालीं करीत नाहींत तरी नामकरणादि पुढच्या संस्कारांच्या वेळीं याच्या लोपाकरितां प्रायश्चित घ्यावें लागतें.

शय मान्य असल्यामुळें आह्मां प्राकृतांप्रमाणें संस्कार करण्यास त्यांनीं आळस केला नाहीं. शास्त्रोक्त रीतीनें जातकर्म हा संस्कार झाल्यावर त्या देवतांनीं बालकाचें नाळ कापल व व्यावहारिक पद्धतीप्रमाणें तें एका मातीच्या भांड्यांत भरून अक्षता, हळकुंड, सुपारी यांसह जमीनींत पुरलें. नंतर स्वभावतःच रमणीय असलेल्या त्या बालकास त्यांनीं न्हाऊं घातलें व गायीचें दूध पाजण्यास सुरवात केली. दुधाची चिरटोळी तोंडांत घालतांच तें दिव्य बालक रडावयाचें थांबलें व डोळे मिटून भराभर त्यानें दहापांच घोट घेतले व तें स्वस्थ निजलें. हा सर्व प्रकार पाहून व्यासांना जणुं काय नवीन सृष्टींत येऊन पडल्यासारखेंच झालें. वाचकहो, दैवयोगानें जेव्हां आपल्या घरीं एकाद्या मुलाचा जन्म होतो त्यावेळीं आपली कशी धांदल होते बरें ? त्या रमणीय बाळाला पुनः पुनः पहाणें; त्याच्या रडण्याचें, पिण्याचें, कोठें तरी पहाण्याचें व झोंपेंतून एकदम दचकून उठण्याचें कौतुक करणें; त्याच्या अवयवांचें परीक्षण करणें इत्यादि मोठ्या हर्षानें आपण किती गोष्टी करितों बरें ? तसाच प्रकार या व्यासांचा झाला. त्या बाळाला माता नसल्यामुळें श्रीव्यासांसच त्याच्याविषयीं सर्व प्रकारें काळजी घ्यावी लागली. जननाशौच ( सुवेर ) आल्यामुळें त्यांच्या नित्य वैदिक क्रिया बऱ्याच कमी झाल्या व त्यामुळें त्यांना त्या मुलाकडे पुष्कळ वेळ खर्च करितां आला. बाराव्या दिवशीं व्यासांनीं त्या बालकाला जवळच वहात असलेल्या गंगानदीवर नेऊन स्नान घातलें आणि नदीच्या कांठीच एका

शिळेवर त्याला कृष्णाजिनांत गुंडाळून ठेविलें. नंतर वारंवार त्या वत्साकडे पहात त्यांनीं स्नान केलें. नवें यज्ञोपवीत धारण केलें. व त्याच्याजवळ बसूनच प्रातःसंध्या, ब्रह्मयज्ञ, देव, ऋषि व पितर यांचें तर्पण ईश्वराचें मानस पूजन इत्यादि नित्य कृत्यें आटोपिलीं. इतक्यांत तें सुंदर मूल भुकेनें व्याकुल होऊन रडूं लागलें. तें पहातांच व्यासांनीं त्या बालकाला आश्रमांत आणिलें व गाईचें दूध पाजलें. क्षुधानिवृत्ति झाल्यावर कांहीं वेळ तें इकडे तिकडे पहात राहिलें व पुनः झोंपीं गेलें. ब्राह्मणपुत्राचा नामकरण हा संस्कार बाराव्या दिवशीं करावा असें शास्त्रवचन असल्यामुळें, व्यासांनीं आसपासच्या सर्व तपस्व्यांना बोलावून आणून यथाविधि नामकरणसंस्कार केला. व्यासांच्या वीर्यापासून या पुत्राची उत्पत्ति होण्यास शुकीचें रूप घेतलेल्या घृताचीचें निमित्त झाल्यामुळें तपस्व्यांनीं त्याचें शुक हें नांव ठेविलें. त्यावेळीं जिकडे तिकडे वाद्यांचा गजर झाला; आश्रमाजवळचीं फुलझाडें भराभर पुष्पवृष्टि करूं लागलीं; तपस्वी पुरुष व स्त्रिया त्या बालकाला अनेक उत्तम आशीर्वाद देऊं लागल्या व तो अकल्पित सोहाळा पाहून व्यासांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळाले. असो. ह्याप्रमाणें व्यासपुत्राचा नामकरणविधि झाल्यावर व्यासांनीं मोठ्या भक्तीनें अर्पण केलेलीं कंदमुळें भक्षण करून तपस्वी जन आपापल्या आश्रमाकडे निघून गेले. व्यासपुत्र शुक प्रतिदिनीं शुक्लपक्षांतील चंद्रासारखा वाढूं लागला व सूर्यासारखा तेजस्वी दिसूं लागला. व्यासांनीं

सहाव्या महिन्यांत त्याचा अन्नप्राशन हा संस्कार केला आणि मुलाचें उत्तम लक्षण पाहून पहिल्याच वर्षीं त्याची चूडा[1] केली. एक वर्षाच्या आंतच हा व्यासपुत्र शुक अक्षरांचे स्पष्ट उच्चार करूं लागला. पुष्कळ मुलांना पांच वर्षांपर्यंतही दूसारखीं व्यंजनें स्पष्ट उच्चारतां येत नाहींत; पण शुकाचा तसा प्रकार नव्हता.

---

# प्रकरण २ रें.

## बाल्यावस्था.

कोणत्याही मुलामध्यें ‘ अनुकरण करणें ’ हा स्वभाव कमीअधिक प्रमाणानें जात्याच असतो. एकादें कुशाग्रबुद्धीचें मूल दुसऱ्याचें यच्चयावत् सर्व अनुकरण करितें व एकादें कांहीं विशेष गोष्टींत मात्र दुसऱ्याचें अनुकरण करीत असतें. अर्थात् मुलांना लहानपणापासून ज्यांचा सहवास असतो त्यांच्याच प्रत्येक कृतीचें अनुकरण करण्याचा तीं प्रयत्न करितात. आमच्या या चरित्राचे नायक जे श्रीशुक ते अति सूक्ष्म बुद्धीचे होते. त्यांना दुसऱ्याच्या बऱ्यावाईट सर्व कृति तिसऱ्या वर्षापासून सहज करितां येत असत. पण त्यांच्या सहवासाला त्यांच्या पित्यावांचून

---

१ व्यवहारांत या संस्कारास चौल असें ह्मणतात.

अन्य कोणीही नसल्यामुळें अगदीं लहानपणापासूनच ते त्यांचें अनुकरण करूं लागले. श्रीवेदव्यास पहांटेस चार घटिका रात्रीं उठून नित्यविधि करीत. त्याचप्रमाणें आमचे हे भावी आचार्य तितक्या रात्रीं उठून मुखमार्जनादि कृत्यें आटोपीत; पित्याबरोबर गंगातीरीं जाऊन स्नान करीत व ब्राह्मांची प्रातःसंध्या आटपेपर्यंत त्यांच्या ठरलेल्या जागीं शिळेवर अजिन पांघरून ईश्वरचिंतन करीत स्वस्थ बसत. तीन वर्षांच्या मुलानें राम, राम; कृष्ण, कृष्ण; हरि, हरि; असें ह्मणत रहाणें हें कित्येकांना जरा असंभाव्य वाटेल, पण तसें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण, हल्लीं सुद्धां कांहीं जात्याच जीं शहाणी व सुदैवी मुलें असतात तीं अशाप्रकारें आपल्या पित्याचें अनुकरण करितात असें आमच्या पहाण्यांत आहे. असो. श्रीव्यासांचीं नित्य कृत्यें आटपलीं कीं हे आमचे भावी आचार्य आपल्या पित्याबरोबर गंगोदकानें भरलेला एक लहानसा चंबू[1] हातांत घेऊन त्यांच्या मागोमाग पुनः पुनः अजिन सांवरीत, पुनः पुनः तो चंबू खालीं ठेवीत, एकादे वेळीं दुड्दुड् धांवतांना पायांत पाय अडखळून पडत आश्रमांत जात. गंगेपासून आश्रम अगदींच जवळ असल्यामुळें व्यासांना त्यांना उचलून घ्यावें लागत नसे. आश्रमांत गेल्यावर अग्नीला आहुती देण्या-करितां व्यास अग्नीला प्रदीप्त करूं लागले कीं या रमणीय बालकाची समिधा आणून देतांना, फुंकणी मागितली

१ पंचपात्रीभर पाणी राहील असा, ज्याला आपण गडू, झारी इत्यादि ह्मणतों त्यासारखा.

असतां ती जवळ करितांना, अवदानाकरितां यवादि पुढें सरकवितांना, मोठी धांदल उडत असे. हवनाचे वेळीं शुकाचार्य सर्व कृति लक्ष्यपूर्वक पहात बसत. त्या निर्जन अरण्यांतील आश्रमांत या बालकाला जरी कोणी मुलें खेळावयास नव्हतीं तरी एखाद्या अभद्र पोराप्रमाणें हे बापाभोंवतीं किरकीर करीत बसत नसत. व्यासांचें अग्निकार्य आटपतांच कपिला गाईचें ताजें दूध पोटभर पिऊन, कंदमुळें भक्षण केल्यानंतर दर्भासनावर अध्ययन करीत बसलेल्या बापाच्या मांडीवर वेदघोष ऐकत स्वस्थ निद्रा घेत. ब्राह्मणाला दिवसां निजणें निषिद्ध आहे खरें, पण हे आमचे आचार्य अति अल्प असल्यामुळें व त्यांना संस्कारजन्य पूर्ण ब्राह्मणत्व अजून आलेलें नसल्यामुळें त्यांना तें क्षम्य होतें. वाचकहो ! वेड्यावांकड्या ओव्यांबद्दल वेदवाणी ऐकत झोंपीं जाणारा बालक पुढें कसा निपजेल याचें केवल अनुमान करा ! खरोखरें ज्यांनीं असंख्य जन्मीं अपरिमित पुण्य केलें असेल त्यांच्यांचें वांट्याला हें भाग्य येणार ! हें उघड आहे.

एक प्रहरभर झोंप झाल्यावर व्यासपुत्र शांतपणें जागे होत व पुनरपि आपल्या पित्याचा तो श्रुतिमधुर वेदघोष ऐकत तसेच मांडीवर स्वस्थ पडत. इतक्यांत दोनप्रहरच्या वेळीं विश्रांति घेण्याकरितां आश्रमांतील वृक्षांखालीं येऊन बसलेलीं हरणें, गाई, गाईचीं वत्सें, बकऱ्या, मेंढ्या इत्यादि चतुष्पाद पशुही हळु हळु उठून नाचूं बागडूं लागत. त्यांची आश्रमाबाहेर गडबड होतांच शुकाचार्य, जणुं काय क्रीडा

करण्याकरितांच, पित्यांना विचारून आश्रमाबाहेर येत व — कांहीं कोंकरें वेड्यावांकड्या उड्या मारीत आहेत; हरणें आपले गरगरीत डोळे फिरवीत व आळस देत वर उठत आहेत, गाई स्वस्थपणें रंवथ करीत बसल्या आहेत व त्यांचीं वत्सें शेपट्या उभारून भरधांव पळत जाऊन पुनः तशाच वेगानें परत येत आहेत—असें ते पहात. कांहीं वासरें आपापल्या आईजवळ येऊन तोंडें हुंगीत आहेत; कांहीं तिच्या डोक्यावर किंवा अंगावर कोठें तरी आपलें डोकें टेंकून टक्कर देण्याचा आविर्भाव आणीत आहेत. कांहीं आई वर उठतांच तिच्या पोटाखालीं जाऊन पिण्यास सुरवात करीत आहेत व कांहीं वासरांना त्यांच्या माता चाटीत आहेत असें त्यांच्या दृष्टीं पडे. लहान लहान पण सुरेख हरिणबालकें अगदीं आश्रमाच्या जवळच बसलेलीं आहेत असें पाहून त्यांना मोठा आनंद होई व ते हळुच मागून जाऊन भीत भीत त्यांच्या पाठीवरून हात फिरविण्याचा प्रयत्न करीत. प्रथम प्रथम त्या हरिणींच्या पाडसांना त्यांची व त्यांना पाडसांची भीति वाटत असे; पण पुढें त्यांचा एकमेकांशीं अत्यंत परिचय झाला. तो इतका कीं, शुकांच्या मागोमाग तीं पोरें आश्रमांतही येऊं लागलीं. व्यवहारांत " सारख्या वयाच्या प्राण्यांची मैत्री जमते " असें जें ह्मणतात त्याचा यावेळीं अनुभव आला. शुकाचार्य आपल्या पित्याच्या आज्ञेनें त्यांना मुठींनीं यव किंवा असेंच एकादें धान्य चारीत; त्यांच्या मऊ तुळतुळीत अंगावरून वारंवार हात फिरवून मोठ्या आनंदानें

हंसत; तीं उभीं राहिलीं असतां त्यांच्यासमोर बसून त्यांच्या गळ्यांत आपला गळा घालीत व केव्हां केव्हां तर त्यांची इच्छा नसतांनाही त्यांना बलात्कारानें आश्रमांत बसवीत. त्या आश्रमाच्या आसपास जरी अनेक पशु होते व त्या सर्वांकडे पाहून यांना मोठा हर्ष होई तरी त्यांतल्या त्यांत हरिणबालकांवर या मुनिबालकाची अत्यंत प्रीति असे. असो. ह्याप्रमाणें शुकाचार्य कांहीं वेळ स्वतःचीच करमणूक करून जों घेत आहेत तों दिवसाचा चवथा प्रहर लागे. त्यापुढें समिधा, दर्भ इत्यादि काढून सायंसंध्या करावयाची असल्यामुळें, व्यास अध्ययन संपवून त्या उद्योगास लागत. अर्थात् या चरित्राचे नायकही त्यांच्याबरोबर असत. व्यास महर्षि हातांत कोयती घेऊन समिधा काढीत असतांना "बाबा, समिधा इतर झाडें टाकून पळसाच्याच कां तुह्मी काढितां? हें झाड कोणतें? या वेलीचें नांव काय? गाई असेंच कां करितात? हरिणाचें शेंपुट असेंच कां? त्या लांब शिंगाच्या जनावराचें नांव काय?" इत्यादि प्रश्न करून शुकाचार्य आपल्या पित्याला आनंद देत. वाचकहो! आपल्या कोमल बालकानें अशा रीतीनें रमणीय व अमृतासारख्या गोड शब्दांनीं विचारिलेले प्रश्न ऐकून कोणत्या भाग्यवान् पित्याला हर्ष वाटल्यावांचून राहणार आहे बरें! सर्वच पित्यांच्या नशीबीं असलें सुख असतें असें नाहीं.

असो. आपल्या शहाण्या मुलाशीं प्रेमानें गोष्टी बोलत दर्भ व समिधा काढून झाल्यावर श्रीवेदव्यास आश्रमांत

येत व त्यांना सप्रमाण तयार करून ठेवीत. इतक्यांत सुमारें दोन घटिका दिवस राहिला असतां ते शुकांसह सायंसंध्योपासनेकरितां गंगातीरीं जात. तेथें गेल्यावर सायंकाळची ती रमणीय शोभा, पक्ष्यांचे नानाप्रकारचे शब्द, नदीच्या प्रवाहाची गर्जना, प्रतिक्षणीं कमी कमी होत असलेला प्रकाश इत्यादि सर्व पाहून व्यासपुत्रांना मोठा चमत्कार वाटे! व— हें सर्व करितें कोण? हें नियमानें प्रतिदिनीं सारखेंच कसें होतें? पुनः पुनः तोच दिवस व तीच रात्र! पुनः पुनः तेच पक्षी व तीच त्यांची क्रिया! पुनः पुनः तीच नदी, तोच तिचा प्रवाह! व तेंच तिच्या तीरीं होणारें माझ्या पित्याचें व माझें स्नानादि कर्म हा सर्व काय चमत्कार आहे?— असें त्यांच्या मनांत येई. 'बाबा' असें ह्मणून त्याविषयीं पित्यांना प्रश्न करावयासही ते तयार होत. पण ते संध्या करीत आहेत; आतां बोलणार नाहींत; असें वाटतांच पुनः मुकाट्यानें बसत. तरी सुद्धां त्यांच्या वयाच्या मानानें या जगांतील अनेक चमत्कारांकडे पाहून त्यांना 'हें सर्व काय गौडबंगाल आहे' अशी जिज्ञासा[१] झाल्यावांचून रहात नसे. सात्त्विक आहार, सात्त्विक रहाणी, सात्त्विक प्राण्यांशीं सहवास व सात्त्विक देखाव्याचें दर्शन ज्याला सुदैवानें प्राप्त झालें, त्याच्या मनांत अशी इच्छा उद्भवणें अशक्य नव्हे. वाचकहो, राजस व तामस आहार, राजस व तामस स्थिति, तशाच प्राण्यांचा सहवास व तसलेच

१ जाणण्याची इच्छा.

देखावे यांचा नित्य सहवास झाल्यामुळें आह्मी बहुतेक लोक राजसी व तामसी झालों आहों आणि त्यामुळेंच व्यासवचना-प्रमाणें आह्मी धर्माला अधर्म व अधर्माला धर्म समजतों.

सायंसंध्या आटोपून व्यास आश्रमाकडे जाण्यास निघाले असतां जरी अणखीं कांहीं वेळ ही सायंकाळची शोभा पहात येथेंच उभें रहावें असें शुकांस वाटत असे, तरी पित्यांना न दुखविण्याचें जणुं काय त्यांचें जन्मादारभ्य व्रतच असल्यामुळें ते त्यांच्या बरोबर आश्रमांत येत. सायं-होम झाल्यावर दुग्धप्राशन करून बाबांनीं तयार केलेल्या दर्भ व अजिन यांच्या शय्येवर ते मोठ्या आनंदानें जाऊन पडत. व्यासमुनींनींही सर्व नियत[1] कृत्यें आटोपल्यावर प्रेमानें ईश्वराचें स्मरण करीत बसत व तें ऐकतां ऐकतांच शुकांना झोंप लागत असे. ईश्वर ह्मणजे कोण ? तो कसा आहे ? कोठें आहे ? इत्यादि प्रकार समजण्या-इतकी जरी शुकांची त्यावेळीं योग्यता नव्हती, तरी व्यासांचें नामस्मरण ऐकून त्यांच्या मनावर एकप्रकारचा उत्तम संस्कार होत असे; व असें होणें अशक्यही नाहीं. वाच-कहो ! ' न कळतां पद अग्निवरी पडे ' इत्यादि जें ह्मण-तात तें यालाच ! सारांश, कोणतेंही उत्तम किंवा अधम कृत्य सहज जरी एकाद्याच्या हातून घडलें, तरी अंतःकरणावर तदनुरूप ठसा उठल्यावांचून रहात नाहीं. असो. श्रीशुकाचार्यांची बाल्यावस्थेंतील दिनचर्या याप्रमाणें मोठ्या आनंदानें होत असे.

---

१ नित्य.

# प्रकरण ३ रें.

## विद्याग्रहण.

मागच्या प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें श्रीशुकांचे दिवस भराभर जाऊं लागले. त्यांना पांचवें वर्ष लागलें असतां चैत्रशुद्ध प्रतिपदेस शुभ लग्नावर व्यासांनीं त्यांच्याकडून सरस्वतीपूजन करविलें व त्यांना 'श्रीगणेशाय नमः' इत्यादि अक्षरें काढून दिलीं; आणि त्या दिवसापासून प्रतिदिनीं आपल्या अध्ययनाच्या वेळांतील कांहीं वेळ खर्चून ते पुत्राला स्वतः शिकवूं लागले. अलौकिक बुद्धिमत्तेमुळें शुकाचार्यांनीं मूलाक्षरें, बाराखड्या, अंक इत्यादि सर्व सहा महिन्यांतच संपविलें. ईश्वरानें दिलेल्या आपल्या मुलाची अशी तैल बुद्धि पाहून व्यासांना फार समाधान वाटलें व त्यांनीं त्याच ह्मणजे पांचव्याच वर्षी त्याचें उपनयन करण्याचा संकल्प केला. कारण, पांचव्या वर्षी ब्राह्मणपुत्राचा उपनयनसंस्कार केला असतां त्याला ब्रह्मवर्चसनामक तेजाची प्राप्ति होते, असें मनूनीं सांगितलें आहे. असो. व्यासांनीं पुत्राचें उपनयन करण्याचा संकल्प केला असतां, शुकालाही मोठा आनंद झाला. आपल्या पित्याप्रमाणेंच मीही वेद कधीं ह्मणेन, ते शिष्यांना कधीं पढवीन, त्यांच्या शंकांचें समाधान कधीं करीन व त्यांच्याप्रमाणेंच इतर पवित्र क्रिया मी केव्हां एकदां करूं लागेन असें त्यांना होऊन गेलें होतें. व्यवहारांत सुद्धां साधारण जाणत्या मुलाला असेंच वाटत असतें हें

आपणांस ठाऊक आहेच. उपनयनाकरितां सुमुहूर्त पाहून व्यासांनीं देवगुरु बृहस्पतींची आचार्य होण्याविषयीं प्रार्थना केली. शुकांसारख्या बुद्धिमान् मुलाचें आचार्यत्व पतकरून ते देवगुरु व्यासांच्या आश्रमांत आले. येतांना त्यांनीं देवलोकाहून दंड, कृष्णाजिन व कमंडलु हीं दिव्य उपकरणें शुकांकरितां आणिलीं. व्यासांनीं आसपासच्या सर्व ऋषि, मुनि व तपस्वी स्त्रिया यांना पाचारण करून आणिलें व या मंगलकृत्यांत आपणांस साह्य करण्याविषयीं त्यांचीच प्रार्थना केली. सर्व तपस्वी स्त्रियांनीं तें कृत्य मोठ्या आनंदानें स्वीकारिलें व आपल्या आश्रमाप्रमाणेंच व्यासाश्रमांत त्या उपनयनाची तयारी करूं लागल्या. व्यासांनीं आश्रमालाच लागून एक प्रमाणयुक्त मंडप घातला; तोरणें उभीं केलीं; स्थंडिलें घातलीं व येणाऱ्या ब्राह्मणांस बसण्याकरितां अनेक दर्भासनें तयार केलीं. व्यासांचे जैमिनि, याज्ञवल्क्य इत्यादि सर्व शिष्य, या प्रसंगीं त्यांस साह्य करण्याकरितां मुद्दाम आले होते. उपनयनकाल प्राप्त झाला असतां बृहस्पतींनीं शुकांचें यथाशास्त्र मौंजीबंधन केलें. सावित्रीमंत्राच्या उपदेशानंतर त्यांनीं शुकाचार्यांना ब्रह्मचारिव्रताचा उपदेश केला. बृहस्पति ह्मणाले:— हे प्रिय शिष्या, तूं अलौकिक बुद्धिमान् आहेस. यास्तव, मनु, विष्णु, यम इत्यादि पंडितांनीं धर्मशा-

१ या चरित्रांत प्राधान्यतः आश्रमधर्मांचें वर्णन करावयाचें असल्यामुळें मौंजीबंधनादि विधींचें येथें विस्तृत वर्णन केलें नाहीं; तें वामनचरित्रांत येईल.

स्त्रांत सांगितलेला ब्रह्मचाऱ्याचा धर्म मी तुला सांगतों. तो तूं लक्ष्यपूर्वक ऐकून घे व त्याप्रमाणें आचरण कर. कारण, शुका, ब्राह्मणकुलांतनिर्माण झालेल्या तुझ्यासारख्या बटूनें निश्चयानें शास्त्राप्रमाणें वागणें हें अत्यंत श्रेयस्कर आहे. ब्राह्मणकुलांत जरी जन्म झाला तरी तो आचरणानें सार्थ केला पाहिजे. ब्राह्मणांनींच जर वर्णाश्रमधर्माप्रमाणें आचरण न केलें तर तें इतर द्विज कसे करतील? कारण, ब्राह्मण हा वर्णांचा गुरु आहे; असें मनु, यम इत्यादिकांनीं सांगितलें आहे. बाबारे, मोठेपणा कष्टावांचून मिळत नाहीं. ऐहिक कष्ट जरी झाले तरी तिकडे लक्ष्य न देतां ब्राह्मणानें आश्रमधर्माचें निश्चयानें अनुष्ठान केलें पाहिजे. त्यावांचून त्याचा मोठेपणा रहाणार नाहीं. ज्या ज्या वेळीं ब्राह्मण आचार सोडितात त्या त्या वेळीं त्यांच्यावर मोठा अनर्थ ओढवतो; असें तुझ्या पित्यानें सांगून ठेविलें आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन जातींच्या लोकांना द्विज असें शास्त्रांत ह्मटलें आहे. कारण, त्यांचा एकदां अन्य प्राण्यांप्रमाणें मातेच्या उदरांतून जन्म होतो व पुनः उपनयनकालीं संस्कारद्वारा दुसरा जन्म होतो. ह्या दुसऱ्या जन्माला ब्राह्म जन्म असेंही ह्मणतात. ह्या संस्कारावांचून द्विजाला सुद्धां वेदाक्षराचा उच्चार करितां येत नाहीं. मग शूद्राला त्याचा उच्चार करितां येणार नाहींच हें काय सांगावें? पण, प्रिय शिष्या, ज्या ज्या वेळीं ब्राह्मण आचार सोडतात व द्रव्याकरितां काय पाहिजे तें करूं लागतात, त्या त्या वेळीं शूद्रादि अनु-

पतितें व यवनही वेदांचें अध्ययन करितात. पण त्यांना आचार ह्मणजे काय हें समजतही नसल्यामुळें व त्यांना संस्काराचा अधिकार नसल्यामुळें त्या विद्येपासून कांहींएक लाभ होत नाहीं. शिवाय ही वेदविद्या जशा परंपरेनें शिकावयास पाहिजे तशी त्यांना शिकतां येत नाहीं; कारण, कोणीही नैष्ठिक ब्राह्मण त्यांना केवल द्रव्याकरितां ही विद्या शिकविण्यास तयार नसतो. त्यामुळें केवल द्रव्याची लालसा दाखवून नामधारी व द्रव्याकरितां काय पाहिजे तें करणाऱ्या ब्राह्मणापासूनच त्यांना तिचें ग्रहण करावें लागतें. पण असा ब्राह्मण योग्य परंपरेंतला असतोच असें नाहीं. त्यामुळें त्यांच्या त्या विद्येचा त्यांना कांहीं लाभ तर होत नाहींच, पण उलट पारलौकिक हानि मात्र होण्याचा बहुतकरून संभव असतो. असो. यास्तव, शुका, ब्राह्मणानें धर्माचें आचरण न करणें यासारखें दुसरें पातक नाहीं. ब्राह्मण हा जन्मतःच वेदाध्ययनास योग्य नसून संस्कारानें त्याचे ठिकाणीं ती योग्यता येते असें पूर्वीं सांगितलेंच आहे. उपनयनसंस्कार होतांच त्याला आचार्य सावित्री मंत्राचा उपदेश करितात. द्विजाचें उपनयन करून जो त्याला सांग वेदाध्ययन सांगतो, त्याला आचार्य ही संज्ञा प्राप्त होते असें मनु, याज्ञवल्क्य, वृद्ध पितामह इत्यादि स्मृतिकारांनीं सांगितलें आहे. आचार्यानें शिष्याला प्रथमतः अंतर्बाह्य शुद्धि, आचार, अग्निकार्य

१ ज्यांचें उपनयन झालेलें नाहीं असे.

२ आपण व्यवहारांत यालाच गायत्री असें ह्मणतों. (पराशर.

व संध्येची उपासना हीं शिकवावीं, अशी त्यांची आज्ञा आहे. शौचं[1] दोन प्रकारचें. एक आंतर व दुसरें बाह्य. अंतःकरण सर्वदां पवित्र असणें ह्मणजे त्यांत प्रसाद हा गुण नित्य असून विषयप्रीति, क्रोध व लोभ हे दोष ( मल ) कधींही न उठणें होय. हीच अंतःशुद्धि; व प्रातःसायं स्नान; मलविसर्जन करणाऱ्या इंद्रियांचें मृत्तिका इत्यादिकांच्या योगानें धावन[2]; धूत वस्त्रांचें परिधान; भस्मधारण इत्यादि बहिःशुद्धि होय. बहिःशुद्धीवांचून अंतःशुद्धि होत नाहीं. यास्तव, जरी उपनयनापूर्वी ब्राह्मणपुत्र यथेष्ट आचरण करीत असला तरी उपनयनानंतर त्याला वैदिक नियम अवश्य पाळलेच पाहिजेत. अंतःकरणाच्या शुद्धीवांचून वेदविद्या पूर्णपणें फलद्रूप होत नाहीं व आचार, कर्मे, उपासना इत्यादि सर्व अंतःकरणाच्या शुद्धीकरितांच असतात. यास्तव, मी आतां तुला थोडासा आचार सांगतों. द्विजानें दिवसां व दोन्ही संध्याकालीं ब्रह्मसूत्रें[3] उजव्या कानावर ठेवून व उत्तरेकडे तोंड करून व रात्रीं दक्षिणेकडे तोंड करून मूत्र व पुरीष यांचा त्याग करावा व तीं द्वारें मृत्तिका व उदक यांच्या योगानें स्वच्छ धुवावीं. नंतर संकल्प उच्चारून, जेथें स्नान

---

१ शुद्धि, पवित्रता. २ हा विषय स्मृति व पुराणें यांमध्यें फार विस्तृतपणें लिहिलेला आहे. पण आमच्या वाचकांचीं अंतःकरणें फार नाजुक झालेलीं असल्यामुळें मीं तो येथें अगदीं थोडक्यांत व बऱ्याच कठिण भाषेंत मुद्दाम लिहिला आहे.

३ यज्ञोपवीत.

करावयाचें असेल त्या स्थळीं गंगेचें आह्वान करून आणि तें गंगोदकच आहे अशी मनाची दृढ भावना करून स्नान करावें. शौच व स्नान आणि तशींच दुसरींही अनेक कर्में जरी कंटाळवाणीं असलीं तरी तीं करण्यास कंटाळा करूं नये. कारण, आळस केल्यास अपरिहार्य हानि होत असते. आश्रमानुरूप स्नानांग तर्पणादि कृत्यें केल्यावर स्वच्छ वस्त्रें नेसून पवित्र स्थळीं उत्तम आसनावर पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करून बसावें. भस्म लावावें; दोन्ही हात गुडघ्यांच्या आंत घ्यावे आणि ब्राह्म[1] तीर्थानें आचमन करावें. प्रथमतः तीन वेळ पाणी पोटांत घेऊन नंतर ओंठ मिटून आंगठ्याच्या मूलप्रदेशानें दोनदां मुख पुसावें. मस्तक, नेत्र, कर्ण, नासिका व हृदय यांना ओल्या हातानें स्पर्श करावा. यालाच अपउपस्पर्शन ह्मणतात. उष्ण, गढुळ व फेंसाळ उदकानें आचमन करूं नये. ब्राह्मणाच्या आचमनाचें पाणी हृदयापर्यंत पोंचलें असतां तो पवित्र होतो. आचमन हें एक सामान्य कर्म आहे, असें कित्येक नास्तिकांना वाटत असतें; पण तें अयोग्य आहे. कारण, शास्त्रोक्त रीतीनें आचमन केलें असतां तें स्नानाप्रमाणेंच अंतःशुद्धीला निमित्त होतें; हें त्यांना समजत नाहीं; व ते जात्याच अश्रद्धाळू असल्यामुळें त्यांना या गोष्टीचा अनुभव येण्याचाही संभव

१ उजव्या हाताच्या आंगठ्याच्या पलीकडे जी रेघ आहे तिला ब्राह्म तीर्थ असें ह्मणतात.

नसतो. आचमनानंतर प्राणायाम करावा. योगशास्त्रांत सांगितलेल्या प्राणसंयमाइतका हा कठिण नसल्यामुळें लहान बटूलाही तो सहज करितां येण्यासारखा आहे. प्राणायामाच्या योगानें चित्त थोडें तरी स्थिर होतेंच असा सर्व कर्मठ ब्राह्मणांचा अनुभव आहे. तदनंतर संध्येचें ध्यान व आह्वान करावें. तीन अब्दैवतं मंत्रांनीं मार्जन केल्यावर अघमर्षण करावें; सूर्याला अर्घ्यं द्यावीं व सावित्रीचें ध्यान करून जप करावा. प्रातःकालीं नक्षत्रें दिसत असतांना आरंभ करून सूर्यबिंबाचा उदय होतांच जपाची समाप्ति करावी. प्रातःसंध्याकालीं पूर्वाभिमुखें उभें राहून जप करावा असें शास्त्रवचन आहे. सायंकाळीं सूर्य क्षितिजावर दिसत असतांना आरंभ करून नक्षत्रांचा उदय होईपर्यंत बसून जप करावा. जवळ बसलेल्यासही ऐकूं जाणार नाहीं इतका हळु जप केल्यास त्याचें शंभरपट व अगदीं मनांतल्या मनांत तो केल्यास हजारपट फल सांगितलें आहे. सर्व यज्ञांत हा जपयज्ञ श्रेष्ठ आहे. अन्य कांहींएक न करितां ब्राह्मणानें याचेंच उत्तम प्रकारें अनुष्ठान केलें तरी पुरें आहे. तदनंतर दोन्ही संधिकाळीं अग्नीमध्यें समिधा, धान्य इत्यादिकांच्या आहुती द्याव्या व हा मी अमुक आहें असें ह्मणून वडिलांस नमस्कार करावा. अध्यय-

---

१ ॐ भूः ॐ भुवः इत्यादि प्रणवासह सात व्याहृति, सावित्री मंत्र व आपो ज्योती० इत्यादि मस्तक, यांचा श्वासनिरोध करून तीन वेळ मनांतल्या मनांत जप केला असतां एक प्राणायाम होतो. २ वरुण आहे देवता ज्यांची अशा. ३ पूर्वेकडे तोंड करून.

नाकरितां गुरूंस शरण जावें. त्यांच्याजवळ जातांना चित्त शांत ठेवावें. त्यांनीं ' ह्मण ' अशी आज्ञा केल्यावर ह्मणण्यास आरंभ करावा. आपलें जेवढें झालें असेल तेवढें त्यांना ह्मणून दाखवावें व नित्य नवीन पाठ घ्यावा. त्यांच्या हिताविषयीं नेहमीं झटावें. त्यांच्यापुढें कायिक, वाचिक व मानसिक विनय[1] धरावा. अध्ययन सांगून त्यांनीं केलेले उपकार विसरूं नये. कारण, विद्यादानासारखें दान नाहीं असें शास्त्रकार नित्य सांगत असतात. व्यवहारांत द्रव्यादि क्षुद्र दान देणारापुढें सुद्धां दान घेणारे कशी श्ववृत्ति[2] पतकरीत असतात बरें ? हीच गोष्ट ध्यानांत धरून अमूल्य दान देणारापुढें नित्य नम्र असावें. त्यांचा ( गुरूंचा ) द्रोह करूं नये. ब्रह्मचर्य पाळून तद्द्वारा आपली धारणाशक्ति[3] अक्षय राखावी. त्यांचे दोष कोठेंही प्रगट करूं नयेत; त्यांचे गुण मात्र बाहेर सांगत असावें. त्यांच्या समोर आपण अस्ताव्यस्त बसूं नये. ते येतांच आसनावरून उठून जमिनीवर उभें रहावें. त्यांचें भाषण संपल्यावांचून आपण बोलूं लागूं नये. ते जें कांहीं सांगतील तें प्रथम लक्ष्यपूर्वक ऐकून घ्यावें. त्यांच्या शब्दांचें, चालण्याचें किंवा कोणत्याही कृतीचें अनुकरण करूं नये; ( ह्म० त्यांस वेडावून दाखवूं नये ). मन हें अति चंचल आहे. तें गुरूशीं द्रोह करण्यास शिकवील; अध्ययन करूं नको ह्मणून सांगेल; निषिद्ध कर्में आचरण्याविषयीं प्रेरणा

---

१ नम्रता. २ लांगूलचालनादि कुत्र्याची वृत्ति. ३ विद्येचें ग्रहण करण्याची शक्ति.

करील व अशाच आणखीं हजारों गोष्टी तें करील; पण, बा धैर्यवाना, त्याचा तूं संयम ( निग्रह ) कर. श्रोत्र, त्वक्, चक्षु, जिह्वा, नासिका, पायु, उपस्थ, हात, पाय, वाणी व मन अशीं हीं अकरा इंद्रियें आहेत. त्यांतील पहिल्या पांच इंद्रियांना ज्ञानेंद्रियें व पुढच्या पांचांना कर्मेंद्रियें असें ह्मण-तात. तीं सर्वही मनाच्या अधीन असतात. मनानें प्रेरणा केल्यावांचून कोणतेंही इंद्रिय काम करीत नाहीं. ज्याप्रमाणें एकाद्या धन्याचे कृतज्ञ सेवक त्याच्या आज्ञेवांचून कांहींही करीत नाहींत अथवा एखाद्या भाग्यवान् कुटुंबांतील माणसें गृहस्थांच्या आज्ञेबाहेर यत्किंचित्ही जात नाहींत, त्याप्रमाणें हीं इंद्रियें सर्वदा आपल्या स्वामीच्या आज्ञेंत वागतात. यास्तव, प्रिय शिष्या, तूं या मनाला स्वाधीन करून ठेव. त्याचे लाड करूं नकोस. मनाला स्वाधीन ठेवलेंस कीं तूं निर्भय झालास असें समज. कारण, प्राण्याला हें मनच पशु किंवा देव करीत असतें.

शुका, वेदाध्ययन हें ब्राह्मणाचें मुख्य कर्तव्य आहे. तें न केल्यास तो पतित होतो. अध्ययनास आरंभ करितांना अगोदर गुरूंचे चरण धरावें. अध्ययनापूर्वी प्रणवोच्चार करावा. प्रणवाचा उच्चार न करितां अध्ययन केल्यास तें हळु हळु नष्ट होतें. तसेंच अध्ययन समाप्त करितांनाही त्याचा उच्चार करावा व गुरूंचे चरण धरावे. असें न केल्यास विद्या प्राप्त होत नाहीं. अध्यापन हा एक मोठा अधिकार असल्यामुळें गुरूंनींही शिष्याप्रमाणेंच

१ इमानी. २ घरधन्याच्या.

व्रतस्थ राहणें अवश्य आहे; पण अध्ययन झाल्यावर तें तुला आपोआप समजण्यासारखें असल्यामुळें आतां सांगत नाहीं. व्यासपुत्रा, ब्रह्मचाऱ्यानें दंड, अजिन, मेखला व यज्ञोपवीत हीं नित्य धारण करावीं; व अध्ययनानंतर गुरूंची आज्ञा घेऊन भिक्षेस जावें. ब्राह्मणानें 'भवति भिक्षां देहि[1]' असें म्हणून अनिंद्य व आचारसंपन्न अशा ब्राह्मणाच्या घरीं भिक्षा मागावी. आपणांस हवी असेल तेवढीच भिक्षा आणून निष्कपटपणानें[2] गुरूंस दाखवावी व त्यांच्या आज्ञेनें भोजन करावें. पूर्वेकडे तोंड करून भोजन करणें हें उत्तम. पण तसें करण्यास कांहीं अडचण असेल तर कोणत्याही दिशेस तोंड करून भोजन केलें तरी चालेल. भिक्षान्न पुढें घेऊन त्याची पूजा करावी. तें पाहून संतुष्ट व्हावें. देवादिकांना तें समर्पण करून, अपोशन घेऊन, शांत अंतःकरणानें तें खावें. अन्नाची कधींही निंदा न करणें हें एक व्रत आहे. त्याची निंदा केल्यास आयुष्य, बल, वीर्य, तेज इत्यादिकांचा क्षय होतो. ब्रह्मचाऱ्यानें एकाचेंच अन्न भक्षण करूं नये. पण कोणीं श्राद्धाकरितां आमंत्रण केलें असतां तें खुशाल पतकरावें. श्राद्धभोजनकालींही मांसादिकांचें भक्षण करून व्रताचा लोप करूं नये. मध, मांस, अभ्यंग[3], काजळ, उच्छिष्ट, निष्ठुर भाषण, स्त्रीचा उपभोग, प्राणिहिंसा, उदय व अस्तकालीं सूर्यबिंबाचें अवलोकन व अश्लील

---

१ अहो बाई, भिक्षा द्या. २ मिष्टान्न लपवून न ठेवितां.
३ तूप, तेल, इत्यादि अंगाला लावणें.

भाषण हीं ब्रह्मचाऱ्याला वर्ज्य आहेत. त्यानें पायांत जोडा घालूं नये; छत्री घेऊं नये; काम, क्रोध, लोभ, नाच, गाणें, वाजविणें, द्यूत, दुसऱ्याची निंदा, असत्य भाषण व स्त्रियांकडे पहात राहणें हीं निःशेष टाकावीं; बहुतकरून एकांतांत व एकट्यानेंच भूमीवर निजावें; मंचकावर आरूढ होणें हा अनाचार आहे. ब्रह्माचाऱ्यानें मस्तकाचें मुंडन करावें अथवा सर्व जटा वाढवाव्या किंवा नुसत्या शेंडीच्याच जटा होऊं द्याव्या. सूर्योदय व सूर्यास्तसमयीं त्यानें संध्योपासना करीत गांवाबाहेर असावें. त्यावेळीं गांवांत निजून राहणारा बटु प्रायश्चित्तावांचून शुद्ध होत नाहीं. ब्राह्मणानें प्रत्येक वेदाकरितां बारा किंवा निदान पांच वर्षें तरी ब्रह्मचर्य पाळावें. कोणी शास्त्रकार वेदाध्ययन पूर्ण होईपर्यंत तें पाळावें असें ह्मणतात. जो ब्राह्मण वेदाध्ययन करितो त्यास अन्य कांहीं करावयास नको. निदान ब्राह्मणानें प्रतिदिनीं हजार गायत्री जप जरी केला तरी पुरें आहे. शुका, आपत्कालांत सांपडलेल्या ब्राह्मणाकरितां शास्त्रानें एवढी सोय केली असतांनाही त्याला जे दोष देतात ते खचित दुर्दैवी होत.

नित्यकर्माला अनध्याय नाहीं. संध्योपासना, वेदांचीं अंगें, ब्रह्मयज्ञ, होमाचे मंत्र, जपयज्ञ इत्यादिकांचा कधींच लोप होऊं देऊं नये. कारण, संध्योपासना न करणारा ब्राह्मण शूद्र होतो असें मनूनें सांगितलें आहे. शुका, धर्म, वित्त व शुश्रूषा ह्यांतील एकादा तरी गुण ज्या ब्राह्मणाचे ठिकाणीं नसेल त्याला विद्या देऊं नये असें पूर्वींचे

महर्षि सांगतात व श्रुति ह्मणते. वेदवेत्त्या ब्राह्मणानें कोणी योग्य शिष्य न मिळाल्यास खुशाल विद्येसहवर्तमान मरावें. ह्मणजे तिचा कांहींएक उपयोग न झाला तरी चालेल, पण घोर आपत्तीमध्यें सुद्धां ती असच्छिष्याला देऊं नये. कारण, पूर्वीं एकदां विद्या ब्राह्मणाकडे आली व त्याला ह्मणाली " हे विप्रा, मी तुझा सांठा आहें. यास्तव, तूं माझें रक्षण कर. दूषित शिष्याला मला देऊं नकोस, ह्मणजे मी तुझ्याच ठिकाणीं अत्यंत वीर्ययुक्त होईन. व शुचिर्भूत शिष्याला जर मला अर्पण करशील तर तुला मोठें पुण्य लागेल. " सारांश, विद्या हा ब्राह्मणाचा सांठा आहे. तो जर त्यांनीं संभाळला नाहीं तर कोणीही त्याला लुटून घेऊन जाईल, हें लक्ष्यांत ठेवावें.

सर्वांमध्यें गुरु हा श्रेष्ठ होय. कांहीं शास्त्रांत तर ब्रह्मदान करणारा गुरु जन्मदात्या मातापित्यांपेक्षांही श्रेष्ठ आहे असें सांगितलें आहे. आचार्य ही परमात्म्याची मूर्ति; पिता प्रजापतीची मूर्ति, माता पृथ्वीची मूर्ति व भ्राता तर स्वतःचीच मूर्ति आहे असें मनुमहाराज सांगतात. तस्मात्. अत्यंत पीडित झालेल्या ब्रह्मचाऱ्यानेंही त्यांचा कधीं अवमान करूं नये. मातापितरांना उत्पत्तिकालीं किती कष्ट होतात याची मुलाला कल्पनाही नसते; पण, शुका, त्यांच्या उपकारांची शेंकडों जन्मांनींही फेड होत नाहीं. तूं अयोनिसंभव असल्यामुळें तुला जरी मातेचें ऋण नाहीं, तरी पित्याचें दुप्पट ऋण आहे. कारण, माता नसल्यामुळें तुझ्या अज्ञानावस्थेंत त्यालाच तुझें संगोपन करावें लागलें

व बालसंगोपनाइतकें कष्टकर कृत्य दुसरें कोणतेंच नाहीं. यास्तव, बा प्रिय शिष्या, तूं व्यासांच्या वचनाबाहेर कधींही जाऊं नकोस. गुरु, पिता व माता या त्रिवर्गांना संतुष्ट केल्यास सर्व जगाला संतुष्ट केल्यासारखें होतें; त्यांच्या इच्छेप्रमाणें वागल्यास सर्व वैदिकधर्माचें आचरण केल्यासारखें होतें; व त्यांची सेवा केल्यास सर्व भूतांची सेवा केल्यासारखें होतें; सारांश, माता, पिता व गुरु यांना परमेश्वर समजून जो ब्रह्मचारी त्यांची नित्य शुश्रूषा करितो त्याला पूर्ण आयुष्य, विद्या, तेज व वित्त यांची अनायासें प्राप्ति होते. असो. हे प्रिय शुका; तूं असामान्य बालक आहेस हें मी जाणतों. पण ज्याअर्थी व्यावहारिकदृष्ट्या तूं माझा शिष्य झाला आहेस, त्याअर्थी मी आतां तुला अध्ययन सांगतों. अध्ययनावांचून ब्राह्मणाचें जिणें व्यर्थ आहे, हें मीं पूर्वीं सुचविलेंच आहे. ब्रह्मचारी आश्रम केवल अध्ययनाकरितांच आहे हें लक्ष्यांत ठेव.

ह्याप्रमाणें श्रीबृहस्पतींनीं शुकांना संक्षेपतः उपदेश केला व ते विद्याभ्यासाकरितां त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेले. व्यासपुत्रानें बारा वर्षेंपर्यंत सर्व ब्रह्मचाऱ्याचीं व्रतें पाळून विद्याभ्यास केला. ऋगादि वेद; शिक्षा, कल्प इत्यादि सहा अंगें; मनु, विष्णु इत्यादि धर्मशास्त्रें; वैशेषिक, सांख्य इत्यादि सहा दर्शनें; ब्राह्मादि अठरा पुराणें व भारत, रामायण इत्यादि इतिहास यांचें पूर्ण अध्ययन झालें. त्यांच्या अपूर्व बुद्धिमत्तेकडे पाहून बृहस्पति सुद्धां चकित

झाले. शुकांच्या बरोबरीचे सर्व विद्यार्थी मागें रेंगाळत राहिले. चवदा विद्या शुकांच्या कंठस्थ झाल्यामुळें, ब्रह्मचर्य व विद्वत्ता हीं त्यांच्या ठिकाणीं मूर्तिमंत भासूं लागलीं; सदाचारामुळें त्यांच्या मुखावर ब्रह्मवर्चस् तेज झळकूं लागलें; दृढनिश्चयी स्वभावामुळें त्यांची सर्वांना भीति वाटूं लागली; व त्यांना शिकविण्यासारखें कांहींच न राहिल्यामुळें आतां हे येथून जातील तर बरें असें बृहस्पतींच्याही मनांत आलें. शुकाचार्यांचे ठिकाणीं पूर्ण वैराग्य बाणल्यामुळें त्यांना "संपूर्ण जगदेव नंदनवनं"[१] असें झालें व त्यामुळें 'व्यासांचा आश्रम काय व बृहस्पतीचा आश्रम काय एकच. कोठें राहिलें ह्मणून काय सारखेंच' अशी त्यांची भावना झाली. झालेल्या विद्येचीच पुनः पुनः उजळणी करीत ते वृक्षाच्या छायेखालीं, भागीरथीच्या तीरीं, एखाद्या उंच शिलेवर किंवा उदकामध्येंच उभे रहात. त्यांना तहानभूकही लागेनाशी झाली. उपनिषदांतील, स्मृतींतील, पुराणांतील व भारतांतील कांहीं वाक्यें ह्मणून तें स्वतःशींच त्यांचा अर्थ करीत; स्वतःच शंका घेत व स्वतःच त्याचें समाधान करीत. त्यांना शास्त्रचिंतनावांचून कोठेंच कांहीं दिसेना व भासेना. निद्रा व आश्रमाचे आचार यांत जो कांहीं काल जात असे त्यावांचून इतर सर्व काल ते अध्ययनांत खर्च करीत. अध्ययन ह्मणजे केवल पाठ करणें असें तें समजत नसत. प्रिय वाचकांनों! ह्याप्रमाणेंच जर आपणही अध्ययन करूं लागलों तर केवढा अपूर्व लाभ होईल याची कल्पना करा.

---

१ सर्व जग हेंच नंदनवन आहे.

प्रथमतः पूर्ण अध्ययन, नंतर त्याचा दीर्घकालपर्यंत सतत विचार व शेवटीं अध्यापन अशी या वैदिक विद्येची परंपरा आहे. आपण यांतील एक तरी कृत्य पुरें केलें आहे का ? नाहीं. मग आह्मी दुसऱ्यांना उपदेश करितों तो कां ! शास्त्रीय शब्दांचे भलभलते अर्थ करण्याचा आह्मां अशास्त्रज्ञांना कसा अधिकार पोंचतो ? शुद्ध अज्ञान. यावांचून याला दुसरें कांहींएक कारण नाहीं. चवदा विद्यांचें अध्ययन करून मग त्या सर्वांची एकवाक्यता करणें जितकें प्रशस्त तितकेंच त्याच्या अभावीं भलभलते व कुत्सित विचार ठरविणें अप्रशस्त होय.

असो. ह्याप्रमाणें श्रीशुकांची एकाद्या अवधूताप्रमाणें अवस्था झाली आहे असें पाहतांच बृहस्पतींना मोठी भीति वाटली. महर्षि व्यास आपणास दोष देतील. ' तुह्मीं माझ्या मुलाच्या हिताकडे लक्ष्य पोंचविलें नाहीं ' असें ते ह्मणतील असें त्यांना वाटलें व त्यामुळें त्यांनीं लागलेंच त्यांचा समावर्तनविधि करून त्यांना पित्याकडे जाण्यास आज्ञा दिली. समावर्तनकालीं गुरूंना जी यथाशक्ति दक्षिणा द्यावी लागते ती शुकापासून न घेतां बृहस्पतींनीं "तुझ्या उत्तम आचरणानें व अध्ययनानें मी संतुष्ट झालों आहें. मला आतां आणखीं कांहीं नको. तुझ्यासारखे शिष्य मिळणें हाच आह्मांस अप्रतिम लाभ वाटतो " असें सांगितलें. गुरूंनीं आज्ञा दिल्यामुळें शुकाचार्य व्यासांच्या आश्रमीं परत आले. नियमाप्रमाणें अध्ययन करीत अस-

१ याला व्यवहारांत सोडमुंज ह्मणतात.

तांना एकाएकीं ही तेजस्वी मूर्ति आश्रमांत आल्याचें पाहून, आपल्या नित्य अध्ययनानें संतुष्ट झालेला हा मूर्तिमंत वेदच आला कीं काय असें व्यासांस वाटलें व ते आसनावरून उठून उभे राहिले. पण इतक्यांत त्या तेजस्वी व शांत पुत्रानें त्यांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. व " बाबा, हा आपला प्रिय पुत्र शुक आपणांस वंदन करीत आहे " असें ह्मटलें. हे अमृतासारखे मधुर शब्द ऐकतांच व्यासांच्या अंगावर शहारे आले. " बाळा, आयुष्मान् भव " असें ह्मणून त्यांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेविला; त्याला उठवून त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें; त्याला दृढ आलिंगन दिलें व कुशल प्रश्न विचारले. शुकांच्या तोंडून सर्व वर्तमान ऐकून घेतल्यावर व्यासांस मोठा आनंद झाला व पुष्कळ वर्षांनीं आपला कृतकृत्य झालेला पुत्र सुखरूपपणें येऊन भेटल्यामुळें त्यांनीं ईश्वराची मोठ्या प्रेमानें स्तुति केली.

इतक्यांत दुसऱ्या दिवसाच्या अग्निकार्याकरितां समिधा व दर्भ काढण्याची वेळ झाल्यामुळें व्यास शुकांसहवर्तमान त्या कामास लागले. समिधा काढीत असतांना शुकांनीं पूर्वींप्रमाणेंच येथें अजून गाई, हरणें येतात कीं नाहीं ? या ठिकाणचा वृक्ष काय झाला ? मी आपणाकरितां स्थंडिल कोठें करूं ? इत्यादि पित्याला प्रश्न केले. कारण, पित्याला व आपल्या जन्मभूमीला पाहून श्रीशुकाचार्यांची वृत्ति थोडीशी विक्षिप्त झाली होती. प्रेमाचा असाच प्रभाव आहे. त्यांत एकदां गुंतलें कीं सर्व-

त्याची हानि झाली असें निःसंशय समजावें. शास्त्रांमध्यें यालाच काम असें ह्मटलें आहे. असो. समिधा, दर्भ इत्यादि काढून झाल्यावर व्यास व शुक हे उभयतांही आपापल्या नित्य कृत्यांत निमग्न झाले.

---

## प्रकरण ४ थें.

### गृहस्थाश्रमाविषयीं व्यास व शुक यांचा संवाद.

दुसऱ्या दिवशीं सर्व प्रातःकृत्यें संपल्यावर व्यासांनीं शुकाचार्यांस शिकलेल्या सर्व विद्या ह्मणून दाखविणेंस सांगितलें. पित्याच्या आज्ञेप्रमाणें श्रीशुकांनीं सुमारें एक महिन्याच्या अवधींत चवदाही विद्या क्रमानें ह्मणून दाखविल्या. कोठेंही न चुकतां एकसारखें गंभीर ध्वनींनें पुत्रानें केलेलें पारायण श्रवण करून व्यासांनीं पुत्राची पाठ थोपटली व “धन्य आहेस; माझें कुळ तूं उद्धरून सोडिलेंस; तपश्चर्येचें मला फल मिळालें; शंकरांचा वर सत्य झाला” असें ह्मटलें. खरोखर असा विद्वान् व विनयसंपन्न पुत्र निपजणें हें पूर्वसुकृताचें व महत्तपाचेंच फल आहे. व्यासांनीं शुकाला आपल्या आश्रमांतच अध्ययन, चिंतन इत्यादिकांकरितां स्वतंत्र जागा करून दिली व ह्या उभयतां पितापुत्रांचे नियम पूर्ववत् सुरू झाले.

एके दिवशीं अग्निकार्यादि आटोपल्यावर अनध्याय असल्यामुळें व्यासांस अध्ययन करावयाचें नव्हतें; त्यामुळें त्यांनीं शुकास जवळ बोलाविलें व ते त्याच्याशीं बोलूं लागले. " शुका, ब्राह्मणाची सर्व विद्या तूं संपादन केली आहेस; तुझ्या गुरूनींही तुला मोठ्या संतोषानें गृहस्थाश्रमाचा स्वीकार करण्याविषयीं आज्ञा दिली आहे व प्रस्तुतकालीं तूं स्नातक अवस्थेंत आहेस. यास्तव, योग्य, सुस्वरूप, उत्तम कुलांत निर्माण झालेली, उत्तम लक्षणयुक्त व गृहकर्मांत कुशल अशी एक मुनिकन्या पाहून तिच्याशीं तुझा विवाह करावा अशी माझी इच्छा आहे. हे महाबुद्धिमान् पुत्रा, सर्व विद्या शिकून झाल्यावर पुरुषानें विवाह करावा, असें शास्त्रवचन आहे; हें तुला ठाऊक आहेच. यास्तव, गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून तूं नानाप्रकारें देव व पितर यांना तृप्त कर आणि, हे बालका, त्याच्या योगानें मला ऋणांतून मुक्त कर. ज्याला पुत्र नाहीं त्याला उत्तम गति मिळत नाहीं. स्वर्ग तर निःसंशय मिळत नाहींच. तस्मात्, तूं स्वतःच्या व माझ्या हिताकरितां गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर. तुझा विवाह झाला ह्मणजे मला समाधान वाटेल. बाळा, प्राकृत लोकांना अज्ञ पुत्रांचा सुद्धां विवाह झाल्यावर किती धन्यता वाटत असते बरें! मग तुजसारख्या उत्तम पुत्राचा विवाह झाल्यावर मला ती नाहीं कां वाटणार ? आपल्या मुलाचा कसा तरी एकदां विवाह व्हावा असें प्रत्येक पित्याला व विशेषतः मातेलाही वाटत असतें. पुत्रा, तुला माता नाहीं;

चारी आश्रम, वानप्रस्थाश्रम व चतुर्थाश्रम हे सर्वही आश्रम कष्ट देणारे आहेत. यास्तव, शुका, माझें ऐक. मी राजाची प्रार्थना करून द्रव्य आणतों. तुला गृहस्थाश्रमांत राहून यत्किंचित् सुद्धां दुःख होणार नाहीं." हें व्यासांचें भाषण ऐकून शुकांना मोठें आश्चर्य वाटलें व–शब्द व ज्ञान यांमध्यें महदंतर असतें–हा सिद्धांत समजला. व्यासांनीं अनेक शास्त्रांचें पर्यालोचन केलें; अनेक पुराणें रचलीं; भारतासारखा विस्तृत व अनेक परिस्थितींनीं पूर्ण असा इतिहास लिहिला. पण त्यापासून त्यांना कांहीं लाभ झाला नाहीं असें त्यांना आतां तर निःसंशय वाटलें. कारण, यावेळीं व्यास हे शुद्ध प्राकृताप्रमाणें भाषण करीत होते. पण या त्यांच्या भाषणांत–शुकांना न समजलेल्या गोष्टींचा अप्रत्यक्षपणें उपदेश करावा–हा हेतु होता. असो. आपल्या प्रेमळ पित्याचे हे पूर्ण व्यवहारिक विचार ऐकून पुनरपि शुक ह्मणतात "बाबा, या मनुष्य लोकामध्यें सुख ह्मणून कांहीं पदार्थ आहे का? कीं अज्ञानी लोक दुःखालाच सुख मानीत आहेत? महाराज, दुःखाचा कमीपणा किंवा तीव्र वेदनांचा अभाव यालाच प्राणी सुख असें ह्मणतात. पण आमच्यासारखे पंडितही जर तसेंच ह्मणूं लागले तर ज्ञानी व अज्ञानी यांमध्यें काय अंतर राहिलें? अहो बाबा, विवाह करून मीं स्त्रीच्या अधीन होऊन रहावें अशी का आपली इच्छा आहे? मी आज जसा स्वतंत्र आहें तसा विवाह केल्यावर राहीन का? मीं उत्तरमीमांसेचें गुरूपासून ग्रहण केलें असून त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय

केला आहे. त्या माझ्या निश्चयापासून मीं भ्रष्ट व्हावें अशी का आपली इच्छा आहे ? विवाह केल्यावर मी परतंत्र होईन ! व विषयांच्या लालसेनें स्त्रीजित[1] होईन; मग मला सुख कोठलें ? बंदिशाळेंत पडलेला मनुष्य दिवसमर्यादा भरल्यावर तरी सुटेल अशी आशा असते, पण या स्त्रीपुत्ररूप पिंजऱ्यांत पडलेला प्राणी तीं जिवंत असेपर्यंत सुटणें शक्य आहे का ? स्त्री हा पदार्थ शुद्ध जरी असता तरी मीं आपलें ह्मणणें मान्य केलें असतें. पण, महाराज, तसा प्रकार नाहीं. कोणताही का देह घ्याना, तो अपवित्र आहे. त्यांत रक्त, मांस, अस्थि, स्नायु, मज्जा, शोणित, शुक्र, विष्ठा, मूत्र, स्वेद, लाला इत्यादि घाण पदार्थ भरलेले आहेत. तेव्हां अशा पदार्थाचा मी कसा स्वीकार करूं ? माझ्यासारख्या वेदवेत्त्यानें एकाद्या प्राकृताप्रमाणें ग्राम्य व्यवहार व मांसमीमांसा करीत राहणें योग्य आहे का ? महाराज, मी अयोनिसंभव आहें. ह्मणजे मला जन्माच्या वेळीं सुद्धां जर स्त्रीची गरज लागली नाहीं, तर आतां क्षणिक सुखाकरितां मीं तिचा स्वीकार करावा हें योग्य आहे का ? मला अजूनपर्यंत स्त्रीचा स्पर्श झालेला नाहीं व तो तसाच आजन्म न व्हावा अशी माझी इच्छा आहे. अहो महर्षे, आत्मसुख टाकून मीं हें विष्ठेसारखें घाणेरडें सुख भोगावें असें का आपणांस वाटतें ? पण, बाबा, मी आपणास माझा निश्चय सांगून ठेवितों. मीं सर्वदां आपल्या आत्म्याशीं खेळत राहणार;

---

१ स्त्रीनें जिंकलेला; स्त्रैण.

त्याच्याशींच गोष्टी बोलणार; त्यालाच उपदेश करण्याविषयीं विनंति करणार व सर्वदां त्याचाच सहवास करणार. मला ती स्त्री नको; ते पुत्र नकोत; त्या त्यांच्या यातना नकोत; तीं आश्रमकृत्यें नकोत व तो मोठेपणाही नको. मी हातावर भिक्षा घेणार व ती तोंडांत सांठविणार ! भूमीचा उत्तम पलंग करून, त्यावर दर्भांची शेज रचून, आकाशाचें पांघरुण घेणार! माझें कांहीं अडावयाचें नाहीं. कारण, अरण्यांतले झरे माझी तहान भागवितील; वृक्ष व वेली क्षुधा शांत करतील; हे हात सेवा करतील; पाय मला वृक्षांच्या तळीं पडलेलीं फळें व पानें जमविण्याकरितां घेऊन जातील; आणि जठराग्नि माझ्याकरितां पाक करील. या जगांत मला अन्य कोणाचेंही साह्य नको व तें मीही कोणास करणार नाहीं. मला जगांत एका माझ्या आत्मारामावांचून अन्य कोणाचीही भीति नाहीं व मलाही कोणीं भिऊं नये. या जगांत माझें कोणी नाहीं व मीही कोणाचा नव्हे. बाबा, आपलें मजवर अत्यंत प्रेम आहे; मी जेव्हां अज्ञ होतों तेव्हां मला आपण जिवापलीकडे संभाळलेंत हें मी विसरलों नाहीं; मातापितरांचे अर्भकावर कसे उपकार होतात हें मला माझ्या आचार्यांनीं सांगितलें आहे; पण माझें मन मला या सृष्टिरूपी बंदिशाळेंत पडूं देत नाहीं; मला हें सर्व जग शून्य असल्यासारखें भासतें; ईश्वराच्या ज्ञानरूप निराकार मूर्तीकडे सारखें अनुसंधान ठेवून रहावें असें वाटतें व त्यावेळीं मला जें सुख होतें तें खरोखर अवर्णनीय आहे. मला कोण-

ताही प्राणी माझ्यापेक्षां निराळा दिसत नाहीं; हरिण, गाय, मयूर, कोकिल इत्यादि नित्य सहवासांतले प्राणी सुद्धां मला अलीकडे ओळखतां येत नाहींत. त्यांच्या आकाराकडे जों पाहूं लागावें तों तो खोटा दिसतो व त्यांच्या शरीरांतील गूढ भगवानाचेंच मला दर्शन होतें. मला माझे नित्य विधि सुद्धां नकोतसे वाटतात. भागीरथींत स्नान करावें; कुंडांतील भस्म अंगाला नख-शिखांत फांसावें व एकांतांत नेत्र मिटून हृदयस्थ नियंत्याला पहात असावें, असें वाटतें. त्याच्या दर्शनापुढें मला हें सर्व जग तुच्छ वाटतें. मग त्यांतील वैषयिक सुखही तुच्छ वाटावें यांत नवल तें काय? महाराज, मी आपला आज्ञाधारक पुत्र आहें. आपणांस दुःखांत लोटावें अशी माझी इच्छा नाहीं; पण, बाबा, मज दीनावर कृपा करा. मला स्त्रीपरिग्रह करण्याविषयीं आग्रह करूं नका. त्यापासून उभयतांनाही दुःख होणार आहे."

व्यासांनीं आपल्या विद्वान् पुत्राच्या तोंडून निघालेले हे शब्द ऐकिले. ते ऐकून वस्तुतः त्यांना मोठा गहिंवर यावयास पाहिजे होता व आपलें हें अभागी पोर बिघडलें असें वाटावयास पाहिजे होतें; पण तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. कारण, आपल्या तरुण मुलाचें हें वैराग्य तीव्र आहे कीं व्यवहारिक अल्लड मुलांप्रमाणें तें क्षणिक आहे हें लक्ष्यपूर्वक पहाण्याकडे त्यांचें मन गुंतलें होतें. असो. ह्याप्रमाणें शुकांचें भाषण ऐकून घेऊन व्यास पुनः दीनवदन करून ह्मणतात

" शुका, तूं ह्मणतोस खरें; या व्यवहारांत स्वतःच्याच तृष्णा दोषानें बद्ध होणें अत्यंत हानिकर आहे हें मला मान्य आहे. पण, बाचारे, आजन्म नैष्ठिक ब्रह्मचर्य संभाळणें फार कठिण आहे. अरे वेड्या, मोठमोठे निग्रही पुरुष सुद्धां आजपर्यंत पुष्कळ वेळां ब्रह्मचर्यापासून भ्रष्ट झाले आहेत व लोकांमध्यें त्यांची अखंड अपकीर्ति राहिली आहे. बृहस्पतीसारख्या तुझ्या गुरूंनीं सुद्धां जर गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला आहे तर तूं तो न करणें प्रशस्त नव्हे. शिवाय माझें अंतःकरण तुझा विवाह न केल्यास प्रसन्न रहाणार नाहीं व पित्याचें अंतःकरण तळतळत असतांना धर्माचरण करणें हें पुत्राचें कर्तव्य नव्हे. यास्तव, बाळा, असें खुळ्यासारखं करूं नकोस; माझें ऐक. तुझें कल्याण व्हावें ह्मणूनच मी तुला विवाहाविषयीं आग्रह करीत आहें. गृहस्थाश्रम स्वीकारून यज्ञादि न केल्यास तुला उत्तम गति मिळणार नाहीं. " हें व्यासांचें प्रेमळ भाषण शुकाचार्य खालीं मान घालून लक्ष्यपूर्वक ऐकत होते. त्यांच्या भाषणाकडे यांचें लक्ष्य इतकें वेधलें होतें कीं तें केव्हां संपलें हेंही शुकांस समजलें नाहीं. व्यास उत्तराची वाट पहात कांहीं वेळ स्तब्ध बसले आहेत असें पाहून शुकाचार्यांनीं आपलें मस्तक वर करून पित्याच्या मुखाकडे पाहिलें व दीर्घ उच्छ्वास सोडून त्यांना ह्मटलें "बाबा, बृहस्पति माझे आचार्य व ह्मणूनच ते मला अत्यंत पूज्य आहेत. मी त्यांच्यापासून सर्व विद्या शिकलों व त्यांच्याच उपदेशानें तृप्त झालों. मी त्यांना ' गुरु ' या दृष्टीनें कधींही

दोष देणार नाहीं व तो कोणत्याही शिष्यानें देऊं नये; हा सनातन धर्म आहे. पण, महाराज, ते सुद्धां गृहरूपी समुद्रांत बुडाले आहेत. ते माझे विद्यागुरु आहेत हें खरें, पण अविद्येनें त्यांचें मन ग्रासून टाकिलें आहे. तेव्हां ते मला या संकटांतून कसे सोडवितील ? रोगग्रस्त वैद्यानें जशी दुसऱ्या रोग्याची चिकित्सा करावी तसाच हा प्रकार होणार आहे. अहो, दरिद्री कधीं कोणाला श्रीमंत करील कां ? महाराज, मी मुमुक्षु[1] आहें. गृहस्थाश्रम ही माझी विटंबनाच आहे असें मी समजतों. त्या आश्रमांत मला सुख होणार नाहीं; माझ्या हातून आश्रमकृत्यें यथाविधि होणार नाहींत; माझ्या गृहांतून अतिथि निराश होऊन जातील; माझ्यापासून स्त्रीला सुख होणार नाहीं व त्यामुळें मी ऐहिक व पारलौकिक सुखालाही मुकेन. आपण माझे जनक आहां ! माझें अनहित व्हावें अशी जर आपली इच्छा असेल तर मला हें कृत्य करण्यास सांगा. बाबा, मला गुरुजींनीं वेद शिकविले; त्याचें विवरण करून अर्थ सांगितला; पण त्याच्या श्रवणानें माझें समाधान झालें नाहीं. वेदांतील यज्ञयाग हिंसात्मक असल्यामुळें ते मला नकोतसे वाटतात. आतां ती हिंसा वेदप्रोक्त असल्यामुळें व हिंसकांचा उदरभरण हा स्वार्थी हेतु त्यांत नसल्यामुळें तिच्यापासून पाप जरी लागत नसलें, तरी प्राण्याला प्रत्यक्ष होणारे क्लेश माझ्यानें पाहवत नाहींत. शिवाय हिंसायुक्त वेदांपासून स्वर्गलोकाचीच

---

१ मोक्षाची इच्छा करणारा.

प्राप्ति होणार कीं नाहीं ? पण मला तो लोक नकोच आहे मला आत्मसाक्षात्कार व्हावयास पाहिजे आहे व जर मीं गृहस्थाश्रम स्वीकारला तर मी त्याला सर्वथैव मुकणार आहें. यास्तव, दयानिधे ! मज अर्भकाचें रक्षण करा. मला या संसाररूपी सर्पाची मोठी भीति वाटत आहे. बाबा, भित्र्या मुलांचें बापच रक्षण करितातना ? या घोर संसारामध्यें मी पडलों कीं रथाच्या चाकाप्रमाणें किंवा वावटळींतल्या सुकलेल्या पानाप्रमाणें माझी अवस्था होईल. सूर्याला जशी कधींच विश्रांति मिळत नाहीं, त्याप्रमाणें मलाही ती कधींच मिळणार नाहीं. स्त्रियांच्या मोहांत सांपडलेला पुरुष कळसूत्री बाहुलीप्रमाणें परतंत्र होतो असें सर्व गृहस्थाश्रमी पुरुष सांगतात. गृहस्थाश्रमाचा विषयोपभोगाकरितांच स्वीकार करावयाचा ना? मला तें नको आहे. बाह्यसुख दुःखपर्यवसायी आहे असें मी वेदांतशास्त्रांत वाचलें आहे. इंद्रियें व विषय यांच्या संसर्गानें होणारें सुख त्यांचा संबंध असेपर्यंतच होणार व त्यांचा वियोग झाला असतां तेंही नष्ट होणार हें उघड आहे. पण नित्य सुखाची स्थिति तशी नसते. तें स्वतः-सिद्ध असल्यामुळें त्याला निमित्ताची गरज नसते. यास्तव, बाबा, आत्मतत्त्वविचारापेक्षां संसारामध्यें सुख आहे हें ह्मणणें मला मान्य नाहीं. कांहीं अभाग्यांना विषयमय संसारांत सुख वाटत असतें खरें; पण तें विष्ठेंत लोळ-णाऱ्या किड्यांच्या सुखाप्रमाणेंच आहे. वेद व शास्त्रें यांचें अध्ययन करूनही जो संसारांत आसक्त होतो त्याच्या-

इतका मूर्ख अन्य कोणीही नाहीं. खरोखर असले पुरुष कुत्रीं, डुकरें, घोडे इत्यादिकांचे आप्तच आहेत. अहो, अत्यंत दुर्लभ असा मनुष्यदेह प्राप्त झाला असून जे योग्य अध्ययन करीत नाहींत ते नराकृति पशुच होत आणि वेदशास्त्रांचें अध्ययन करून जे संसारांत आपल्याच हातानें आपणांस बांधून घेतात ते तर अवाच्य आहेत. पुत्र, स्त्री, गृह इत्यादिकांचे ठिकाणीं जो पंडित आसक्ति ठेवितो त्याची लोकांत निंदा होते. खरोखर अशा पुरुषांनीं विषयासक्त होणें हें एक मोठें आश्चर्यच आहे. अथवा त्यांच्या त्या विद्येचा त्यांना किंचित्‌ही उपयोग नाहीं असें ह्मणावें लागतें. बाबा, मला असें वाटतें कीं, भाराभर पुस्तकें पढलेला पुरुष खरा विद्वान् नव्हे. तर मायेच्या सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांच्या योगानें जो संसारांत बद्ध होत नाहीं तो विद्वान् होय. बुद्धिमान् असें त्यालाच ह्मणावें. खरोखर पहातां शास्त्रांमध्यें तोच पारंगत होय. अहो, अभिमानाच्या योगानें अधिक बद्ध करण[१] हें विस्तृत अध्ययन काय करावयाचें आहे? ज्याच्या योगानें जीव बंधांतून मुक्त होईल तेंच अध्ययन करावें. शरीराला झिजविणारें, नेत्रांना क्षीण करणारें, आयुष्य कमी करणारें, दुराभिमान वाढविणारें व विषयलालसेंत पुरून टाकणारें, हें केवल व्यवहारालाच उपयोगीं पडणारें अध्ययन कांहीं उपयोगीं नाहीं. महाराज, मला गृह या शब्दाची सुद्धां भीति वाटते. कारण, पुरुषाचें जें सुस-

१ उल्लेख न करण्यासारखे.

रीप्रमाणें ग्रहण करितें ( धरितें ) तें गृह अशी त्याची व्युत्पत्ति आहे. व त्यामुळें त्यानें एकदां धरलें कीं प्राण जाई तों तें मला सोडणार नाहीं; असें मला निःसंशय वाटत आहे. अहो, बंदिशाळेंत पडलेल्या कोणाला तरी सुख आहे का ? खरोखर जे अज्ञानी असतात, ज्यांची मति मंद असते; व ज्यांचें दैव फिरलेलें असतें, त्यांनाच या संसारबंधांत पुनरपि पडण्याची इच्छा होते. यास्तव, जनका, मज दीनावर करुणा करा; मी तुमचे घट्ट पाय धरितों; मी आपणांस शरण आलों आहें; मला वर काढा ! बाबा, मला या अफाट समुद्रांत बुडवूं नका. ”

ह्याप्रमाणें विह्वल होऊन शुकाचार्य प्रार्थना करूं लागले असतां व्यासांना त्यांची करुणा आली. पण हा आपला पुत्र मार्ग चुकत आहे; भलत्याच मार्गाला सन्मार्ग समजत आहे; आपल्यास योग्य नसलेल्या आश्रमाचा स्वीकार करूं पहात आहे हें पाहून त्याच्या कल्याणाच्या इच्छेनें व्यास पुनः ह्मणाले “ शुका, अरे, तूं एवढा विद्वान् असतांना हें वेड्यासारखें काय करितोस ? दाशरथि रामाप्रमाणें किंवा कौंतेय अर्जुनाप्रमाणें तुला मोह पडला आहे. भगवान् वसिष्ठांनीं व भगवान् शौरीनें त्यांचा जसा मोह घालविला तसा तुझा हा मोह कोण नाहींसा करील ? वायूनें ग्रस्त झालेल्या रोग्याला जशी कुशल वैद्य मात्रा देतो, तशी तुला या प्रसंगीं उपदेशामृताची गुटिका कोण चारील ? शुका, विवेक कर. तूं ज्ञानी आहेस हें मी जाणतों, पण त्या ज्ञानाचा आपल्या हिताकडे कसा

उपयोग करावयाचा हें, तुझें वय अल्प असल्यामुळें, तुला समजत नाहीं. शास्त्रकारांनीं विद्येप्रमाणेंच वयालाही जें एवढें महत्त्व दिलें आहे तें तरी एवढ्याचकरितां. शब्दज्ञानापेक्षां अनुभवाची योग्यता अधिक आहे. तुला शब्दज्ञान झालें आहे, पण अजून जगाचा अनुभव पूर्णपणें आला नाहीं. व त्यामुळेंच तुला संसाराची एवढी भीति वाटत आहे. अरे खुळ्या, संसार ही बंदिशाळा का आहे ? राजाचे सेवक अपराध्याला जसे बंदींत टाकितात तसा का तुला कोणी बंदींत घालीत आहे ? बंदींत कोण कोणाला घालणार ? जरी कदाचित् एकाद्यानें कोणाला बंदींत टाकण्याचा विचार केला तरी तो त्याच्या देहाला फार तर अटकेंत ठेवील ! देह कोठें का राहीना ! मन तर ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहे कीं नाहीं ? त्याच्यावर अन्य कोणाचा तरी अधिकार चालणार आहे का ? कधींच नाहीं. त्याच्यावर जर कोणीं अधिकार चालविलाच तर ती एक बुद्धिच चालवील. व ती सुद्धां केवळ आपल्याच मनाला अटकेंत ठेवील. तिला दुसऱ्याच्या मनावर अधिकार चालवितां येत नाहीं. वास्तव, शुका, पुढची विपत्ति टाळण्याकरितां तूं लौकिकांत गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर व अंतःकरणांत यति किंवा ब्रह्मचारीच रहा. बा शहाण्या, असें ज्याला करितां येतें तोच स्वहित साधतो. ही एक मोठी निपुणता आहे. यालाच ' **कर्मसु कौशलं** ' ह्म० कर्मातील कुशलपणा असें ह्मणतात. न्यायानें वित्त संपादन करून क्रमानें शास्त्रोक्तरीत्या वेदोक्त कर्मे करावींत;

श्रद्धायुक्त असावें व असत्यभाषण करूं नये. इतकें केल्यानें गृहस्थाश्रमी पुरुष सुद्धां मुक्त होतो. भगवीं वस्त्रें व मुंडन हींच मुक्तीचीं साधनें आहेत असें समजणें योग्य नव्हे. अरे बुद्धिमान् बाळा, मध्यान्हसमयीं ब्रह्मचारी, यति व व्रतस्थ वानप्रस्थ हे गृहस्थाकडे अन्नाच्या आशेनें येतात. प्राणतृप्तीकरितां अन्नसमर्पण करणाऱ्या गृहस्थाची योग्यता काय सांगावी ? गृहस्थाश्रमांत रहाणारे पुरुष या अतिथींचें व यतींचें पूजन करितात; त्यांना अन्न देतात आणि त्यांच्याशीं मृदु व सत्य भाषण करितात. खरोखर या कृत्याइतकें पुण्यकारक कृत्य कोणतेंही नाहीं. ज्या आश्रमांत अशा प्रकारचीं कृत्यें घडतात त्याला दोष देणें हा मोठा अपराध आहे. शास्त्रकार कोणत्याच आश्रमाला तुच्छ मानीत नाहींत. त्यांची सर्वांचे ठिकाणीं समदृष्टि आहे. ब्रह्मचर्यादि इतर आश्रम कष्टकर असल्यामुळें व त्यांपासून भ्रष्ट होण्याची पदोपदीं भीति असल्यामुळें गृहस्थाश्रमासारखा उत्तम आश्रम नाहीं असें स्मृतिकार ह्मणतात. वसिष्ठादि ज्ञानी आचार्यांनींही त्याचाच स्वीकार केला होता. अरे महाभाग्यवान् पुत्रा, वेदोक्त कर्में करणाराला स्वर्ग, मोक्ष, उत्तम कुळांत जन्म इत्यादिकांपैकीं कांहीं अशक्य नाहीं. त्याला जी जी इच्छा होते ती ती वेदनामक ईश्वर पूर्ण करितो. क्रमानें एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जावें. एकदम अविचार करून आश्रमाचें उल्लंघन करूं नये, असें धर्मज्ञानी सांगतात. यास्तव,

---

१ मस्तकाचें मुंडन करणें. २ दुपारीं बारा वाजतां.

हे धर्मज्ञ बालका, स्त्रीपरिग्रह कर, गृह्याग्नि ठेव, आळस न करितां आश्रमाला उचित असलेलीं सर्व कृत्यें कर, देव, पितर व मनुष्य यांचें शास्त्रोक्त रीतीनें तर्पण कर, धार्मिक पुत्र उत्पन्न कर आणि त्याला गृहस्थाश्रमामध्यें नियुक्त करून नंतर तूं वनांत जा. तेथें गेल्यावर सुद्धां उत्तम प्रकारें व्रताचरण करून शरीराला क्षीण करून टाक आणि इतकें सर्व झाल्यावर चतुर्थाश्रम स्वीकार. शुका, तुला ठाऊक नाहीं, मनासहवर्तमान हीं पांच ज्ञानेंद्रियें मोठीं बलाढ्य आहेत. अविवाहित पुरुषाला तीं उन्मत्त करून सोडितात; पुरुषाला तीं अपुरुष बनवितात; मनुष्याला तीं पशु करितात व विवेक्याला अविवेकी ठरवितात. यास्तव, बाळा, त्यांना स्वाधीन ठेवण्याकरितां विवाह कर. वृद्धावस्थेंत तीं शिथिल झाल्यावर तपश्चर्या करावी असें शास्त्रवचन आहे. शुका, तूं तर काय अजून लहान आहेस ! विश्वामित्रासारख्या निग्रही मुनीला सुद्धां त्यांचें दमन करितां आलें नाहीं. त्यांनीं आहार सुद्धां टाकून तीन हजार वर्षें तपश्चर्या केली पण व्यर्थ. मेनकेला पाहतांच ते मोहित झाले व तिच्याबरोबर पुष्कळ दिवस रममाण झाले. विश्वामित्रापासून तिच्या उदरीं शकुंतला जन्मली हें सर्वांना ठाऊक आहेच. माझा पिता पराशर कोळ्याच्या कन्येला पाहून मोहित झाला व त्यानें नावेमध्येंच तिच्याशीं क्रीडा केली. ब्रह्मदेव तर आपल्या कन्येलाच पाहून कामातुर झाला. सारांश, हा इंद्रियसमूह मोठा बलवान् आहे. यास्तव,

बाळा, तूं माझें ह्मणणें कबूल कर. मी तुझा उत्तम व कुल-शीलसंपन्न कन्येबरोबर विवाह करून देतों. गृहस्थाश्र-माचा स्वीकार करून तूं वेदमार्गाचें अवलंबन कर. "

व्यासांचें हें आग्रहाचें भाषण ऐकून शुकांना फार खेद झाला. पित्याची आज्ञा मोडावी तर त्यांचा अप-मान केल्यासारखें होतें व त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें विवाह करावा तर जन्मभर दुःखी व्हावें लागतें. तेव्हां आतां कसें करावें ? या संकटाचें निवारण कोण करणार ? पित्यांना असंतुष्ट करणें जसें बरें नव्हे, तसेंच स्वतःचें अकल्याण करून घेणेंही प्रशस्त नाहीं. इत्यादि अनेक विचार शुकाचार्यांच्या मनांत घोळूं लागले. श्रीव्यासांना आतां काय उत्तर द्यावें हेंच त्यांना सुचेना ! व्यास तर " शुका, बोलत कां नाहींस ? तूं असा कष्टी कां होतोस? " असे वारंवार प्रश्न करूं लागले. तेव्हां नाइलाज झाल्या-मुळें शुक ह्मणाले:—बाबा, गृहस्थाश्रम अत्यंत दुःख-दायक असल्यामुळें मी तो करणार नाहीं. स्त्रीचा परिग्रह केल्यावर मला द्रव्य मिळवावें लागेल. व याचना करण्याचा मला अजूनपर्यंत प्रसंग आलेला नसल्यामुळें मदोन्मत्त धनिकांच्या पुढें जाऊन त्याकरितां " द्याहो " असें ह्मणून हात पसरण्यापेक्षां मला मरण बरें वाटूं लागेल. खरोखर विद्वानालाही याचना करावयास लावणारा हा गृहस्थाश्रम मला शत्रूसारखा वाटतो. याचना केल्यावां-चून तर माझ्यासारख्याला द्रव्य मिळणें शक्य नाहीं. जगामध्यें दात्यांची संख्या अगदींच थोडी असल्यामुळें

पुष्कळ वेळां माझा अपमान होईल. " अहो, तुह्मी बरे पुष्ट दिसतां आणि असे भीक कां मागतां ? कोणाचे दोन उद्योग करून अन्न कां मिळवीत नाहीं. " असे ते हृदयभेदक शब्द बोलतील. दाते थोडे व याचक असंख्य अशी अवस्था झाली असतां ते पात्रापात्रविचार करण्यांत वेळ घालवीत नाहींत व असें झालें कीं योग्य पुरुषाचाही सहज अपमान होतो. तो सहन करण्यापेक्षां थोडेंसें ऐहिक सुख जरी सोडावें लागलें तरी तें मी सोडीन. अहो, द्रव्याच्या चिंतेनें व्याकुळ झालेल्यांना सुख कोठून मिळणार ? निर्धन असूनही जे विषयांविषयीं लोलुप होतात, त्यांना त्यांचे लोकच पीडा देतात. निःस्पृह यति जसा सुखी असतो, तसा त्रैलोक्याचें राज्य करणारा इंद्र सुद्धां नसतो. कारण, तपश्चर्या करणाऱ्या तपस्व्याकडे पाहून इंद्राला मोठें दुःख होतें व मत्सरबुद्धीनें तो त्याच्या तपांत अनेक विघ्नें आणतो; ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहेच. ब्रह्मदेव सर्व जगाचा उत्पादक असल्यामुळें सुखी असेल असें कदाचित् कोणाला वाटेल, पण तोही भ्रम आहे. कारण, तो स्वतंत्र नसून प्राण्याच्या कर्माधीन आहे. प्राण्यांचीं प्रारब्ध कर्में संपलीं कीं त्याला एकाद्या बंदिवानाप्रमाणें आपल्या कारणीमध्यें[1] लीन व्हावें लागतें व तीं फलोन्मुख[2] झालीं कीं कामास लागावें लागतें. बरें, प्रत्यक्ष लक्ष्मी ज्याला प्राप्त झालेली आहे त्या विष्णूला तरी सुख असेल ह्मणून ह्मणावें तर तसेंही नाहीं. कारण,

१ मूळ ठिकाणीं; अधिष्ठानांत. २ फल देण्यास तयार.

तिच्या संरक्षणाकरितां त्याला असुरांशीं अहोरात्र संग्राम करावा लागतो. खरोखर ज्याची सद्गुणी व सुस्वरूप स्त्री असते त्याला तिचें संरक्षण करण्याकरितां पुष्कळ प्रयास पडतात. अहो, रमापतीची जर ही स्थिति तर इतर क्षुद्रांची काय असणार हें उघडच आहे. तात्पर्य, कामी पुरुषाला सुखाचा लेशही प्राप्त होत नाहीं. या दुःखमय जगांत राहून सुद्धां जर कोणी उत्तम सुखाचा अनुभव घेत असला तर तो एक निःस्पृह दरिद्रीच होय. बाबा, या सर्व विपत्ति आपणांस ठाऊक असतांना स्ववीर्यापासून उत्पन्न झालेल्या पुत्राला आपल्याच हातानें त्यांत कां ढकलतां ? अहो, हा संसार महाघोर आहे, भयंकर यातना देणारा आहे, महाराज, यांत एकच का दुःख आहे ? जन्मकालीं होणारें दुःख, वृद्धावस्थेचें दुःख, मरणकाळच्या यातनांचें दुःख, मूत्र व विष्ठा यांनीं भरलेल्या गर्भाशयांत होणारें दुःख, रोगांचें दुःख, चिंतेचें दुःख, आधिभौतिक[1] दुःख, आधिदैविक[2] दुःख, निर्धनतेचें दुःख इत्यादि असंख्य दुःखें या संसारांत आहेत; व तीं सर्वही तृष्णेमुळें अधिक तीव्र व असह्य होत असतात. बाबा, सर्व वेद पढून व सर्व शास्त्रांचें अध्ययन करून जें मीं ज्ञान मिळविलें त्याचा धनिकांची स्तुति करण्याकडे का मी व्यय करूं ? छे ! मला मरण आलें तरी पतकरेल. पण ईश्वरा, तो प्रसंग नको. मला माझ्या

---

१ सुई, चाकू, कांटा, दगड, तरवार यांच्या योगानें होणारें.

२ अनावृष्टि, अतिवृष्टि, आग, पूर, वावटळ इत्यादिकांच्या योगानें होणारें.

उदरंभरणाची मुळींच चिंता नाहीं. मी तें पानें, मुळें व फळें यांच्या योगानें किंवा अन्य कोणत्या तरी उपायानें भरीन व त्यांतच मला अत्यंत संतोष होईल. बाबा, स्त्री, अपत्यें, अपत्यांचीं अपत्यें, त्यांचे संबंधी इत्यादिकांच्या योगानें कुटुंब वाढलें असतां त्यांच्या तृप्तीमध्यें गुंतलेल्या फुटक्या नशीबाच्या मनुष्याला उत्तम सुख कोठून मिळणार ? यास्तव, कृपानिधे, मला उपासनाशास्त्र व ज्ञानशास्त्र सांगा. त्याच्या योगानें मला अत्यंत सुख होईल. हिंसामय कर्मकांडामध्यें माझें मन रमत नाहीं. त्याच्या योगानें माझ्या अंतःकरणांत प्रसन्नता उत्पन्न होत नाहीं. बाबा, माझ्या कर्मांचा ज्याच्या योगानें क्षय होईल असा कांहीं मला उपाय सांगा. स्त्रीपरिग्रह करण्याविषयींच जर पुनः आपण मला सांगाल तर तें मी ऐकणार नाहीं. कारण, स्त्री जळूप्रमाणें पुरुषाच्या अंगांतील रक्त शोषून घेत असते. पण, महाराज, त्यांच्या मोहक चेष्टांनीं आतुर झालेला मूर्ख पुरुष हें जाणत नाहीं. स्त्रिया भोगांच्या योगानें पुरुषांच्या वीर्याचा व धनाचा क्षय करितात व कुटिल भाषणाच्या योगानें मन हरण करितात. खरोखर मला असें वाटतें कीं, निद्रा व सुख यांचा नाश करण्याकरितांच मूर्ख पुरुष स्त्रियांचा स्वीकार करीत असतात. हर ! हर ! दैव फिरलें असतां विचारी मनुष्य प्राणी सुद्धां दुःखाला सुख मानूं लागतो !! दैवा, केवढें तुझें सामर्थ्य हें ! ”

असें बोलून व्याकुळ झालेले शुकाचार्य भूमीवर मस्तक

टेंकून पडले. इकडे पुत्राचें हें मोहयुक्त भाषण ऐकून व्यासांनाही फार खेद झाला व 'अभिमानी विद्वान् पुत्रापेक्षां भाविक अविद्वान् पुत्र बरा' असें त्यांना त्यावेळीं वाटलें. शुकाचार्यांचें हें प्रस्तुत वैराग्य जरी खरोखरीच तीव्र होतें, तरी तें पूर्ण तारुण्यावस्थेंत तसेंच राहील अशी खात्री नव्हती; व त्यामुळें व्यास त्यांना विवाहाविषयीं आग्रह करीत होते. असो. व्यास मोठ्या चिंतेंत पडले. पुत्राचा हा मोह घालविण्यास काय उपाय योजावा हें त्यास सुचेनासें झालें. आपल्या विद्वान् पुत्राचें विपरीत भावनेमुळें अकल्याण होणार ही गोष्ट मनांत येतांच दुःखामुळें त्यांच्या नेत्रांतून टपटप अश्रु गळूं लागले. माझ्या वीर्यापासून उत्पन्न झालेल्या ह्या सुकुमार पुत्राची आतां पुढें विटंबना होणार ना ? हा विचार मनांत येऊन अंगाला कंप सुटला, मन स्तब्ध झालें आणि ते डोळे मिटून मागच्या भिंतीला डोकें टेंकून स्वस्थ बसले. बराच वेळ गेल्यावर शुकाचार्य जों वर मान करून पहातात तों व्यासांची ही शोचनीय स्थिति त्यांच्या नजरेस पडली. —आपल्या जनकाला आपल्याकरितां हा एवढा शोक झाला— हें मनांत येतांच त्यांनाही मोठा खेद वाटला व ते त्यांच्या जवळ जाऊन ह्मणालेः—'हरहर ईश्वरा, तुझी माया केवढी अनिवार आहे ही ? अहो, जी अलौकिक पंडिताला सुद्धां अशाप्रकारें मोहित करिते तिचें सामर्थ्य काय वर्णावें ? अहो, हा माझा पिता सर्वज्ञ व वेदान्ताचा कर्ता असतांना त्याला सुद्धां अवंश[1] करून टाकणारी ती माया

---

१ परतंत्र.

कोणची ? कशी आहे ? कोठें रहातें ? व यच्चयावत् सर्व पुरुषांना कसा मोह पाडते ? हें समजत नाहीं. खरोखर या सत्यवतीपुत्राला सुद्धां मोहित करणारी ती देवी अति दुर्घट असली पाहिजे. अहो, ज्यानें पुराणें व भारत रचलें, वेदाचे भाग केले व या दुर्लंघ्य मायेच्या तडाक्यांत कोणीं सांपडूं नये ह्मणून असंख्य उपाय सांगून ठेविले, तोच हा माझा पवित्र पिता आज तिच्या अधीन झाला ! ! शिव, शिव ! देवि, मातोश्रि, हे जगज्जननी माये, मी तुला साष्टांग प्रणाम करितों. मी तुला शरण आलों आहें. या जगांत सर्व पुरुषांना तूं हतवीर्य करून सोडिलें आहेस. ह्मणून मी तुलाच मात्र एक पुरुष ह्मणतों. ब्रह्मदेवादि सर्व पुरुष तुझ्यापुढें चाकराप्रमाणें हात जोडून उभे आहेत; यास्तव, मी तुला त्यांची स्वामिणी ह्मणतों. या मायेच्या अधीन न झालेला असा एकादा तरी प्राणी या जगांत आहे का ? वाहवा ! काय या मायेचें बल[1] ! केवढें सामर्थ्य[2] ! अहो, प्रत्यक्ष विष्णूला सुद्धां या विलक्षण शक्तीनें स्वाधीन करून घेतलें ! ! हा माझा पिता विष्णूचा अंश आहे असें पौराणिक ह्मणतात. पण तो सुद्धां या मोहरूपी समुद्रामध्यें आज बुडाला आहे. काय चमत्कार आहे, कीं एकाद्या अडाणी माणसाप्रमाणें हा नेत्रांतून अश्रु ढाळीत बसला आहे. पण असा विचार करीत नाहीं कीं मी कोण ? हा कोण ? हें जगत् काय आहे ? प्राण्यांना भ्रम कसा होतो ? व ह्या पांच भूतांच्या विकारात्मक[3] देहाचे ठिकाणीं पिता, पुत्र,

---

१ अंगसामर्थ्य. २ वीर्य. ३ विकाररूप, कार्यरूप.

स्त्री, मित्र, इत्यादि भावना करणें कितीसें युक्त आहे ? हा सर्व प्रकार पाहून मला एकच गोष्ट समजते. ती ही कीं 'माया, माया' ह्मणून जी कोणी आहे ती एक बलाढ्य शक्ति होय; व प्राणी तिच्या अधीन असतो. त्याला तिचें उल्लंघन करितां येणें हें एक अलौकिकच कृत्य आहे." असो. ह्याप्रमाणें अनेक खेदकारक उद्गार काढून शुक पित्यास ह्मणाले:—"बाबा विवेक करा. आपण पराशरांचें पुत्र आहां; महाभाग्यशाली आहां; सर्वांना उपदेश करण्याचा आपला अधिकार आहे. असें असतांना हे जनका, आपण असा शोक कां करितां ! अहो 'परोपदेशे पाण्डित्यं'[1] हें स्वतःचेंच वचन खरें करून दाखवितां कीं काय ? महाराज, कलियुगामध्यें 'कुशला ब्रह्मवार्तायां'[2] अशाप्रकारचे लोक होणार आहेत असें जें आपण भविष्य केलेंत तें उदाहरणानें आजच सिद्ध करितां कीं काय ? माझ्यासारख्या अर्भकानें अपणांस उपदेश करावा असें नाहीं. पण प्रसंग आलाच आहे ह्मणून बोलतों. 'मी आपला पुत्र आहें" असें आपणांस वाटत असल्यामुळेंच आपण आज खेद करीत आहां हें खरें; पण मी पूर्वीं कोठें होतों ? व कोणाचा पुत्र होतों ? 'सर्वे वयमतः परं'[3] असें जें सिद्धान्ताचें वाक्य आहे, त्याप्रमाणें पाहिलें असतां मी पूर्वींसुद्धां कोणाचा तरी पुत्र होतोंच हें निःसं-

१ दुसऱ्यांना उपदेश करण्यांत मोठें कौशल्य. २ ब्रह्माविषयीं वाच्यता करण्यांत मोठे निपुण; पण आचारशून्य व विषयी. ३ आह्मी सर्व या स्थूलाच्या पलीकडे आहों.

शय आहे. तेव्हां आजपर्यंत अनेक पित्यांना अशाप्रकारें मीं रडविलें असेल व मींही त्यांच्या करितां रडलों असेन. म्हणजे रड ही आमच्या नशीबींच लागली आहे. ती सुटण्याचा एकच मार्ग मला दिसतो व तो—मी कोणाचा कोणी नव्हे असें मनापासून समजणें—हाच आहे. बाबा, खरोखरीच जर पाहूं लागलें तर यदृच्छेनें केव्हां तरी निर्माण होणाराचा व केव्हां तरी नाश पावणाराचा तसल्याच दुसऱ्या पदार्थाशीं नित्य संबंध कसा होणार ? पित्यानें प्राणी निर्माण झाल्यावर हा माझा पुत्र व पुत्रानें समजूं लागल्यावर हा माझा पिता असें मानणें हा शुद्ध व्यवहार आहे. यापेक्षां त्याला अधिक नांव देतां येत नाहीं; व तें शोभणारही नाहीं. व्यवहार तर अव्याहतपणें कधीं चालत नसतो. यास्तव, बाबा, धैर्य धरा. असे खिन्न होऊं नका. माझें हित व्हावें अशी आपली खरी इच्छा आहेना ? मग या मोहांत सांपडून मला या संसाररूपी खाईंत कां ढकलूं पहातां ? वस्तुतः पित्याला पुत्राचा कोणता उपयोग आहे ? त्याला जर क्षुधा लागली तर ती भक्ष्यानें निवृत्त होत असते; मुलाच्या तोंडाकडे पाहून होत नाहीं. बरें त्याला तहान लागली तर ती सुद्धां जलपानानेंच शांत होते. सुगंधी पदार्थानें त्याच्या घ्राणाला सुख होतें; मधुर भाषण श्रवण केल्यानें कर्णाला सुख होतें व स्त्रीसुख स्त्रीपासून मिळतें. यांपैकीं एकाही गोष्टींत पुत्राचा उपयोग होत नाहीं. मग माझ्याकरितां आपणांस इतकें दुःख कां होतें. अजीगर्तानें आपला पुत्र हरिश्चंद्राला

विकला व हरिश्चंद्रानें त्याला यज्ञस्तंभाला बळी देण्याकरितां बांधिलें; हें आपणांस ठाऊक आहेच. पित्याला पुत्र जर खरोखरीच प्रिय असता तर त्यानें द्रव्याकरितां त्याला विकलें असतें का ? सारांश, कोणी कोणाला प्रिय नाहीं. ज्याची त्याची इच्छा ज्याला त्याला प्रिय ! पित्याला पुत्र किंवा पुत्राला पिता प्रिय कोठपर्यंत, प्रसंग आला नाहीं तोंपर्यंत. प्रसंग आला असतां सर्व सर्वांना अप्रिय होतात. व्यावहारिक सुखाचें साधन द्रव्य आहे; व तें असलें कीं इतर सर्व सुखें मिळतात. यास्तव, बाबा, आपणांस सुखाचा लोभ सुटला असेल तर द्रव्य मिळवा. माझ्यासारख्या भिकारी पुत्राला घेऊन आपणांस काय लाभ व्हावयाचा आहे ? बाबा, मला विवाह करण्याविषयीं सांगूं नका. ह्यावांचून अन्य कोणतीही गोष्ट मला सांगा. मी ती निःसंशय करीन. आपण ज्ञानी आहां. यास्तव, हे मुनिश्रेष्ठा, मला उपदेश करा. जन्म, मृत्यु, जरा, व्याधि इत्यादिकांच्या निमित्तानें होणाऱ्या दुःखापासून व गर्भवासापासून माझी सुटका कशी होईल तें मला सांगा. अनेक स्थावरजंगम योनि फिरून मी या मनुष्ययोनींत, छेः छेः ब्राह्मणाच्या वीर्यापासून व गर्भवासावांचून निर्माण झालों आहे. यास्तव, या उत्तम जन्माचें सार्थक करावें असा माझा विचार आहे. अहो, जे ब्राह्मणाच्या कुलांत निर्माण झालेले नसतात, त्यांना ब्राह्मणाकडे पाहून मोठी हळहळ वाटते; व येन केन प्रकारानें प्रसिद्ध होण्याच्या इच्छेनें ते ब्राह्मणशब्दाचा विपर्यास करितात; आणि

त्यांच्या योग्यतेचे आह्मी आहों, अशी ते व्यवहारांत द्वाही सुद्धां पिटतात. मग अनायासानें प्राप्त झालेल्या या माझ्या उत्तम जन्माचा मीं कां उपयोग करून घेऊं नये ? बाबा, मीं पुष्कळ विचार करून पाहिला; अनेक तऱ्हेंनीं मनाची समजूत घातली. अरे वेड्या मना, पित्याला दुःख देऊं नकोस, त्यांना दुःख देऊन तुझें कल्याण होणार नाहीं; असें परोपरीनें सांगितलें. पण व्यर्थ. मी बद्ध आहें ही समजूत बदलत नाहीं; संसार करावा अशी वासना होत नाहीं व त्रिगुणात्मक वैदिक क्रियेंत निमग्न व्हावें हें आवडत नाहीं. यास्तव, माझ्या जनका, अहो सर्वज्ञ नारायणा, मला तारा. माझें संरक्षण करा. खरोखर मी या भयंकर सागरांत बुडून फुकट मरत आहें."

ह्याप्रमाणें अगदीं गहिंवरून उच्चारलेले शब्द ऐकतांच व्यासांनीं डोळे उघडले; आपल्या प्रिय पुत्राला जवळ घेतलें; त्याच्या अंगावरून हात फिरविला व ते त्याला ह्मणाले:—" बाळा, तुझें अकल्याण व्हावें; तुझा नाश व्हावा; तूं अधोगतीला जावेंस असें का मला वाटत आहे ? अरे, या सृष्टींतील कोणत्या तरी पित्याला किंवा मातेला आपल्या बालकाचें अकल्याण व्हावें असें वाटणें शक्य आहे का ? काय सांगूं शुका, तुला पुत्रप्रेम कसें असतें याचा अजून अनुभव नाहीं. " प्रसंग येईपर्यंत सर्व सर्वांना प्रिय असतात " इत्यादि जें ह्मटलेंस तें शास्त्रीयदृष्ट्या खरें आहे. पण व्यावहारिकदृष्ट्या मात्र तें

खरें नव्हे. कारण, मुला, प्रेम हें संसाराचें भूषण आहे. व पितृप्रेम, पुत्रप्रेम, स्त्रीप्रेम इत्यादि ज्या अभाग्याचे ठिकाणीं नसतात ते जिवंत राहिले काय व मेले काय सारखेच! अरे, ज्यांचें व्यवहारिक पदार्थांवर प्रेम नाहीं ते अव्यवहारिक[1] पदार्थांवर तरी तें कितीसें ठेवणार? आपल्या देहापासून निर्माण झालेल्या आकाराकडे पाहून ज्याच्या मनांत प्रेमाचा पाझर फुटत नाहीं तो गुहेंत[2] गुप्त राहिलेल्या निराकाराला पाहून सद्गदित कसा होणार? शुका, तूं अज्ञ आहेस. पुष्कळ शब्द पढलास हें खरें; पण त्यांच्या योगानें तुझी विपरीत भावना झाली. यास्तव, पुत्रा, मीं नुकतेंच केलेलें भागवत तूं वाच. तें फार विस्तीर्ण आहे असें नाहीं. त्याचे केवल बारा स्कंध आहेत. सर्व पुराणांचें तें भूषणच आहे. सत्य काय व असत्य काय हें केवल त्याच्या पठणानेंच समजतें. पूर्वी वडाच्या पानावर बालरूप धारण करून पडलेल्या व मला बालरूपानें कोणीं, कशाकरितां व कोणत्या द्रव्यानें निर्माण केलें असा विचार करणाऱ्या विष्णूला भगवती देवीनें एका श्लोकार्धानें तें सांगितलें. बीजामध्यें जसा वृक्ष त्याप्रमाणें त्या श्लोकार्धांत सर्व शास्त्रार्थ गुप्त होता. त्या श्लोकार्धाचें चिंतन केल्यानेंच विष्णूला भगवतीचें साक्षात् ज्ञान झालें. पुढें महाविष्णूनें त्याचा ब्रह्मदेवास उपदेश केला. ब्रह्मदेवानें तें गुप्त शास्त्र नारदास दिलें. नारदानें त्याचा मला उपदेश केला व मी पामर जनांवर उपकार करण्याकरितां अनेक

---

१ पारमार्थिक. २ अंतःकरणांत.

आख्यायिका व देवीचे पराक्रम यांच्या योगानें त्याचा बारा स्कंधांमध्यें विस्तार केला. यास्तव, पुत्रा, तूं या भागवत पुराणाचें लक्ष्यपूर्वक पठण कर; ह्मणजे तुझ्या चित्ताचा मल निघून जाईल व तूं पुनः असा व्याकुळ होणार नाहींस. यामध्यें मीं सर्व वेदार्थ व्यक्त केला आहे. हें पुराण ब्रह्मविद्येचें निधानच आहे असें तुला त्याच्या पठणानंतर समजेल. शुका, पुष्कळ पंडितांची सुद्धां पुराणांविषयीं उगीच कांहीं तरी कल्पना झालेली असते. पण ती खरी नव्हे. कारण, त्यांमध्यें मीं प्रवृत्ति व निवृत्तिलक्षण वेदोक्त धर्मच आख्यायिकारूपानें सांगितला आहे. मीं माझ्या पदरचें असें त्यांत कांहींएक सांगितलेलें नाहीं. पण तात्पर्याकडे लक्ष्य देण्याची सामान्य व व्यवहारपटु लोकांना फारशी संवय नसल्यामुळें, त्यांची भलतीच समजूत होते. यास्तव, तूं तात्पर्याकडे लक्ष्य देऊन हें भागवत ऐक ह्मणजे तुझ्या मनाला समाधान वाटेल व तूं खोटा आग्रह धरणार नाहींस. हा लोमहर्षणाचा पुत्र सूत माझा शिष्य आहे. तोही तुझ्याबरोबर हें उत्तम पुराण श्रवण करील. ”

ह्याप्रमाणें व्यासांनीं शुकाचार्यांस सांगितलें असतां ते सूताबरोबर एकांतस्थळीं बसून भागवताचें पितृमुखानें श्रवण करूं लागले. भागवतांतलीं अनेक स्थळें त्यांना मोठीं रमणीय वाटलीं व त्यांत ठिकठिकाणीं वेदार्थ गोंवलेला त्यांच्या दृष्टीस पडला. भागवताचें श्रवण संपल्यावर त्याचें मनन करीत ते व्यासांच्याच पवित्र आश्रमांत कांहीं दिवस

राहिले. पण त्यांना सुख होईना. अंतःकरणांतली तळमळ जाईना. पुनः पुनः खिन्न होऊन ते विचार करीत एकांतांत बसूं लागले. त्यांची वृत्ति उत्तरोत्तर उदास होऊं लागली. देह क्षीण झाला. त्यांना भोजनाची काळजी नाहीं; उपवास पडले तरी कांहीं चिंता नाहीं; वृक्षाचीं पानें खावीं लागलीं तरी कांहीं हरकत नाहीं अशी त्यांची वृत्ति झाली. एकाद्या वृक्षाच्या खालीं दर्भ हांतरून किंवा सरस्वतीच्या तीरीं अजिनावर हे आमचे आचार्य एकाद्या कर्जानें पीडलेल्या दरिद्र्याप्रमाणें चिंता करीत बसत. हा सर्व प्रकार पाहून व्यासांना आतां पुढें काय करावें हें सुचेना! "माझ्या पुत्राचीच जर अशी अवस्था झाली व तो उन्मार्गानें[1] वर्तन करूं लागला तर मला श्रेष्ठ पुरुष काय ह्मणतील?" ही त्यांना चिंता पडली व ते त्यांच्या जवळ जाऊन ह्मणाले "पुत्रा, तुझा पिता विद्यमान असतांना तूं असा चिंताग्रस्त कां झालास? ज्या दुर्दैव्यांचा बाप त्यांच्या बाल्यावस्थेंत मृत होतो त्यानीं जर असा खेद केला तर तें शोभेल! पण तुला कांहींएक कारण नसतांना तूं असा कष्टी कां होतोस? बाळा, मी सांगतों तसें ऐक. माझा हेतु जर तूं पूर्ण केलास तर तुझें कधींही अकल्याण होणार नाहीं. तूं आपल्या देहाला व मनाला व्यर्थ शिणवूं नकोस. शास्त्रोक्त ज्ञानाचा विचार कर. अनुभव सर्व प्रमाणांत

१ वर्णाश्रमधर्म सोडून.

श्रेष्ठ आहे. त्याची प्राप्ति करून घेण्याचा विचार कर. बा सदाचरणी पुत्रा, माझ्या बोलण्यानें जर तुझें समाधान होत नसेल तर मी तुला सांगतों तसें कर. ह्मणजे तुला निःसंशय समाधान वाटेल. पुत्रा, तूं मिथिलानगरीस जा. तेथें जनक या नांवाचा राजा राज्य करीत असतो. तो महात्मा विदेह मुक्त आहे. त्याच्या सारखा धार्मिक राजा सांप्रतकाळीं नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. आत्मज्ञानी असल्यामुळें तो तुझ्या संशयाचा तात्काल उच्छेद करील. शुका, खरोखर त्याच्या केवल दर्शनानेंच तुझा हा दुष्ट मोह नाहींसा होईल. बाळा, तूं त्याला वर्णाश्रमधर्माविषयीं प्रश्न कर; ह्मणजे तो तुझें समाधान करील. तो तुला असत्य व अहिताची गोष्ट कधींही सांगणार नाहीं. यास्तव, आतां विलंब न करितां तूं भागीरथी उतरून त्याच्या नगरांत जा."

---

## प्रकरण ७ वें.

### शुकाचें मिथिलानगरीप्रत गमन.

व्यासांनीं आपल्या पुत्राला जनकाकडे जाण्याविषयीं मोठ्या आग्रहानें सांगितलें असतां त्यांना मोठा विचार पडला.—जनकाकडे जाऊन मला काय लाभ होणार ? मी कोठेंही जरी गेलों व कोणीही जरी मला कसाही उप-

देश केला तरी त्याचा आतां कांहींएक उपयोग होणार नाहीं. कारण, माझें समाधान प्रत्यक्ष ब्रह्मदेवाच्या हातूनही होईलसें मला वाटत नाहीं.—असा विचार करून त्यांनीं तेथेंच रहाण्याचा संकल्प केला. पण एक दोन दिवस गेल्यावर ‘ बा शुका, तूं जनकाकडे कधीं जाणार ?’ असा व्यासांनीं आपण होऊन त्यांना प्रश्न केला. तेव्हां शुक ह्मणतात “ बाबा, जनकाविषयीं जें कांहीं मीं थोडेसें आपल्या तोंडून ऐकिलें त्यावरूनच माझी उत्कंठा नाहींशी झाली. कारण, “ जीवन्मुक्त, विदेह व राजा ” हे शब्दच मला वंध्यापुत्रासारखे[1] औपचारिक[2] भासतात. व हा केवळ दांभिकपणा असावा असें वारंवार मनांत येतें. मला ही मोठी शंका आहे कीं, राज्य करणारा हा राजा देहयुक्त आहे कीं देहरहित आहे ? एक वेळ असेंही वाटतें कीं अशा अद्भुत राजाला एकदां पहावें. जीवन्मुक्त व विदेह असतांना त्याला मोठ्या आनंदानें राज्य कसें करितां येतें ? मला तर असें वाटतें कीं, हा याचा जीवन्मोक्ष देहालाच आत्मा ह्मणणाऱ्या नास्तिक बृहस्पतीच्या मोक्षाप्रमाणेंच असावा. कारण, जर तो अन्नादिकांचें भक्षण करीत आहे तर तें करीत नाहीं असें कसें होईल ? बाबा, राज्यकारभारासारखा व्यवहार करीत असतांना त्याच्या इंद्रियांचा व्यापार होत नाहीं, असें ह्मणणें शोभेल तरी का ? ही माता, हा पुत्र, ही स्त्री, ही बहीण, ही वेश्या, हा चोर, हा शठ, हा साधु इत्यादि भेदांचें ज्ञान

१ वांझेचा मुलगा या शब्दासारखे. २ गौण, मिथ्या, खोटें,

झाल्यावांचून त्याला प्रजेचें पालन कसें करितां येईल ? कडु, खारट, तिखट, आंबट, तुरट इत्यादि रस जर त्याला समजत असले तर तो इतर विषयी पुरुषाप्रमाणेंच भोग भोगीत असतो असें ह्मणण्यास कांहीं भीति नाहीं. अहो, राज्यासारखा प्रचंड व्यवहार करीत असतांना शत्रु व मित्र यांचें ज्ञान होणारच व त्यामुळें एकाचे ठिकाणीं वैर व दुसऱ्याचे ठिकाणीं प्रीति हीं अवश्य जडणार. तेव्हां अशा अवस्थेंत त्याची मुक्ति अबाधित कशी रहाते ? वेदवेत्ता ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रें, चांडाल इत्यादि सर्वांचे ठिकाणीं समदृष्टि ठेवावी असें श्रेष्ठांनीं साधकांना सांगितलें आहे. पण राजा नियंता असल्यामुळें त्याला चोर, चाहाड, घातकी इत्यादि प्रजेला उपद्रव देणारांचे ठिकाणीं समदृष्टि कशी ठेवितां येते ? व जर तो समदृष्टि ठेवीत असेल तर प्रजेचें रक्षण कसें होतें ? सारांश, अशाप्रकारचे मला अनेक संशय येतात. बाबा, मीं अजून जीवन्मुक्त पुरुष कसा असतो तें पाहिलें नाहीं आणि त्यामुळें मला ह्या राजाला पहाण्याची उत्कट इच्छा झाली आहे. पण मला त्याच्याविषयीं अनेक संशय येतात. तेव्हां मिथिलानगरीस जाऊन आपल्या संशयाची एकदां निवृत्ति करून घ्यावी, कीं तो राजा जीवन्मुक्त असणें अशक्य आहे असें समजून येथेंच स्वात्मारामाशीं[1] क्रीडा करीत रहावें ? हा मला मोठा विचार पडला आहे. बाबा, मी तेथें गेल्यावर माझ्या संशयाची निवृत्ति खचित होईल असें जर आपणांस वाटत असलें तर मी जातों."

---

१ आपल्या आत्मारामाशीं.

ह्याप्रमाणें शुकाचार्यांनीं व्यासांना सांगितलें असतां ते ह्मणालेः—" पुत्रा, तूं जनकाच्या नगरास जा. तो तुझें उत्तम प्रकारें समाधान करील. राजस व तामस लोक दंडावांचून वठणीस येत नाहींत हें खरें ! पण मनूसारख्या महात्म्यांच्या वचनाप्रमाणें सर्व राजधर्म पाळूनही तो जीवन्मुक्त आहे. जनकासारख्या व्यवहारातीत[1] पुरुषाचें दर्शन झाल्यानेंच तूं पावन होशील. शुकमुने, एकाद्या महात्म्याविषयीं उगीच कांहीं तरी कल्पना करणें प्रशस्त नव्हे. बाबारे, तर्क व अनुभव यांमध्यें मोठें अंतर आहे. यास्तव, तूं मिथिलानगरीस जा. तेथें गेल्यावर हे तुझे सर्व संशय नष्ट होतील."

व्यासांच्या मनांत श्रीशुकांचें परम कल्याण व्हावें असें होतें, आणि त्याकरितांच त्यांनीं आपल्या प्रिय पुत्राला जनकाकडे जाण्यास सांगितलें. पण आपला विद्वान् व सद्गुणी पुत्र आपणांपासून दूर असावा असें त्यांना मनापासून वाटत नव्हतें. पूर्वोक्त भाषण होऊन एक दोन दिवस गेल्यावर शुकाचार्यांनीं प्रवासाची तयारी केली. व शुभ मुहूर्त पाहून उत्तम लग्नावर बाहेर पडण्याच्या उद्देशानें ते पित्याचा निरोप घेण्याकरितां त्यांच्याजवळ आले. त्यांनीं त्यावेळीं सर्व जटाभार मस्तकावर घट्ट बांधला होता; पाठीवर अजिन टाकिलें होतें; सर्वांगाला विभूति फांसली होती; ललाटावर दुबोटी चंदन शोभत होतें; उजव्या हातांत दंड व डाव्या हातांत तुंबा घेतला

१ व्यवहारांत असून अव्यवहाऱ्यासारख्या.

होता; एक वल्कल कंबरेला गुंडाळलें होतें व पायांत खडावा घातल्या होत्या. या त्यांच्या तयारीवरूनच व्यासांना त्यांचा उद्देश समजून आला. पित्याजवळ जाऊन शुकाचार्यांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेविलें व " बाबा, मी जनकाचें दर्शन घेण्याकरितां मिथिलानगरीस जातों." असें ह्मटलें. तें ऐकतांच त्यांना समाधान वाटलें व जरा खेदही झाला. —आपला पुत्र आपल्या इच्छेप्रमाणें जनकाकडे जावयास निघाला आहे—असें पाहतांच त्यांना बरें वाटलें व—आतां कांहीं दिवस पुत्रवियोग होणार—हें ध्यानांत येतांच खेद झाला. पण परिणामाकडे दृष्टि देऊन त्यांनीं त्यांना जाण्याविषयीं रुकार दिला. व्यासांनीं पुत्राला मोठ्या प्रेमानें दृढ आलिंगन दिलें. व " हे शुका, तुझें कल्याण होवो; पुत्रा, तूं शतायुषी हो; " असे आशीर्वाद दिले. शुकाचार्य, स्वभावतःच निश्चयी व निःस्पृह असल्यामुळें व त्यांना आत्म्याचें परोक्ष ज्ञान यथार्थ झालेलें असल्यामुळें व्यास त्यांना ह्मणाले:—" बाळा, तूं मिथिलानगरीस जा. पण मी पुनः तुमच्या आश्रमांत परत येईन; असें मला वचन दे. परंतु—विवाहाकरितां बाबा मला उगीच त्रास देतात; तेव्हां त्यांच्याकडे आतां जाऊंच नये ह्मणजे कटकट तरी वांचेल—असें ह्मणून कोठें तरी जाऊं नकोस. पुष्कळ अज्ञ मुलें असें करितात. पण बाबारे, पुढें त्यांना त्याचा वाईट परिणाम भोगावा लागतो. मुलांना लहानपणीं त्रास देण्यांत मातापितरांचा किती निर्मल हेतु असतो हें त्यांना समजत नाहीं. शुका, गृहस्थाश्रम स्वीकारिल्यानें

तुझें अकल्याण होईल असें जें तुला वाटत आहे तें खरें नव्हे. यास्तव, तूं मन मानेल तिकडे जाऊं नकोस. बाळा, मी तुझ्याकडे पाहूनच या आश्रमांत मोठ्या आनंदानें रहात असतों हें तुला ठाऊक आहेना ? शुका, तूं जनकाकडे जाऊन ये व मग येथेंच मोठ्या आनंदानें अध्ययन व अध्यापन करीत जन्मभर रहा." ह्याप्रमाणें व्यासांनीं सांगितलें असतां शुकाचार्यांनीं पित्याला पुनरपि नमस्कार केला व एक प्रदक्षिणा घालून ते बाणासारख्या वेगानें निघाले.

व्यासाश्रमांतून निघाल्यापासून प्रत्येक दिवशीं नवीन नवीन वनें, अपूर्व उपवनें, विस्तृत देश व विपुल द्रव्यार्जनाच्या मागें लागलेले कामी लोक यांना पहात त्यांनीं मेरुपर्वत ओलांडिला. हिमालयपर्वतावर येतांच त्यांना अवर्णनीय सृष्टिसौंदर्य व प्रख्यात महात्मे यांचें दर्शन झालें. तेथें ठिकठिकाणीं अनेक तपस्वी घोर तपश्चर्या करीत होते. कोणीं मोठमोठे यज्ञ चालविले होते; कित्येकांनीं सत्रास आरंभ केला होता. कोणी योगाभ्यास करीत होते व कांहीं भाग्यवान् पुरुष पहिले दोन आश्रम संपवून वानप्रस्थ होऊन तेथें राहिले होते. त्या श्रेष्ठ पर्वतावर शैव, पाशुपत, सौर, शाक्त व वैष्णव अनेक होते. ते आपापल्या शिष्यांना आपल्या आगमांत सांगितलेले धर्म शिकवीत असत. त्यांचें तें एकदेशी व्याख्यान ऐकून शुकाचार्यांना हंसूं आलें व हे विद्येचा अभिमान बाळगणारे लोक सर्व शास्त्रांची एकवाक्यता न करितां भलभले-

त्याच कल्पना करीत आहेत असें वाटलें. पण चवदा विद्यांचा पूर्णपणें विचार न करितां वैदिक धर्माविषयीं हल्ल्या तशा कल्पना करणारे लोक पुढें कलियुगांत असंख्य होणार आहेत हें त्यांना ठाऊक असल्यामुळेंच त्यांनीं त्यांची उपेक्षा केली. असो. ह्याप्रमाणें पुष्कळ दिवसपर्यंत प्रवास करीत आणि अनेक रम्य देखावे, पुण्य पुरुष व पवित्र स्थळें यांचें दर्शन घेत व्यासपुत्र मिथिलानगरीस येऊन पोंचले. प्रवास, रम्य देखावे, साधु पुरुष व तीर्थें यांच्या योगानें मन प्रसन्न होत असतें; असा नियम आहे. त्याप्रमाणें श्रीशुकाचार्यांचें अंतःकरणही अत्यंत प्रसन्न झालें होतें. शुकाचार्य मिथिलानगरींत गेले असतां त्यांना तेथें सर्व लोक संपन्न व सुखी आढळले. जनकाच्या त्या राजधानींत चारी वर्णांचे[1] लोक असून ते सर्वही आपापल्या वर्णाप्रमाणें धर्माचरण करीत होते ब्राह्मणादि द्विजे[2] ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व यति या चारी आश्रमांचें अनुष्ठान योग्यतेप्रमाणें करीत होते. त्या नगराच्या मधून एक भव्य नदी वाहत होती, तिच्यावर लोकांच्या सोयीकरितां तीन रुंद पूल बांधले होते. तिच्या दोन्ही कांठानें लोकांचीं सुंदर वसतिस्थानें[3] होतीं. नदीच्या अगदीं तीरावर भव्य देवालयें व त्यांनाच जोडून मोठमोठ्या पाठशाळा होत्या. सूर्योदयाबरोबर त्यांतून प्रतिदिनीं वेदघोष व शास्त्रघोष ऐकूं येऊं लागे. अनेक

---

१ वर्ण ह्मणजे संकर न पावलेल्या जाति; रंग नव्हे. ब्राह्मणादि वर्ण ह्मणजे ब्राह्मणादि रंग असें ह्मणणें हें अज्ञान होय. २ ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन जातींचे लोक. ३ घरें.

विद्वान् लोक त्या शाळांमध्यें येऊन परीक्षा देऊन जात. त्या शाळा ह्मणजे मूर्तिमंत सरस्वतीमंदिरेंच होतीं. त्यांना लागूनच यतींकरितां उत्तम मठ बांधलेले होते. त्यांत साक्षात् शंकरासारखे निःस्पृह यति अनेक रहात. असो. ह्याप्रमाणें त्या नगरांतील उत्तम स्थळें पहात व रस्ता विचारीत शुकाचार्य राजवाड्यापर्यंत सुखरूपपणें गेले. तेथें जातांच एका राजसेवकानें[2] त्यांना "तुह्मी कोण आहां?" ह्मणून प्रश्न केला. पण हा प्रश्न जरा कठोर ध्वनीनें व अधिकारयुक्त भावानें विचारलेला असल्यामुळें या निःस्पृहांनीं त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. उघडच आहे; अधिकाराची भीति कोणाला? आमच्या सारख्या विषयलोलुपांना! असो. हा मनुष्य कांहींच उत्तर देत नाहीं असें पाहून, पुनरपि त्या राजसेवकानें "तुह्मी कोण? कोठून आलां? तुमचें काय काम आहे?" असें पूर्वीप्रमाणेंच विचारिलें. पण या प्रश्नालाही आमच्या आचार्यांनीं कांहींएक उत्तर दिलें नाहीं व ते राजवाड्याच्या थोरल्या दरवाजांत मधोमध जाऊन खांबासारखे उभे राहिले. व मनांतल्या मनांत कांहीं विचार करीत असतांना त्यांना एकाएकीं हसूं आलें. —हा मनुष्य कांहीं उत्तर देत नाहीं तो नाहीं; पण उलट मला हंसतो आहे— असें समजून तो द्वारपाल ह्मणाला;—"ब्राह्मणा, तूं मुका का आहेस? येथें कां आलास? कोणत्याही प्राण्याची प्रवृत्ति संकल्पावांचून होत नसते हें मला ठाऊक आहे.

१ येथें राजवाडा ह्मणजे किल्ला असें समजावें. २ शिपायानें.

यास्तव, तुला काय पाहिजे असेल तें सांग. राजाच्या आज्ञेवांचून तुला आंत जातां येणार नाहीं. फार काय पण तूं जर आपला उद्देश न सांगशील तर तुला या नगरांत पाऊल ठेवण्यासही सांपडणार नाहीं. कारण, ज्याचें कुल, गोत्र, शील इत्यादि माहित नाहीं, त्याला या नगरांत क्षणभरही राहूं देऊं नये अशी राजाची आह्मांस आज्ञा आहे. पण, महाराज, आपण मोठे तेजस्वी दिसतां ! त्यावरून आपण वेदवेत्ते ब्राह्मण असाल असा माझा तर्क आहे. व त्यामुळेंच मी आपणांस केवळ शब्दानें वारंवार प्रश्न करीत आहें. यास्तव, माझ्या प्रश्नाचें उत्तर द्या व नंतर खुशाल वाटेल तिकडे जा. "

ह्याप्रमाणें त्याचें कांहीं कठोर व कांहीं मृदु भाषण ऐकून शुक शांतपणें ह्मणाले:—" बाबारे, मी ज्या इच्छेनें येथें आलों होतों ती माझी इच्छा तुझ्या या शब्दांवरूनच पूर्ण झाली. विदेहाचें नगर सूक्ष्मदृष्ट्या पहाण्याची माझी इच्छा होती, पण ती आतां राहिली नाहीं. कारण, येथें अनोळखी पुरुषाचा प्रवेशच होत नाहीं असें तूं ह्मणतोस. खरोखर राजाला पाहण्याकरितां मी इतक्या दूरप्रदेशांतून पायीं आलों हा माझा मूर्खपणाच आहे. येथें येईपर्यंत मला दोन मोठे पर्वत व अनेक नद्या ओलांडाव्या लागल्या ! छेः, व्यर्थ मीं हे श्रम केले. इतके दिवस जर मीं ईश्वराचें ध्यान किंवा जप केला असता तर मला मोठा लाभ झाला असता. अहो, पण माझ्या पित्यानेंच जर मला फसविलें तर दुसऱ्या कोणाला दोष

द्यावयाचा आहे ! अरेरे ! व्यर्थ मीं हा एवढा प्रवास केला. अथवा ‘ आपलें प्राक्तनच तसें ’ असें ह्मणून स्वस्थ बसावें झालें. कारण, पुरुषाला द्रव्याची तृष्णा भ्रमण करावयास लावते असें ह्मणतात. पण मला तर ती नाहीं. तस्मात्, ‘ प्राक्तन ’ असेंच ह्मटलें पाहिजे. अथवा कोणचीही कां तृष्णा असेना, ती पुरुषाला चक्रासारखीं फिरवितेच असें जरी मानलें तरी कांहीं वावगें नाहीं. कारण, ‘ राजाला पहावें ’ अशी जर मला इच्छा झाली नसती तर हा प्रसंग कां येता ? सारांश, यावरून असा सिद्धांत निघतो कीं, निःस्पृह मनुष्य जर मोहांत निमग्न न झाला तरच त्याला सर्वदां सुख होतें. मोहांत मग्न झाल्यावर सर्वांची स्थिति सारखीच ! मी निःस्पृह खरा, पण या मोहांत सांपडल्यामुळें अशा विवंचनेंत पडलों. हर ! हर ! मेरुपर्वत कोठें व मिथिला कोठें ? पण एका तृष्णेच्या अधीन होऊन मी एवढ्या दुरूनही पायानें चालत आलों ! ! पहा भ्रमाचें कसें फल आहे तें. नशीब माझें ! दुसरें काय ह्मणावें ? शुभ किंवा अशुभ जसें प्राप्त होईल तसें तें भोगलें पाहिजे. ‘ प्राणी सर्व प्रकारें कर्माधीन आहे ’ असें जें ह्मणतात तें खोटें नव्हे. अहो, ह तीर्थ किंवा विद्यापीठही नसतांना मीं हे फुकट श्रम केले ! आणि विदेहराजाची नगरी पहाण्याकरितां आलों ह्मणून आजपर्यंत कधीं न झालेला प्रतिबंध घडला. असो. मर्जी ईश्वराची !” असें ह्मणून श्रीशुकाचार्य पुनः स्तब्ध उभे राहिले.

पण हें त्यांचें निःस्पृही व स्पष्ट भाषण ऐकून द्वारपाल

लज्जित झाला. हा कोणी महापुरुष असावा अशी त्याची खात्री झाली.— अरेरे, व्यर्थ मीं याला प्रतिबंध केला व दुरुत्तरें बोललों—असें त्याला वारंवार वाटूं लागलें; व आतां राजाला जर ही गोष्ट समजली तर तो रागावेल ह्मणून मोठी भीति पडली. खरोखर, सेवाधर्म अति गहन आहे, असें जें ह्मणतात ते कांहीं खोटें नव्हे. योग्य सेवा केली तरी भीति; न केली तरी भीति; प्रसंगीं शौर्य दाखवावें तरी कठिण; न दाखवावें तरी कठिण; आपलें शहाणपण व्यक्त करावें तरी पंचाईत; न करावें तरी तीच अवस्था; सारांश, सेवकांचें जिणें मोठें शोचनीय होय. पण, ज्यांच्या तें रोमरोमीं खिळलें आहे, त्यांना त्यांतच मोठें भूषण वाटतें. सेवा हें एक बहुमानाचें साधन आहे असें ते समजतात. कांहीं कारणानें जर कधीं तिचा व त्यांचा वियोग झाला, तर त्यांना त्यांत मोठी हानि वाटते. सारांश, जगांत—प्राणी दुःखालाच सुख ह्मणतात—अशी जी पंडितांची समजूत आहे ती कांहीं खोटी नव्हे. असो. तो द्वारपाल खिन्न होऊन शुकाचार्यांस नम्रपणें ह्मणतो " अहो ब्राह्मणवर्य, आपणांस मी प्रणाम करितों. माझ्या हातून मोठा अपराध घडला. मला क्षमा करा. महाराज, आपल्या इच्छेस येईल तिकडे आपण जावें. आपल्यासारख्यांना प्रतिबंध करणें हा मोठा दोष आहे. पण भगवन्, मला क्षमा करा. महात्म्यांचें क्षमा हेंच सामर्थ्य असतें व त्याच्या योगानें ते त्रिभुवनांत विजयी होतात. अहो, क्षमारूपी शस्त्र ज्याच्या हातीं असतें त्याला दुर्जन काय करणार आहे ? महाराज

आपल्यासारख्या समर्थांचें क्षमा हेंच भूषण आहे." ह्याप्रमाणें वारंवार विनंति करीत तो द्वारपाल त्यांच्या पायांवर लोळूं लागला. तेव्हां हे दयासागर ह्मणाले " द्वारपाला, यामध्यें तुझा काय अपराध आहे ? अरे, तूं परतंत्र आहेस हें मला ठाऊक नाहीं असें कां तूं समजतोस ? मित्रा, तुझ्यासारख्या सेवकाला धन्याचें कार्य करणेंच उचित आहे. यास्तव, तुझ्यावर माझा यत्किंचितूही राग नाहीं. तसेंच तुझ्या राजावरही माझा राग नाहीं. तो जर तुला अशी कडक आज्ञा न देईल, तर त्याचें राज्य सुरक्षित रहाणार नाहीं. कारण, कांहींच प्रतिबंध नसल्यामुळें मित्रांप्रमाणेंच त्याचे शत्रुही या नगरींत येऊन राहतील व ते त्याचा घात करतील. यास्तव, तुझ्या धन्यावरही माझा मुळींच राग नाहीं. मला जो हा येथें प्रतिबंध झाला त्यांत जर कोणाचा अपराध असेल तर तो माझाच आहे. कारण, मीं तृष्णेच्या अधीन व्हावेंच कां ? 'दुसऱ्यांच्या दारापाशीं जाणें हें हलकेपणाचें लक्षण आहे' हें माझ्यासारख्याला न समजणें ह्मणजे मोठाच दोष होय. "

शुकाचार्यांचें हें भाषण ऐकून तो द्वारपाल चकित झाला; हे उदार शब्द ऐकून त्यांच्या विषयीं त्याची मोठी पूज्यबुद्धि झाली व अशा सज्जनाच्या तोंडचे दोन शब्द ऐकावे अशीही त्याला इच्छा झाली. द्वारपाल ह्मणतो:—" महाराज, सुख कोणतें व दुःख कोणतें ? ज्याला आपलें कल्याण व्हावें असें वाटत असेल त्यानें

काय करावें ? शत्रु कोणाला ह्मणावें ? व हितकर्ता कसा ओळखावा ? हें मला सांगा. " द्वारपालानें केलेले हे प्रश्न ऐकून शुकांना मोठा विस्मय वाटला. कारण, द्वारावर बसून येणाराजाणाराकडे पहाणाऱ्या व ' तूं कोण आहेस ? कोठें जातोस ! ' इत्यादि प्रश्न करण्यांत पटाईत झालेल्या या परतंत्राला असे विचार सुचणें हें कांहीं सामान्य नव्हे. ज्ञात्यांची नेहमीं अशीच स्थिति असते कीं, त्यांना कोणींहि जरी कांहीं विचारलें तरी ते यथामति त्यास उत्तर देण्यास कांकू करीत नाहींत. यास्तव, शुक ह्मणालेः— सृष्टीमध्यें प्राणी दोन प्रकारचे आहेत. कांहीं शुभ कर्में करणारे व कांहीं अशुभ कर्में करणारे. त्यामुळें त्यांच्या स्वभावांतही भिन्नता उत्पन्न होते. स्वभावाच्या भिन्नतेमुळें रागी व विरागी असे त्यांचे दोन प्रकार होतात. विरागी ह्मणजे विरक्त, असल्या विरक्त पुरुषांचेही तीन पोटभेद आहेत. ज्ञात, अज्ञात व मध्यम हीं त्यांचीं नांवें होत. ज्यांचें वैराग्य तीव्र असतें ते पूर्ण विरक्त आहेत अशी लोकांची समजूत होते, ह्मणून त्यांना ज्ञात असें ह्मणतात; ज्यांचें मंद वैराग्य असतें ते अप्रसिद्ध असल्यामुळें त्यांना अज्ञात असें ह्मणतात व ज्यांचें वैराग्य क्वचित् प्रसंगीं अनुभवास येतें, त्यांना मध्यम असें ह्मणतात. रागी पुरुषांमध्येंही दोन प्रकार आहेत. त्यांतील एकाला मूर्ख व दुसऱ्याला चतुर असें ह्मणतात. चातुर्याचे सुद्धां दोन प्रकार आहेत. एकाला शास्त्रजन्य चतुरता व दुसऱ्याला बुद्धिजन्य चतुरता असें ह्मणतात. मति सुद्धां युक्त व अयुक्त अशी दोन प्रकारची आहे.

शुकाचार्यांचें हें संक्षिप्त भाषण ऐकून द्वारपाल पुनः ह्मणाला " महाराज, आपण जें सांगत आहां तें मला समजत नाहीं. जन्मभर भीतीनें काल गेल्यामुळें गहन सिद्धांतांत एकदम प्रवेश करण्यासारखी माझी बुद्धि नाहीं. यास्तव, कृपानिधे, मला विस्तारपूर्वक व सोप्या शब्दांनीं उपदेश करा. आपले माझ्यावर अनंत उपकार होतील. " हें ऐकून शुकाचार्य ह्मणाले " संसारावर ज्याची प्रीति असते ह्मणजे विवाह करावा, पुत्र व्हावे, पुष्कळ संपत्ति मिळावी, अनेक पशु संग्रहीं असावे इत्यादि ज्यांचें सतत चिंतन चालतें त्याला रागी असें ह्मणतात. अशा पुरुषाला पदोपदीं दुःख सहन करावें लागतें. बा राजपुरुषा, दुःख ह्मणजे ' हाय हाय ' करून रडणें असें कांहीं विषयी समजतात, पण तें खोटें आहे. कारण, आक्रोश ही दुःखाची शेवटची पायरी आहे. दुःखाचें मूलस्वरूप अशांति हें आहे. ज्या ज्या अवस्थेंत अंतःकरणाच्या शांतीचा भंग होतो, ती ती अवस्था दुःखमय होय. पण ही अवस्था सर्वांनाच भासत नाहीं. कारण, ज्याप्रमाणें मोठ्या नगाऱ्याचा शब्द ऐकणाराला टिमकीचा ध्वनि मुळींच भासत नाहीं अथवा वीण्याच्या सर्व तारांचा एकदम निघणारा ध्वनि ऐकणाराला प्रत्येक तारेच्या सुराचें थोडें सुद्धां भान होत नाहीं, त्याप्रमाणें मोठमोठ्यानें ऐकूं येणाऱ्या आक्रोशावांचून त्यांना दुःख ह्मणून कांहीं दिसतच नाहीं. पण सूक्ष्मदर्शी पुरुषाची तशी स्थिति नसते. सप्त सुर ओळखण्यांत पटाईत झालेला

मनुष्य वाद्याचा एकादा सुर जरा कमजास्त झाला कीं जसा सहज ओळखितो, त्याप्रमाणें अंतःकरणाची शांतता पहाण्याची ज्यांना संवय झाली आहे ते तिच्या थोड्याशा भंगालाही दुःख ह्मणतात व तें अगदीं खरें आहे. कारण, व्यवहारांत सुद्धां शांत मनुष्याला सुखी व अनेक उपद्व्याप करणाऱ्याला दुःखी असें ह्मणतात. ज्याला मनाच्या स्वस्थतेमुळें गाढ निद्रा लागते, त्याला सुखी व ज्याच्या रात्रीच्या रात्री चिंतेंत व या कुशीव-रून त्या कुशीला व त्या कुशीवरून या कुशीला वळण्यांत जातात, त्याला दुःखी असें ह्मणतात. तात्पर्य, मनाची अस्वस्थता हें दुःख व स्वस्थता हें सुख होय. आतां व्यव-हारांत सुद्धां केव्हां केव्हां सुख होतें हें खरें, पण तें कांहीं क्षणपर्यंत रहाणारें असल्यामुळें आह्मी त्याला दुःखच ह्मणतों. कारण, तें स्वतः जरी दुःखरूप नसलें तरी तें दुःखाला कारण होत असतें. कसें ह्मणशील तर सांगतों. ऐक. एकाद्या व्यवहारी पुरुषाला पुत्र झाला आहे असें समज. 'तो झाला' असें ऐकतांच त्याला मोठा हर्ष होतो. पण, इतक्यांत कांहीं निमित्तानें जर तो मृत झाला तर त्याच आनंदाचा तीव्र दुःखांत परिणाम होतो. पुत्रज-न्माचा हर्ष जर झाला नसता तर त्याला त्याच्या मरणाचें दुःखही झालें नसतें. तसेंच एकाद्या मनुष्याला एकदम पुष्कळ द्रव्य मिळालें असें समज. तें मिळतांच त्याला मोठा आनंद होतो. पण तेंच जर कां कोणीं लुटून नेलें तर काय विचारतां ? आनंदाबद्दल असह्य दुःख त्याच्या वांट्यास

येतें. हें द्रव्य जर मिळालें नसतें व त्याच्या प्राप्तीचा आनंद जर झाला नसता तर हें महद्दुःख कां होतें ? सारांश, व्यवहारांतला आनंद दुःखाला कारण होतो व त्यामुळें तोही दुःखरूपच आहे. संसारी लोकांनीं संसारापुरते जे त्याचे भेद मानले आहेत ते त्या त्या अवस्थेमध्येंच मात्र फार तर खरे मानावे. असो. राजसेवका, खरें सुख कोणतें व दुःख कशाला ह्मणतात हें मीं तुला सांगितलें. शहाण्यानें मनःशांतिरूप खऱ्या सुखाच्या उपायांचें अनुष्ठान करावें. पण ही व्यवहारदशा इतकी दुष्ट आहे कीं सुखाच्या उपायांचा आश्रय केला कीं अनेक विघ्नें पुढें आणते. यास्तव, संसाऱ्याच्या सुखसाधनाला विघ्न आणणारा शत्रु व त्याला साह्य करणारा मित्र होय; असें समजावें. पण बाबारे, या व्यवहारांत मूर्ख पुरुष जसा मोहित होतो तसा शहाणा होत नाहीं. त्यामुळें विरक्त पुरुषाची समजूत अगदीं निराळी असते. त्याला एकांतवास, सतत आत्मचिंतन व वेदांतविचार हें सुख[१] व संसाराचें नांव घेणें हेंही दुःख असें वाटतें. असल्या पुरुषांचे काम, क्रोध, प्रमाद इत्यादि अनेक शत्रु असतात. व त्यांना समाधानासारखा मित्र कोणीही वाटत नाहीं." याप्रमाणें द्वारपालाच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन शुकाचार्य स्तब्ध राहिले.

त्या पंडिताचीं तीं सर्वोत्तम उत्तरें ऐकतांच हा कोणी

१ येथें सुख ह्मणजे सुखाचें साधन व दुःख ह्मणजे दुःखाचें साधन असें समजावें. कारण, सुखदुःखाचे मुख्य अर्थ वर सांगितले आहेत.

खरा ब्राह्मण आहे अशी त्याची खात्री झाली व त्यानें त्याला आंत जाऊं दिलें. तें सुंदर नगर पहात शुकाचार्य राजमार्गानें राजाच्या मुख्य मंदिराकडे निघाले. रस्त्यांत नानाप्रकारचे लोक, तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु, धनाढ्य व्यापाऱ्यांचीं घरें, बाजार, त्यांतील देवघेव व त्या सर्वांचा एकच गोंधळ हें पाहून शुकाचार्यांच्या मनाला उद्वेग उत्पन्न झाला. ते ह्मणाले " अहो, द्रव्याकरितां पहाहो हे लोक कसे जीवापाड झटत आहेत. व्यापार, व्यापार ह्मणून जो ह्मणतात तो जर हाच असेल तर त्याला दुरूनच मी नमस्कार करितों. कारण, याचा नुस्ता संसर्गही मला भ्रष्ट करील. अहो, हे लोक असत्य भाषण करण्यास, पदार्थांचा भाव चढविण्यास, खोटें माप वापरण्यास व गिऱ्हाइकांचे डोळ्यांत माती टाकण्यास थोडे सुद्धां भीत नाहींत. पण खरेंच आहे असें केल्यावांचून त्यांना आपल्या स्त्रियांना सुवर्णानें मढवितां कसें येईल ? असो. मला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे ? असल्या लोकांच्या कृत्यांचा उच्चार केल्यानेंही मी पापांचा वांटेकरी होईन " असें ह्मणून ते थेट राजमंदिराकडे गेले. जनकराजा ज्या मंदिरांत रहात होता तेथें सूर्याप्रमाणें तेजस्वी भासणारे हे शुकाचार्य जाऊन पोंचले. पण मंदिरांत जाऊं लागतांच त्यांना तेथल्या राजपुरुषानें प्रतीकार केला. ते पुनः पूर्वीप्रमाणेंच तेथें ईश्वरस्मरण करीत काष्ठाप्रमाणें उभें राहिले. ऊन व सांवली यांना सारखें मानणाऱ्या त्या परम पुरुषाला राजद्वारामध्यें उभें राहून सतत ब्रह्मचिंतन करण्याची संधि

मिळतांच त्यांनीं तिचा योग्य उपयोग करून घेतला. कांहीं काल लोटल्यावर राजाचा प्रधान त्या मार्गानें आला. ह्या दिव्य मूर्तीला पाहतांच त्याला आश्चर्य वाटलें व त्यानें त्यांना साष्टांग प्रणाम केला. त्यांची विनंति करून त्यानें राजमंदिराच्या दुसऱ्या चौकांत त्यांना नेलें. त्याठिकाणीं सुंदर उपवन होतें. त्यांत अनेक फुलझाडें होतीं. त्यांचीं फुलें फुलल्यामुळें तेथें जिकडे तिकडे सुवास पसरला होता. व तेथें एक लहानसें जलमंदिर होतें. त्या चौकामध्यें गेल्यावर प्रधानानें त्यांचें पूजन केलें. व त्यांना कामशास्त्रांत निपुण असलेल्या स्त्रियांचा नाच दाखविला व गाणें एकविलें. नंतर शुकांची सेवा करण्याविषयीं त्या स्त्रियांना आज्ञा करून प्रधान निघून गेला. प्रधानाच्या आज्ञेप्रमाणें त्या वेश्यांनीं शुकाचार्यांची पूजा केली; त्यांना नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ दिले व यथामति त्यांना संतुष्ट केलें. तदनंतर सायंकालीं त्या स्त्रियांनीं शुकाचार्यांना अंतःपुरांतल्या उपवनांत नेलें; व तेथें असलेलें तें सुंदर उपवन त्यांनीं त्यांना दाखविलें. शुकाचार्य तरुण, सुस्वरूप, तेजस्वी व प्रसन्न मुद्रेचे असल्यामुळें व त्यांचें भाषण अति मृदु असल्यामुळें त्यांना पाहून त्या स्त्रिया मोहित झाल्या; व त्यांचें मन हरण करण्याकरितां त्यांनीं कुटिल भाषणें, दृष्टि, चेष्टा व गति यांच्या योगानें पुष्कळ प्रयत्न केला. पण, हे आमचे जितेंद्रिय आचार्य त्यांच्या अधीन झाले नाहींत. त्यांनीं त्या सर्व स्त्रियांचे ठिकाणीं मातेसारखी दृष्टि ठेविली. इंद्रियजन्य

सुखाला तुच्छ मानून जे अतींद्रिय सुखाचा अनुभव घेतात, त्यांना विषयसुखें विषासारखीं घातुक वाटतात. ह्मणजे हीनावस्थेंत असलेल्या एकाद्या मनुष्याला दैववशात् पूर्ण वैभव प्राप्त झालें असतां जसे तो पूर्वावस्थेंत रमणीय वाटणारे विषय कवडीमोलाचे समजतो, तसाच आत्मानुभवी धीर पुरुषाचा प्रकार होतो. आत्मसाक्षात्कारासारखें सुख नाहीं. इतर सुखें ह्या आत्मसुखाच्या कळा[१] आहेत; असें शास्त्रांत सर्वत्र सांगितलेलें आहे. पण ज्या अभाग्याला हें ऐश्वर्य प्राप्त झालेलें नसतें तो— दुधाची तहान ताकावर—या न्यायानें या इंद्रियजन्य सुखालाच मोठें मानून रहातो. त्या स्त्रियांनीं या सत्पुरुषाला भ्रष्ट करण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केला. पण तो सर्व व्यर्थ झाला. शुकाचार्यांना त्यांच्या त्या सर्व चेष्टा माकडांच्या चेष्टांप्रमाणेंच वाटूं लागल्या. ते त्यांच्याकडे पाहून खों खों हंसूं लागले. “ तुह्मी उगीच कां श्रम करितां ? माझ्या मनाला असल्या या तुमच्या चेष्टांनीं थोडा सुद्धां विकार होणार नाहीं. अहो, तुह्मी स्त्रिया ह्मणजे केवल विषांनीं भरलेले पयोमुख[२] घटच आहां. मला तुमचें मुखावलोकनही करावेंसें वाटत नाहीं. तुह्मी पुरुषांना सर्वथैव परतंत्र करून टाकितां; व तेही मूर्ख होऊन सर्व प्रकारें आपली हानि करून घेतात. तुमच्या व माझ्या शरीरांत काय अंतर आहे ? जे पदार्थ तुमच्या शरीरांत आहेत तेच माझ्यांत आहेत. मग तुमच्या शरीरांवरच मीं प्रेम कां ठेवावें. स्त्रीशरीरांत

१ अंश. २ अमृत आहे मुखावर ज्याच्या असे.

एकादा पदार्थ अधिक असतो असें नाहीं. आतां ' तुमच्या आलिंगनानें मला स्पर्शसुख होईल व त्याकरितां तुह्मीं हा एवढा प्रयास करीत आहां ' असें जर ह्मणावें तर त्यांत—तुह्मांला लाभ कोणता ? त्वगिंद्रिय माझें असल्यामुळें व त्याच्या द्वारा होणारें सुख मलाच समजणें शक्य असल्यामुळें तें घ्यावें किंवा न घ्यावें हा विचार करणें माझें काम आहे. ह्मणजे ' माझ्या सुखाकरितां तुमचा प्रयास ' हें ह्मणणें अयोग्य आहे. आतां तुमच्या सुखाकरितां परोपकारबुद्धीनें मीं तुमच्याशीं विहार करावा असें जर तुह्मांला वाटत असलें तर तेंही अयोग्यच आहे. कारण, तुमच्या सुखाकरितां मीं दुःख भोगावें हा न्याय नव्हे. शिवाय परोपकार ह्मणून जो ह्मणतात तो वस्तुतः स्वोपकारच आहे. पण व्यवहारांत ज्यांना खोटें बोलण्याची संवय झाली आहे, ते स्वार्थ गुप्त ठेवून परार्थ पुढें करितात. तसेंच आपण ज्याला **परोपकार** ह्मणतों तो खरोखरी तसाच असतो कीं त्याच्या विरुद्ध ह्मणजे **परनाश** असतो हाही एक प्रश्न आहे. याला नास्तिकाच्या उपदेशाचें उदाहरण आहे. नास्तिकाचा उपदेश जरी बाह्यात्कारीं परोपकारसा भासतो व ते स्वमुखानेंही तसें ओरडून सांगत असतात, तरी तो तसा नसतो, असंख्य लोकांच्या हानीला कारण होणाऱ्या त्यांच्या उपदेशाला जर परोपकार ह्मणावयाचें तर तुह्मांला पतिव्रता कां ह्मणूं नये ? बरें, परोकारबुद्धीनें जरी मीं ही गोष्ट स्वीकारली तरी त्यापासून तुह्मांला होणाऱ्या सुखाचें मला

ज्ञान होणार नाहीं? व तुमच्या सुखाचें जर मला ज्ञान झालें नाहीं, तर परोपकार झालाच हें मीं कसें समजावें? सारांश, परोपकार, तुमच्याकरितां मी व माझ्याकरितां तुह्मी इत्यादि सर्व थोतांडें आहेत. विषयी लोकांचीं हीं भूषणें आहेत असें मी ह्मणतों. यास्तव, स्त्रियांनों, व्यर्थ श्रम करूं नका. मी कुत्र्याप्रमाणें धांपा टाकीत तुमच्याकरितां भ्रमण करणार नाहीं. आजन्म[1] मनाला विकार पावूं द्यावयाचेंच नाहीं असा माझा निश्चय असल्यामुळें मीं तुमच्यावर प्रेमही करणार नाहीं व तुमच्यावर रागावणारही नाहीं. मी राजवाड्यांत असल्यामुळें कदाचित् माझा देह जरी तुमच्या स्वाधीन असला तरी माझें मन माझ्याच अधीन असणार हें निःसंशय समजा." असें भाषण करून शुकाचार्य पुनरपि स्तब्ध बसले.

त्या महात्म्याचें हें निश्चयी भाषण ऐकून जरी त्या मनांत खिन्न झाल्या होत्या, तरी पुनः एकदां प्रयत्न करण्याचा त्यांनीं विचार केला. त्या जलमंदिरांत त्यांनीं एक उत्तम पुष्पशय्या तयार केली. व ती त्यांना दाखविली. त्या रम्य शय्येकडे पाहून शुक कांहींच बोलले नाहींत; व सायंकाल झाल्यामुळें सायंसंध्योपासना करण्याकरितां ते पुष्करिणीकडे गेले. हातपाय धुवून व मुखमार्जन करून ते दर्भासनावर बसले आणि त्यांनीं संध्योपासनेस आरंभ केला. ती संपल्यावर त्यांनीं ईश्वराचें ध्यान केलें. एक प्रहरभर ध्यान करून त्यांनीं

१ जन्मापासून. अर्थात् मरेपर्यंत; जीवांत जीव आहे तों.

त्या पुष्करिणींचें स्वच्छ उदक प्राशन केलें व नंतर अजिन हांतरून त्यावर अंग टाकिलें. दोन प्रहर स्वस्थ निद्रा घेऊन पहाटेस ते उठले. व पुनः कांहीं वेळ ध्यान करून त्यांनीं सर्व नित्य क्रिया आटपल्या. इतक्यांत एक राजपुरुष शुकांजवळ आला व त्यानें "महाराज, राजाधिराज जनक आपल्या दर्शनाकरितां येत आहेत" असें त्यांस सांगितलें. तें वर्तमान ऐकून शुकांच्या वृत्तींत जितका फरक पडेलसें त्या सेवकास वाटलें होतें तितका पडला नाहीं.

---

## प्रकरण ६ वें.

### शुकजनकसंवाद.

इकडे व्यासपुत्रांचें आज आपणांस दर्शन होणार ह्मणून मोठ्या उत्साहानें जनक नित्य क्रिया आटोपून आपल्या पुरोहितासह तेथें आला. राजाचें दर्शन होतांच शुकाचार्य आपल्या आसनावरून उठले व त्याचें स्वागत करण्याकरितां कांहीं पावलें चालून गेले. पण जनकराजाला ती गोष्ट सहन झाली नाहीं. व तो "महाराज, आपण हें काय करितां? माझ्या सारख्या सेवकाला उत्थापन[1] देणें व प्रत्युद्गमन[2] करणें हें आपल्यासारख्यास योग्य नव्हे. आपण आसनावर स्वस्थ बसावें." असें ह्मणून त्यांचें निवारण करूं लागला. परंतु, तेजस्वी राजाला पाहून

---

१ उठून उभें रहाणें. २ सामोरें जाणें.

शुकांच्या मनांत उत्पन्न झालेला पूज्यभाव त्यांना तसें करूं देईना. ते त्वरेनें पुढें गेले व त्यांनीं राजाचा उजवा हात आपल्या हातांत धरला. जनकाला हें अयोग्य वाटून 'नको, नको' म्हणत त्यांनीं आपला हात सोडवून घेतला व त्यांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. ह्या एवढ्या सत्पुरुषानें आपल्या चरणांवर लीन होणें हें योग्य नव्हे, असें जाणून त्यांनीं राजाला दोन्हीं हातांनीं उठविलें व राजा,— हें तूं काय करीत आहेस? अरे, हा अल्पज्ञ व अल्पवयस्क व्यासपुत्र तुझ्याकडे शिष्यभावानें आला असतां तूं हें काय आरंभिलें आहेस? मी तुझ्या नगरांत राहूं नये असें कां तुला वाटतें? राजा, तूं आत्मज्ञानी व जीवन्मुक्त आहेस असें ऐकून मी तुझ्या दर्शनाकरितां आलों. वस्तुतः मी तुझ्या चरणावर मस्तक ठेवावयास पाहिजे होतें. पण हें तुला आवडणार नाहीं म्हणून मी तसें न करितां तुझ्या योग्यतेप्रमाणें तुला केवळ उत्थापनच दिलें, पण तेंही तुला आवडलें नाहीं. व तूंच उलट मला वंदन करीत आहेस! तेव्हां आतां याला काय म्हणावें?— असें ते म्हणाले. वाचकहो, सत्पुरुषांचा संगम असाच हृदयंगम असतो. त्यांतील प्रत्येकाला आपली योग्यता कमी व दुसऱ्याची योग्यता अधिक वाटत असल्यामुळें प्रत्येक दुसऱ्याचा सत्कार करण्याविषयीं उत्सुक झालेला असतो, व त्याचा सत्कार कोणी करूं लागल्यास तो त्याला आवडत नाहीं. अहाहा! निरहंकाराची काय मौज आहे पहा! प्राण्यानें एकदां अहंकार टाकिला कीं

त्याला दुःखाची बाधाच होत नाहींशी होते. कारण, उघडच आहे कीं अभिमानानें ताठून बसणाऱ्या काष्ठाला जसे तीक्ष्ण कुऱ्हाडीचे हजारों प्रहार नित्य सहन करावे लागतात, तसे कोंवळ्या गवताला सहन करावे लागत नाहींत.

असो, ह्याप्रमाणें शुकाचार्यांचें भाषण ऐकून जनक ह्मणतात " ब्राह्मणश्रेष्ठ, हें काय आपण बोलतां ? अहो महाराज, क्षत्रिय ब्राह्मणाचा गुरु कधींच होत नाहीं. आह्मी कितीही जरी ज्ञानी झालों तरी आमचें ज्ञान ब्राह्मणाच्या ज्ञानाची का बरोबरी करणार आहे ? वर्णानें जरी गाय, हैंस व मेंढी यांच्या दुधांत फरक न दिसला तरी तो गुणानेंही नाहीं असें ह्मणणें युक्त होणार नाहीं. यास्तव, आपल्या वर्णाला योग्य असा आपला सत्कार मी करणार आहें; त्याला आपलें अनुमोदन असावें. आपण जर हें माझें आतिथ्य न स्वीकाराल तर सनातन धर्माचें उल्लंघन केल्याचा आपणांस दोष लागेल. " असें बोलून जनकराजा त्या ब्राह्मणास आसनावर बसण्याविषयीं आग्रह करूं लागला. सनातन धर्माचें उल्लंघन केल्याचा दोष लागूं नये ह्मणूनच शुकाचार्य आसनावर बसले व त्यांनीं राजाला आपली यथाविधि पूजा करूं दिली. ती आटोपल्यावर शुकाचार्यांनीं राजास कुशलप्रश्न केले व आपलेंही स्वास्थ्य कळविलें. सारांश, एकमेकांच्या दर्शनानें त्या उभयतांसही आपण कृतार्थ झालों असें वाटून परम संतोष झाला. राजाची मूर्ति पहातांच शुकाचार्यांचे पूर्वीचे सर्व

१ ह्मणजे कसें काय ? बरें आहेना ! इत्यादि. २ स्वस्थता.

संशय शिथिल झाले; व शुकाचार्यांकडे पहातांच ' आज मला प्रत्यक्ष वेदाचेंच दर्शन झालें ' असें राजास वाटलं. एकून ते उभयतांही आपणांस धन्य मानूं लागले.

शुकाचार्य आपल्या आसनावर स्वस्थ बसले आहेत असें पाहून राजा ह्मणाला " महाराज, आपल्यासारख्या निःस्पृहांचें आह्मांस दर्शन व्हावयाचें ह्मणजे मोठें भाग्यच समजलें पाहिजे. कारण, आपण जगांतले सिद्धांतही लटके पाडीत असतां. द्रव्याच्या योगानें काय पाहिजे तें साध्य होतें असें व्यवहारांत ह्मणतात, पण तें केवळ व्यवहारापुरतेंच खरें आहे. अहो, ज्याला द्रव्याची इच्छा असेल, तोच त्याच्या योगानें वश होणार ! आपल्यासारख्या निरिच्छांना तें काय करणार आहे. ! खरोखर निष्कामपणासारखें[1] सुख नाहीं. असो. पण, व्यासनंदना, आपलें इकडे आगमन कां झालें. ? आपल्या या येण्यांत कांहीं तरी विशेष हेतु असला पाहिजे. किंवा माझ्या सुकृतानें[2] आपणांस इकडे आणलें ? पण माझें सुकृत आहे कोठें ? मीच जर मुळीं नाहीं, तर माझें सुकृत कोठून असणार ? पुण्य व पाप हीं दोन्हीं मीपणावर रहातात. ह्मणजे ते अहंकाराचे धर्म आहेत. धर्म तर नेहमीं धर्मीवर ह्मणजे त्याच्या आधारावर रहात असतात. त्यामुळें मी हा धर्मीच जर नाहीं तर पुण्य व पाप हे धर्म कोठचे असणार ? खरोखर बोलल्यावांचून व्यवहार होत नाहीं, व निर्दोषपणें बोलतां तर येत नाहीं, अशी

१ निरिच्छपणा. निःस्पृहता. २ पुण्यानें.

कांहीं स्थिति आहे. यास्तव, महाराज माझ्या शब्दांकडे लक्ष्य न देतां आपण कां आलां आहां हें मज दीनाला सांगा."

ह्याप्रमाणें जनकराजानें विनंति केली असतां शुकाचार्य ह्मणतात:—राजा, बृहस्पतींच्या आश्रमांत मीं बारा वर्षें अध्ययन केलें. चतुर्दश विद्यांचें ग्रहण केल्यावर त्यांनीं मला मोठ्या संतोषानें पित्याकडे पाठविलें. व्यासांच्या आश्रमांत आल्यावर मीं त्यांना सर्व विद्या ह्मणून दाखविल्या व त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्याच आश्रमांत राहिलों. ईश्वर-कृपेनें वेदांतशास्त्राचें मनन करण्याची मला इच्छा झाली व मीं तें करीत पुष्कळ दिवस घालविले. गुरूंच्या आश्र-मांत असतांनाच मला या जगाचें मिथ्यात्व भासूं लागलें होतें पण पित्याकडे आल्यावर तें दृढ झालें. मला या जगांतील प्रत्येक पदार्थ तुच्छ वाटूं लागला. या सृष्टींत ज्ञानरूप ईश्वराचें मला सर्वत्र दर्शन होऊं लागलें व त्यामुळें माझें मन ऐहिक कृत्यांविषयीं उदास झालें. एके दिवशीं माझ्या जनकाच्या मनांत कांहीं विचार आला व जवळ बोलावून त्यांनीं तो मला कळविला. ते ह्मणाले "शुका, सर्व आश्रमांमध्यें गृहस्थाश्रम उत्तम आहे. यास्तव, तूं आतां गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर." हें त्यांचें भाषण ऐकून "बाबा, गृहस्थाश्रम हा बंध आहे. माझ्या गुरूसारखे ज्ञानीही त्यांत सांपडल्यामुळें परतंत्र होऊन बसले आहेत. यास्तव, मी गृहस्थाश्रम स्वीकारणार नाहीं" असें मीं त्यांना विनयपूर्वक पण निक्षून सांगि-तलें. 'गृहस्थाश्रम हा बंध नव्हे' असें त्यांनीं मला पुष्कळ

सांगितलें पण माझें समाधान होईना. तेव्हां त्यांनीं मला तुझ्याकडे जाण्यास सांगितलें. तुझ्या समागमानें माझे सर्व संशय दूर होतील असें त्यांनीं मला निश्चयपूर्वक सांगितल्यामुळें मी तुझ्याकडे आलों. राजा, तुझ्याविषयीं प्रथमतः मला पुष्कळ संशय होते, व्यासमुनि तुझी कांहीं तरी भलतीच स्तुति करीत आहेत असेंही एकदां मनांत आलें; पण, त्यांचा जेव्हां मीं पुष्कळ आग्रह पाहिला, तेव्हां इकडे येण्यास निघालों. रस्त्यांत मला पुष्कळ धन्य पुरुष भेटले. त्यांच्या दर्शनानेंच माझें अंतःकरण निर्मल झालें; अनेक तीर्थांमध्यें मीं स्नान केलें व त्यामुळें माझ्या मनाचे दोष निःशेष गेले; आणि राजा, तुझ्या दर्शनानें तर मी आज परम पवित्र झालों आहें. हे भाग्यवाना, मला मोक्षाची इच्छा आहे. देवलोक, पितृलोक व मनुष्यलोक यांची मला इच्छा नाहीं. मला केवळ आत्मलोक पाहिजे आहे. तेव्हां मीं आतां काय करावें तें तूं मला सांग. राजेंद्रा, तपश्चर्या, तीर्थस्नान, व्रतें, यज्ञ, अध्ययन, क्षेत्राचे ठिकाणीं वास, ज्ञान इत्यादि साधनांपैकीं मी कोणत्या साधनाचें अवलंबन करूं तें मला सांग. ”

श्रीशुकाचार्याचें हें भाषण ऐकून जनक राजा ह्मणाला:— “ ब्राह्मणा, मीं आपल्यास उपदेश करावा असा माझा अधिकार नाहीं. पण ज्याअर्थीं परमपूज्य आचार्यांनीं[१] मला अप्रत्यक्षपणें हें काम सांगितलें आहे, त्याअर्थीं मी यथा-

---

१ व्यासांनीं. ज्ञाते, गुरु व पूज्य पुरुषाचें नांव घेत नसतात.

मांत आपणांस सांगतों:—ज्या ब्राह्मणाला मोक्षाची इच्छा असेल त्यानें प्रथमतः श्रुतिस्मृतिप्रोक्त[1] वर्णाश्रमधर्माचें अनुष्ठान करावें. त्याचा क्रम कसा आहे तो मी तुम्हांस सांगतों. उपनयन होतांच द्विजानें वेदाध्ययनाकरितां गुरुगृहीं वास करावा. वेद व वेदान्त यांचें सांग अध्ययन झाल्यावर गुरूंना यथाशक्ति दक्षिणा देऊन समावर्तनविधि होतांच त्यानें विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकारावा. गृहस्थाश्रमांत असेपर्यंत त्यानें न्यायानें वित्त संपादन करावें. जें कांहीं दैवानें प्राप्त होईल त्यांत संतोष मानावा. भलभलत्या इच्छा करूं नये व पापाचरण सर्वथैव सोडावें. परपीडेसारखें पाप नाहीं असें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. अन्यांना पीडा देऊन स्वतः सुखी होणें हा धर्म नव्हे. अग्निहोत्रादि आश्रमकृत्यें श्रद्धापूर्वक करावीत. सर्वदां सत्य भाषण करावें. कांहीं कठिण प्रसंगीं जरी असत्य भाषण करावें लागलें तरी त्यांत गृहस्थाला दोष लागत नाहीं असें शास्त्रवचन आहे. पण त्याचा हवा तेव्हां उपयोग करूं नये. कारण, एकाद्याचा प्राण वांचत असेल किंवा असेंच एकादें मोठें कृत्य घडत असेल तर क्वचित् खोटें बोलण्यास हरकत नाहीं. असा त्या वचनाचा अभिप्राय आहे. व्यासपुत्रा, शरीर, वाणी व मन यांना सर्वदां पवित्र राखावें. ह्मणजे मलानें, दुष्ट शब्दोच्चारानें व घातुक संकल्पानें त्यांना अशुद्ध करूं नये. सुदैवानें पुत्रपौत्रें[2] झाल्यावर वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करावा. त्या आश्रमांत

१ वेद व धर्मशास्त्र यांनीं सांगितलेल्या. २ मुलगे व नातु.

तपश्चर्येच्या योगानें कामक्रोधादि षड्रिपूंना जिंकावें. ते पूर्णपणें स्वाधीन झाल्यावर भार्येला पुत्रांच्या हवालीं करून श्रौतस्मार्त अग्नि आत्म्याचे ठिकाणीं आरोपित करावे[1] आणि तदनंतर पूर्ण वैराग्य बाणलें असतां चतुर्थाश्रमाचा स्वीकार करून शांतपणें त्याच आश्रमांत शेवटपर्यंत रहावें. अहो शुकाचार्य,—जो पूर्ण विरक्त असेल त्यानेंच संन्यास करावा[2]. संन्यासाला तोच खरा अधिकारी होय.—असें वेदवचन आहे व तें सत्य आहे असें माझें मत आहे. कारण, जोंपर्यंत थोडा तरी अभिमान आहे तोंपर्यंत कोणालाही पूर्ण विरक्त होतां येत नाहीं. व तीव्र वैराग्य नसलें कीं पूर्णपणें संन्यासही करितां येत नाहीं. केवल मुंडन करणें किंवा यज्ञोपवीत टाकून भगवीं वस्त्रें नेसणें हा जर संन्यास असता व यानेंच जर परम पुरुषार्थ मिळता तर शास्त्राचे हे अनेक प्रकारचे विधिनिषेध कशास हवे होते ? व आमच्या सारख्या नियन्त्यांची तरी काय आवश्यकता होती ? शास्त्रानें विहितकर्मांचा त्याग करण्यांत व निषिद्धांचें आचरण करण्यांत जरी मोठा दोष सांगितलेला आहे तरी, दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेले लोक तें अवश्य करितात. अर्थात् आपणांस संन्यास जितका सोपा वाटतो तितका तो नाहीं. आचार्यपुत्रा, वेदानें एकंदर अठेचाळीस संस्कार सांगितले आहेत. त्यांच्या अनुष्ठानावांचून प्राणी मोक्षास पात्र होत नाहीं; असा

१ त्यांना आत्म्यामध्यें लीन करावें. २ व्यवहारांत ‘ संन्यास घ्यावा ’ असें ह्मणतात.

वेदांचाच सिद्धान्त आहे. त्यांतील गर्भाधानादि चाळीस गृहस्थाश्रमाकरितां व शमदमादि आठ यतीकरितां आहेत. गर्भाधानादि संस्कार शमदमादिकांना कारण होतात. कारण पूर्वी असतें. तें पूर्वी असल्यावांचून कार्य होत नाहीं; असा सिद्धांत आहे. यास्तव, या जन्मीं किंवा पूर्वी कोणत्या तरी जन्मीं गर्भाधानादि चाळीस संस्कार व्हावेच लागतात. त्यांवांचून शम, दम, तितिक्षा इत्यादि ज्ञानाचीं साधनें व यतीचीं मुख्य लक्षणें प्राप्त होत नाहींत. द्विजकुलांत निर्माण झालेल्या प्राण्याचे पूर्वजन्मी चाळीस संस्कार झाले आहेत कीं नाहींत हें समजण्यास मार्ग नसल्यामुळें व त्याला अनायासानें ते होण्याची वेळ आल्यामुळें त्यानें एका आश्रमांतून दुसऱ्या आश्रमांत जावें. मधल्याच आश्रमाचें उल्लंघन केल्यास मोठा प्रत्यवाय सांगितलेला आहे. हे ब्राह्मणा, याविषयीं शास्त्राचें एक मत असून शिष्टही असेंच सांगतात. यास्तव, आपण पित्याच्या आज्ञाप्रमाणें गृहस्थाश्रम स्वीकारावा. व्यासमहर्षि सर्वज्ञ आहेत. ते आपणांस अन्यथा कधींही सांगणार नाहींत."

श्रीजनकाचें हें भाषण श्रवण करून शुकाचार्य जरा खिन्न झाले; त्यांना—हा राजा आपल्या पित्याचा पक्ष घेतो—असें वाटलें. व बाबांप्रमाणेंच याचें मत असल्यामुळें याच्या हातूनही माझें समाधान होणार नाहीं—अशी त्यांची खात्री झाली. पण एकवार आपला संशय यांना सांगावा असा विचार करून ते ह्मणाले:—" राजा, क्रमाक्रमानें आश्रमाचा स्वीकार करावा असें जें तूं सांगि-

तलेंस तें ठीक आहे. तो शास्त्राचा सर्वसाधारण नियम झाला. पण त्याला कांहीं अपवाद हा असेलच कीं नाहीं? समज, एकाद्याला ब्रह्मचारी आश्रमामध्येंच पूर्ण वैराग्य झालें व अध्ययन करीत असतांनाच पूर्वपुण्यामुळें परोक्ष[1] व अपरोक्ष[2] ज्ञानही झालें, तर त्यानें काय करावें? गृहस्थाश्रम स्वीकारावा कीं यति व्हावें? त्यानें गृहस्थाश्रम स्वीकारावा असें जर तूं ह्मणशील व शास्त्रही तसेंच सांगत असेल तर विरक्त पुरुषावर एक प्रकारचा भार घातल्यासारखें होणार आहे. कारण, इच्छेविरुद्ध कोणीं कृत्य करावयास सांगितलें असतां तो प्राण्याला भार वाटत असतो. यास्तव, पूर्ण विरक्त पुरुषानें काय करावें तें मला सांग." हा शुकाचार्यांचा प्रश्न ऐकून जनक ह्मणतो:—

"शुकमुने, अध्ययनाचा असाच अवर्णनीय प्रभाव असल्यामुळें व ही आमची श्रुतिमाता आह्मां वैदिकांवर निरंतर अप्रतिम प्रेम करीत असल्यामुळें तिच्या परिचयानें ब्रह्मचाऱ्याची चित्तवृत्ति निर्मल होते. व त्यामुळें विद्यार्थ्याच्या अंत:करणांत परोक्ष ज्ञानाचा स्वच्छ प्रकाश पडतो हें खरें; पण, बाबारे, हीं दुष्ट इंद्रियें व पूर्वसंस्कार (वासना) त्याला सर्वदा टिकूं देत नाहींत. जसा एकादा कुमार्गी पुरुष सज्जनाला हरप्रयत्नानें कुमार्गी करून सोडतो, त्याप्रमाणें हीं बलढ्य इंद्रियें त्या कोंवळ्या मनाच्या बटूला विषयरूपी घोर अरण्यांत ओढून नेतात. एकादा

---

१ संशय व विपरीत कल्पना यांनीं रहित असें शाब्दिक ज्ञान. २ साक्षात्कार; अनुभव.

खाटीक जसा धेनूची इच्छा नसतांनाही तिला निर्दयपणें ओढीत नेऊन दावणीला बांधतो, त्याप्रमाणें हा इंद्रिय-समुदाय प्राण्याला विषयचिंतनांत बलात्कारानें घेऊन जातो. शुकमुने, मन व पांच ज्ञानेंद्रियें यांचा निग्रह होणें फार कठीण आहे. जगांत प्रयत्नानें पाहिजे तें मिळवितां येईल; शौर्यानें हव्या त्या शत्रूचा पाडाव करवेल; धैर्यानें पिशाचालाही स्ववश करून घेणें शक्य होईल व युक्तीनें असाध्य प्रकारही साध्य ठरेल. पण या इंद्रियांना कोणत्याही उपायानें सहज जिंकतां येणार नाहीं. हजारों लोकांमध्यें कोणी एकादाच जितेंद्रिय आढळतो. महाराज, हा इंद्रियसमूह अंत:करणांत असंख्य विकार उत्पन्न करितो व प्राण्याला त्यांच्या अधीन व्हावें लागतेंच. मिष्टान्नाची इच्छा होते, मऊ शय्या असावीशी वाटते, सुंदर स्त्री मिळावी अशी भावना होते, व उत्तम पुत्र केव्हां होईल अशी काळजी लागते. बहुतेक प्राण्यांना तरुण अवस्थेंत अशा प्रकारच्या इच्छा होतातच व त्यांचें हळु हळु निवारण करितां यावें ह्मणूनच गृहस्थाश्रमरूपी उत्तम व्यवस्था केलेली आहे. हे सत्पुरुषा, विद्यार्थि अवस्थेंत झालेलें वैराग्य अपक्व असतें. तें तरुण अवस्थेंत तसेंच तीव्र रहात नाहीं. यास्तव, आपल्याच मनावर विश्वास ठेवून राहूं नये. श्रेष्ठांचा याविषयीं अनुभव काय आहे; तें पहावें. श्रेष्ठ असें ह्मणतात कीं, विद्यार्थि अवस्थेंतल्या वैराग्यावर भिस्त ठेवून जे यति होतात ते दुःख भोगितात. कारण, एकदां मधल्या दोन आश्रमांचें उल्लंघन

केलें कीं, पुनरपि परत येतां येत नाहीं व त्या अल्पवयस्काला जगाचा अनुभव येऊं लागल्यावर विकार अवश्य होतात. त्यावेळीं असल्या अदूरदर्शी पुरुषाची काय अवस्था होत असेल याची नुस्ती कल्पना केली तरी पुरें आहे. अहो शुकाचार्य, त्या अवस्थेसारखी कष्टमय अवस्था दुसरी खचितच नसेल. वासनेला बळी पडावें तर इहलोकीं अपकीर्ति व परलोकीं अधःपात आणि तिला स्वाधीन ठेवण्याचा प्रयत्न करावा तर असह्य वेदना! सारांश, त्याला दोन्हींकडून कष्ट होतात. यास्तव, शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें प्रथमाश्रमाचें कृत्य संपतांच द्वितीयाश्रम स्वीकारावा."

शुक ह्मणतातः—राजाधिराज, वासनासमूहाचा निःशेष क्षय करण्याचा प्रयत्न केल्यास यश नाहीं का येणार?

जनकः——वासनांचा क्षय होणें अत्यंत दुर्घट आहे. मोठमोठ्या ऋषींना सुद्धां तो करितां आला नाहीं आणि ह्मणूनच त्यांनीं आह्मांस त्यांचा क्रमाक्रमानें क्षय करण्यास सांगितलें आहे. त्यांचा कशा क्रमानें त्याग करावा? ही अडचण कोणाला पडूं नये ह्मणुन त्या ईश्वरस्वरूप महात्म्यांनीं चार आश्रमांची व्यवस्था केली आहे.

शुकः—पण चारी आश्रमांचा क्रमानें स्वीकार करणारा पुरुष तरी त्यांचा क्षय करीलच ह्मणून कशावरून? एकाद्याच्या वासना प्रबल असणेंही शक्य आहे!

जनकः—ही गोष्ट खरी, पण उंचावर निजणाऱ्या मनुष्याला जशी पडण्याची भीति असते व भूमीवर निजणा-

राला ती जशी नसते तशीच आश्रमांचा क्रम सोडणारांला भीति असते व क्रमानें त्यांचा स्वीकार करणारांस ती नसते. गृहस्थाश्रमी जर भ्रष्ट झाला तर त्याला प्रायश्चित्त तरी घेतां येतें; संन्याशाला तेंही नाहीं. –घाईनें पुष्कळ काम करण्यापेक्षां सावकाशपणें थोडेंच काम केलेलें पतकरतें–असें जें व्यवहारांत ह्मणतात तेंच येथेंही लागू पडतें. मुंगी हळू हळू वृक्षावर चढते व अनायासानें फळ चाखिते. पण पक्ष्याची स्थिति तशी होत नाहीं. तो दुरूनच फळ पाहून हापापल्यासारखा होतो; व एकदम त्याच्या जवळ उडून जातो. पण काय उपयोग? मध्यें कांहीं विघ्न न येतां जरी कदाचित् तो फळाजवळ जाऊन पोंचला तरी श्रमामुळें तो थकून जातो व बराच वेळ धांपा टाकीत बसल्यावांचून त्याला त्या फळाला स्पर्शही करितां येत नाहीं. ज्यांचा पूर्वपुण्याचा सांठा नसतो त्यांना तर मनाला कधींच जिंकतां येत नाहीं. पण जे पुण्यवान् व भाग्यवान् असतात, त्यांना सुद्धां त्याला सतत स्वाधीन ठेवणें कठिण पडतें. यास्तव, दांडगाई न करितां युक्तियुक्तीनें त्याला स्ववश करणें चांगलें. अहो, गृहस्थाश्रम तरी सोपा का आहे? त्यांत रहाणाऱ्या पुरुषानें सुद्धां शांत असावें; ईश्वराची सतत उपासना करावी; लाभाचा आनंद व हानीचें दुःख मानूं नये; सर्वदां शास्त्रोक्त कृत्यें करावींत; कोणत्याही प्रकारची चिंता करूं नये; आत्मज्ञान होणें हाच परम लाभ समजावा. आपल्या हातून जें जें बरें वाईट कृत्य होईल तें तें सर्व ईश्वरार्पण करावें

व नियत[1] कर्में श्रद्धापूर्वक करावींत इत्यादि विधानें आहेतच. व असें करणारा पुरुष त्या आश्रमांत राहूनही मुक्त होतो. अहो महाराज, मजकडेच कां पहाना? मी राज्यासारखें मोठें कठीण काम करीत असतांनाही जीवन्मुक्त आहें. मी मन मानेल तसें वागतों. पण ' हें मीं केलें, हें माझें आहे ' असें मी कधींही ह्मणत नाहीं व त्यामुळें मला त्यांचा गंधही लागत नाहीं. फार कशाला? महाराज, आपण जेव्हां येथें आलांत तेव्हां माझ्या सेवकानें आपला अपमान केला असें जें आपणांस वाटलें तें कां? त्यानें माझ्या आज्ञेप्रमाणें आपणांस आंत येऊं दिलें नाहीं. एवढ्याच निमित्तावरून जे आपण रागावलांत ते कशाकरितां? ' मी शुक ह्मणून कोणी विद्वान् पुरुष आहें ' असें आपणांस वाटत असल्यामुळेंच हा प्रकार घडला कीं नाहीं? झालें तर. जोंपर्यंत ' मी ' ही तुमची भावना नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत तुह्मी चतुर्थाश्रमास योग्य नाहीं. ह्यास्तव, महाराज, पित्याच्या आज्ञेप्रमाणें विवाह करा व गृहस्थाचे सर्व धर्म योग्यप्रकारें पाळा; ह्मणजे माझ्याप्रमाणेंच तुह्मीही जीवन्मुक्त व्हाल. जे एकदम यति झाले आहेत त्यांना जाऊन विचारा. ते काय सांगतात तें पहा. ह्मणजे तुमची खात्री होईल. अहो, मनुष्यानें यतीचा जरी वेष घेतला तरी मन जोंपर्यंत यति झालें नाहीं, तोंपर्यंत त्याचा काय उपयोग? अहो ब्राह्मणश्रेष्ठ, सुखदुःखाला मनच कारण आहे. पुण्य, पाप

[1] शास्त्रोक्त नित्य कर्में.

मनच करितें; संस्कार मनालाच बद्ध करितात व उत्त-माधम जन्म मनच घेतें. तें एकदां निर्मल झालें कीं सर्व जग निर्मल ! तें एकदां शांत झालें कीं सर्व सृष्टि शांत व तें एकदां आत्मारामामध्यें लीन झालें कीं सर्व त्रिभुवन लीन होतें. मनावांचून प्राण्याचा हितकर्ता किंवा शत्रु कोणी नाहीं. तें शुद्ध झाल्यावर आश्रमांची किंमत नाहीं व त्याच्या शांततेच्या पलीकडे मोक्ष ह्मणून कांहीं पदार्थच नाहीं. सारांश, मन निर्मल होईपर्यंत शास्त्रें, आश्रम, वर्ण, तीर्थें, दानें, तपें इत्यादिकांची आवश्यकता असते. त्यानंतर हें सर्व निरर्थक ठरतें. ह्यास्तव, शुकमुनें, चित्तशुद्धीकडे दृष्टि ठेवून आपल्यासारख्यानें योग्य आश्रमाचा स्वीकार करावा हें चांगलें.

जनकराजाचें हें अस्खलित व विचार करण्यासारखें भाषण ऐकून शुकाचार्य जरा लज्जित झाले; त्यांनीं खालीं मान घातली व आपल्या शंका विचारण्याचें त्यांना धैर्य झालें नाहीं. शुकाचार्य कांहींच बोलत नाहींत असें पाहून जनकराजा पुनः त्यांना ह्मणाला “ अहो गुरुपुत्र, तुमच्या ज्या शंका असतील त्या आतां मला विचारा. मी त्यांचें समाधानकारक उत्तर देतों. ह्मणजे त्यामुळें तुमच्या येण्याचें सार्थक होईल. ”

शुकाचार्य—महाराज, आपण माझे गुरु आहां. बृह-स्पतींनीं मला केवल शब्दविद्या शिकविली, पण आपण मला शब्दातीत[1] ज्ञान देत आहां. “ जनकराजा दांभिक

---

१ शब्दाच्या पलीकडचें.

आहे." असें मी उगीच समजलों. असल्या ईश्वरस्वरूप पुरुषाविषयीं भलभलत्या कल्पना करण्यांत मीं मोठा अपराध केला. अहो राजाधिराज, मनुष्य नुस्त्या कल्पनांनीं कसा फसतो ह्याचें मला आज प्रत्यक्ष ज्ञान झालें. हर ! हर ! प्राणी युक्ति युक्ति ह्मणून जिला ह्मणत असतो ती अनुभवापुढें किती लटकी पडते, याविषयीं आतां माझी खात्री झाली. असो. राजा,—परतंत्रता ह्मणजेच बंध. प्राणी परतंत्र असल्यामुळें बद्ध आहे—असें ज्ञानी ह्मणतात. पण त्याचें रहस्य अजून मला समजलें नाहीं. कारण, संसारामुळें तो परतंत्र ह्मणजे बद्ध होत असतो अशी माझी समजूत आहे. तेव्हां बंधाचें खरें कारण कोणतें ?

जनकः—व्यासपुत्रा, देह, जीवात्मा, इंद्रियें, संसार इत्यादिकांपैकीं कोणीही बंधाला कारण नाहीं. मन हेंच एक बंधाला कारण आहे. कारण, आत्मा असंग असल्यामुळें, नित्य शुद्ध व निराकार असल्यामुळें नित्यमुक्त आहे; व त्यामुळें बंध व मोक्ष हे मनावर राहतात. ह्मणूनच मन शांत झालें असतां तेही शांत होतात. शत्रु, मित्र, उदासीन इत्यादि सर्व भेद मनोगत आहेत. मन विक्षेप[1]शून्य झालें कीं द्वैत[2] भासेनासें होतें. व द्वैताचें अभान झालें कीं अद्वैत[3] प्रत्ययाला येऊं लागतें. जीव ह्मणजे ब्रह्माचा आभा[4]स. आणि आभास व त्याचें अधिष्ठान हीं दोन्हीं एकच,

१ वृत्तिरहित; मनावर उठणाऱ्या संकल्पविकल्परूप तरंगांना वृत्ति असें ह्मणतात. २ स्वर्गीनले अनेक पदार्थ. ३ केवळ स्वतःचें रूप. ४ प्रतिबिंब.

ग्रं. क्र. १२४

असा व्यवहारांतही अनुभव[1] आहे. त्यामुळें ' जीव ब्रह्मच आहे ' असा जो श्रुतीचा सिद्धांत तो निर्दोष ठरतो. संसारामध्यें मनाला विक्षेप होण्यास अनेक कारणें असल्यामुळें तो बंधाला कारण आहे असें सकृद्दर्शनीं वाटतें; पण खरा प्रकार तसा नाहीं. संसार ह्मणून कोणी पदार्थ का आहे ? नाहीं. ती तरी एक मनाची भावनाच आहे. बरें, तीच भावना बंधाला कारण होते ह्मणून जर ह्मणावें, तर तसेंही नाहीं. कारण, प्राणी अनेक भावनांनीं बद्ध झाल्याचें दिसतें. तस्मात् , भावनामय मनच संसाराचें कारण आहे, असें निःसंशय ठरतें. शुक मुने, या भेदज्ञानरूप मनालाच अविद्या ह्मणतात. ती विद्येच्या ह्मणजे मन विक्षेपरहित झाल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या अद्वैतज्ञानाच्या योगानें निवृत्त[2] होते. पण सोन्याकरितां जशी व्यवहारांत चिंधीची गरज बाळगितात, त्याप्रमाणें ह्या विद्येकरितां अविद्येचेंही ज्ञान होणें अवश्य असतें. कारण, प्रकाशावांचून जसा अंधकार समजत नाहीं व अंधकारावांचून प्रकाश समजत नाहीं, त्याप्रमाणें विद्येवांचून अविद्या समजणार नाहीं व अविद्येवांचून विद्येचें यथार्थ ज्ञान होणार नाहीं. यास्तव, विद्येचें व अविद्येचेंही ज्ञान करून घ्यावें. मुनिश्रेष्ठा, परमार्थतः[3] जर पाहूं गेलें तर

१ आरशांत पडलेलें मुखाचें प्रतिबिंब व त्याच्या समोर असलेलें मुख ह्मणजे त्याचा अधार हीं दोन्हीं एकच. भिन्न नव्हेत. मुख खरें व प्रतिबिंब आरशामुळें भासणारें. २जातें, नाहींशी होते. ३ तत्त्वतः, खरोखर, सूक्ष्मदृष्ट्या.

वर्ण नाहीं; आश्रम नाहीं; वर्णाश्रमधर्म नाहीं; स्वर्ग नाहीं; नरक नाहीं; ईश्वर नाहीं; स्त्री नाहीं; पुरुष नाहीं; नपुसक नाहीं; पिता नाहीं; पुत्र नाहीं; माता नाहीं; कन्या नाहीं; मी नाहीं; तूं नाहीं; तो नाहीं; वृक्ष पाषाणादि पदार्थ नाहींत व हा देहही नाहीं. पण जों-पर्यंत यांतील एकाचा तरी प्रत्यय येत असतो तोंपर्यंत सर्व कांहीं आहे. कारण, सृष्टीचें रक्षण करण्याकरितां ईश्व-रानें ह्या सर्व मर्यादा केलेल्या आहेत व ती ईश्वरकृति अस-ल्यामुळें प्राण्यानें कितीही जरी प्रयास केला तरी बदल-णार नाहीं आणि ईश्वरानें केलेली ही वर्णाश्रमादि व्यवस्था जर मोडली तर खचित जगाचा नाश होईल. अथवा या वर्णाश्रमादि धर्माचा नाश ह्मणजेच जगाचा नाश होय. यास्तव, वेदोक्त मार्गाचें अवलंबन करावें. त्यावांचून निदान ब्राह्मणाचें तरी कल्याण होणार नाहीं.

शुकाचार्यः—महाराज, आपण जें सांगितलेंत तें खरें आहे. त्याविषयीं मला शंका नाहीं. पण वेदाविषयीं मला एक मोठा संदेह आहे. त्याचें निरसन करावें. वेदोक्त धर्म जर इतका सर्वोत्तम आहे तर त्यांत पशुहिंसा कां सांगितली आहे ? पशूंची हिंसा करणें हा धर्म आहे असें कोणी ह्मणत नाहीं. तेव्हां त्या हिंसारूप अधर्मा-पासून मोक्ष कसा मिळणार ? व ती करण्याविषयीं सांग-णारे वेद तरी प्रमाण कसे ठरतील ? अहो, हिंसा हा प्रत्यक्ष अनाचार आहे. तसेंच सोमपान सुद्धां मोठेंसें चांगलें कृत्य आहे असें नाहीं. सारांश, प्राणिहिंसा व

मांसभक्षण हीं वेदानें सांगितलेलीं कृत्यें जर धर्म ह्मणून मानूं लागलें तर चोर व वेश्या यांचें कृत्य तरी अधर्म कां ? अहो, सौत्रामणियागांत तर धडधडीत सुरापान करण्याविषयीं सांगितलें आहे. तसेंच द्यूतक्रीडा करण्याविषयींही विधान आहे. देहाला नानाप्रकारें कष्ट देणारीं व्रतें सांगितलीं आहेत व अशींच आणखी अनेक अधर्मप्रचुर कृत्यें वेदानें सांगितलीं आहेत. अशी एक आख्यायिका[1] आहे कीं, पूर्वी कोणी शशबिंदु नांवाचा उत्तम राजा होता. त्यानें पुष्कळ यज्ञ केले; तो मोठा धार्मिक व दाता होता; त्यानें जन्मांत कधींही असत्य भाषण केलें नाहीं; उन्मार्गी लोकांना तो काळासारखा क्रूर व सन्मार्ग्यांना चंद्रासारखा आल्हाददायी वाटत असे. त्या राजानें शेंकडों यज्ञ केले व ब्राह्मणांना अपरिमित दक्षिणा दिली. त्यानें यज्ञामध्यें जे पशु मारिले होते, त्यांच्या कातड्यांचा पर्वतासारखा ढीग झाला. पण मेघांच्या उदकानें तीं कातडीं वाहून गेल्यामुळें तेथल्या नदीला चर्मण्वती हें नांव प्राप्त झालें. पण इतक्या हिंसा करणारा राजाही शेवटीं स्वर्गलोकीं गेला. व त्याची सर्व लोक कीर्ति गाऊं लागले. सारांश, कर्मकाण्डांत सांगितलेले धर्म हे असे असल्यामुळें माझी त्यांचे ठिकाणीं निष्ठा बसत नाहीं. अहो, गृहस्थाश्रमामध्यें स्त्रीशीं रत होऊन पुरुष सुख भोगितो व तें त्याला न मिळालें कीं ‘ हाय ! हाय ’ ह्मणून व्याकुळ होतो. तेव्हां अशा अवस्थेंत मनुष्य जीवन्मुक्त कसा होणार ?

१ कथा, कहाणी.

जनक०—शुकमुने, वेदांचा विस्तार मोठा असल्यामुळे त्यांची सर्वांनाच एकवाक्यता करितां येत नाहीं. पण ती होणें शक्य आहे. ह्मणूनच सर्व शास्त्रांची एकवाक्यता करण्याकरितां पूर्व व उत्तर मीमांसा प्रवृत्त झाल्या आहेत. स्मृतींनीं सुद्धां तेंच काम केलें आहे. व पुराणामध्येंही व्यासांनीं हाच प्रयत्न केलेला आहे; हें तुह्मास ठाऊकच आहे. यज्ञामध्यें जी प्रत्यक्ष हिंसा करावयास सांगितली आहे, ती वस्तुतः अहिंसाच होय. कारण, उपाधीच्या योगानें हिंसा होत असते, त्यावांचून नाहीं. ज्याप्रमाणें ओल्या लांकडामुळेंच अग्नीचे ठिकाणीं धूर दिसतो व त्यावांचून दिसत नाहीं; त्याप्रमाणें वेदोक्त हिंसा अहिंसाच आहे असें समजावें. स्वेच्छेनें—ह्मणजे आपला देह पुष्ट करण्याकरितां, रसनेंद्रियाची तृप्ति करण्याकरितां व केवळ स्वार्थाकरितां—जी हिंसा होते तीच मात्र हिंसा होय. निःस्पृहपणें होणारें कोणतेंही कृत्य हिंसा नव्हे. तृष्णेवांचून व अहंकारावांचून जें कर्म होतें तें कर्म नव्हेच. पंडित लोक त्याला अकर्म ह्मणतात. गृहस्थाला जी हिंसा सांगितलेली आहे ती यज्ञापुरतीच आहे; जिव्हेला तृप्त करण्याकरितां नव्हे. शिवाय हें वेदोक्त कर्म आहे अशा भावनेनें तो तो करीत असतो. त्यामुळें जरी तें सदोष[1] असलें तरी त्याबद्दल तो दोषी होत नाहीं. कारण, अहंभावानें जें बरें किंवा वाईट कर्म होत असतें त्याच्या योगानें प्राणी लिप्त[2] होतो; त्यावांचून नाहीं.

---

१ दोषयुक्त. २ दूषित, कलुषित.

शुकः—पण महाराज, मायेमध्यें रहाणारा पुरुष निःस्पृह कसा असूं शकेल ? अहो, तपेंच्या तपें शास्त्राध्ययन केलेल्या पुरुषाला सुद्धां जर मायेचें उल्लंघन करितां येत नाहीं, तर हा मायेंत लोळणारा पुरुष निरहंकार कसा होईल ? हा मला अजून संशय आहे. केवळ शब्दज्ञान अंतःकरणगत अज्ञानाची निवृत्ति करणार नाहीं. कारण, केवळ दिव्याचें नांव उच्चारिल्यानेंच अंधकार लुप्त होत नसतो. अहो, शब्दार्थज्ञान[1] झाल्यावर त्यांतील अर्थाची प्रचीति येण्याकरितां सर्व भूतांना सारखें मानावें लागतें; कोणाचाही द्रोह करणें प्रशस्त होत नाहीं व सर्व दृश्य पदार्थ अनित्य आहेत अशी भावना करावी लागते. पण या सर्व गोष्टी गृहस्थाच्या हातून होण्यासारख्या आहेत का ? फार कशाला? हे राजाधिराज, तुमची तरी द्रव्याविषयींची इच्छा तृप्त झाली आहे का ? राजसुख तुह्मी विषासारखें मानतां का? तुह्माला जयाची इच्छा आहे कीं नाहीं ? व तुमची जर कोणतीच इच्छा तृप्त झालेली नाहीं तर तुह्मी जीवन्मुक्त तरी कसले ? अहो, चोराला तुह्मी चोर ह्मणतां; तपस्व्याला साधु मानितां आणि हा माझा व तो तुझा हा आपपर भावही ठेवितां, तेव्हां तुह्मांस विदेही कसें ह्मणावें ? जनकराजा, कडु, आंबट, तिखट, इत्यादि रस तुह्मांस समजतात ना ? रमणीय वस्तूकडे लक्ष्य जातें ना ? बीभत्स पदार्थांचें दर्शनही नकोसें होतें ना ? जागृती, स्वप्न व गाढ निद्रा या तीन अवस्थांचा तुह्मांस प्रत्यहीं[2] अनुभव येतोना ?

---

१ शब्दांच्या अर्थाचें ज्ञान २ रोज.

पायदळ, रथ, घोडे, हत्ती इत्यादि सर्व माझें आहे, ही आपली भावना अजून नष्ट झालेली नाहीं ना ? अहो महाराज, आपण मिष्ट पदार्थ भक्षण करितां; कांहीं निमित्त झालें असतां हंसतां व खेद पावतां आणि प्राकृताप्रमाणें अशाच आणखीं किती तरी गोष्टी करितां. तेव्हां आपणांस जीवनमुक्त कसें ह्मणावें? हा मोठा प्रश्न आहे. अहो नृपते, जो पुरुष मुक्त असतो तो पुष्पांच्या माळेला व भुजंगाला सारखेंच मानतो. माती व सुवर्ण यांचें मोल तो सारखेंच लेखितो; सर्वांच्या ठिकाणीं आत्मबुद्धि[1] ठेवितो व सर्व प्राण्यांचें यथाशक्ति हित करितो. पण आपला तसा प्रकार दिसत नाहीं. माझ्याविषयीं जर विचाराल तर माझें मन कोठेंच रममाण होत नाहीं. गृहस्थाश्रम स्वीकारावा; पत्नीसह संसार करावा; संतति व्हावी इत्यादिकांची मला मुळींच इच्छा नाहीं. एकांतस्थळीं निस्पृहपणें खुशाल रहावें, असें वारंवार मनांत येतें. कोठेंही प्रीति न ठेवितां, कोणालाही ‘ तूं माझा ’ असें न ह्मणतां, शांतपणें पानें, फळें व कंदमुळें यांवर उपजीविका करीत मृगाप्रमाणें एकट्यानेंच रहावें असें वाटतें. अहो, गृह, द्रव्य व सुस्वरूप भार्या यांच्या योगानें मला काय लाभ होणार आहे ? उलट अपरिमित हानि मात्र होईल! मी पूर्ण विरक्त झालों आहें. महाराज, मी स्पष्टपणें बोलतों ह्मणून रागावूं नका. पण तुह्मी जीवन्मुक्त कसे हें मला अजून समजलें नाहीं. हा दंभ तर नव्हेना? कारण, कोण-

१ माझ्याप्रमाणेंच हे सर्व आहेत असें जाणतो.

त्यांही राजाला शत्रूविषयीं, धनाविषयीं व सैन्याविषयीं चिंता वाटणें साहजिक आहे. अहो, जे मोठे मोठे तपस्वी असतात त्यांना सुद्धां जर ही माया मोहित करिते तर सर्वदां भोगांत रहाणाऱ्या तुमची काय कथा ? तुमच्या कुलामध्यें जेवढे राजे झाले त्या सर्वांना विदेह हें नांव आहे. पण तें निरर्थक असावें असें मला वाटतें. ह्मणजे मूर्खाला विद्याधर, आंधळ्याला दिवाकर[1] व दरिद्र्याला लक्ष्मीधर जसें ह्मणावें तसेंच हें तुमचें नांव आहे. तुमच्या कुलामध्यें जे राजे झाले ते नांवानें मात्र विदेह होते, कर्मानें नव्हते; कारण, अशी एक कथा सांगतात कीं, पूर्वी निमि ह्मणून तुमच्या कुलांत कोणी राजा होऊन गेला. त्यानें एकदां यज्ञ करण्याचें मनांत आणलें व त्याप्रमाणें आपल्या वसिष्ठगुरूंना कळविलें. श्रीवसिष्ठांनीं " मला इंद्राकडून यज्ञाकरितां बोलावणें आलें आहे, यास्तव, मी तो यज्ञ आटोपून येतों व नंतर तुझा यज्ञ करीन. तोंपर्यंत तूं हळू हळू यज्ञाचें साहित्य जमीव " असें त्यास सांगितलें. वसिष्ठमुनि स्वर्गलोकीं गेल्यावर निमिराजानें दुसरा गुरु करून आपला उद्देश सिद्धीस नेला. वसिष्ठांना हें वर्तमान समजतांच त्यांनीं त्याला शाप दिला. राजानेंही वसिष्ठांना उलट शाप दिला. सारांश, ते दोघेही परस्परांच्या शापानें पतित झाले. अहो, निमिराजा जर विदेही असता तर त्यानें गुरूला कधींही शाप दिला नसता. पण त्यानें ज्याअर्थी पूज्य गुरूंनाही शाप दिला त्याअर्थी तुह्मांस विदेही ह्मणणें हा विनोद[2] आहे असें मला वाटतें."

---

१ सूर्य. २ थट्टा, मस्करी.

जनकः---खरें आहे. अहो गुरुपुत्र, आपलें भाषण अक्षरशः खरें आहे. कारण, शब्दव्यवहार हा नेहमींच खोटा असतो. पण महाराज, मी काय ह्मणतों तें ऐका. माझ्या परमपूज्य [१]गुरूंनीं जें सांगितलें तेंच खरें आहे व त्यांतच तुमचें खरें हित आहे. पित्याची संगति टाकून अरण्यांत जाऊन राहण्याची जी तुमची इच्छा आहे, ती सफल होणार नाहीं. कारण, अहो, तुह्मी पित्याला जरी सोडून गेलांत तरी जाल तेथें पशु, पक्षी, किडे, मुंग्या, माशा इत्यादि प्राणी असणारच. त्यांना सोडण्याचें कांहीं तुमचें सामर्थ्य नाहीं. व ते असले कीं त्यांच्याशीं तुमचा नकळत तरी संसर्ग हा होणारच. मग तुह्मीं सोडलेंत तें काय ? निरापराधी, तुमच्यावर [२]अकृत्रिम प्रेम करणाऱ्या व जन्मापासून तुमच्याकरितां कष्ट सोसलेल्या पित्याला सोडण्यांत मोठेंसें भूषण आहे असें नाहीं. अहो, पित्याची संगति जरी सोडिली तरी पंचमहाभूतांची संगति का कोठें सुटणार आहे ? देह असेपर्यंत तीं तुह्मांला चिकटून राहणारच. तुमच्या इच्छेला तीं मुळींच भीक घालणार नाहींत. बरें, चिंतेविषयीं ह्मणाल, तर तीही कोठें गेलें तरी सर्वथैव सुटणार नाहीं. कारण, तुह्मांला कांहीं आहार तर हवाना ? त्यावांचून तुमचा देह राहूं शकणार नाहीं. अर्थात् क्षुधा लागली कीं– खाण्यासारखीं फळें, मुळें किंवा निदान पानें तरी कोठें मिळतील ?–ही चिंता आली. त्याचप्रमाणें दंड पाहिजे; अजिन पाहिजे; उदक पाहिजे

१ व्यासांनीं. २ निर्मळ, अहेतुक.

त्यांही राजाला शत्रूविषयीं, धनाविषयीं व सैन्याविषयीं चिंता वाटणें साहजिक आहे. अहो, जे मोठे मोठे तपस्वी असतात त्यांना सुद्धां जर ही माया मोहित करिते तर सर्वदां भोगांत रहाणाऱ्या तुमची काय कथा ? तुमच्या कुलामध्यें जेवढे राजे झाले त्या सर्वांना विदेह हें नांव आहे. पण तें निरर्थक असावें असें मला वाटतें. ह्मणजे मूर्खाला विद्याधर, आंधळ्याला दिवाकर[1] व दरिद्र्याला लक्ष्मीधर जसें ह्मणावें तसेंच हें तुमचें नांव आहे. तुमच्या कुलामध्यें जे राजे झाले ते नांवानें मात्र विदेह होते, कर्मानें नव्हते; कारण, अशी एक कथा सांगतात कीं, पूर्वीं निमि ह्मणून तुमच्या कुलांत कोणी राजा होऊन गेला. त्यानें एकदां यज्ञ करण्याचें मनांत आणलें व त्याप्रमाणें आपल्या वसिष्ठगुरूंना कळविलें. श्रीवसिष्ठांनीं "मला इंद्राकडून यज्ञाकरितां बोलावणें आलें आहे, यास्तव, मी तो यज्ञ आटोपून येतों व नंतर तुझा यज्ञ करीन. तोंपर्यंत तूं हळू हळू यज्ञाचें साहित्य जमीव" असें त्यास सांगितलें. वसिष्ठमुनि स्वर्गलोकीं गेल्यावर निमिराजानें दुसरा गुरु करून आपला उद्देश सिद्धीस नेला. वसिष्ठांना हें वर्तमान समजतांच त्यांनीं त्याला शाप दिला. राजानेंही वसिष्ठांना उलट शाप दिला. सारांश, ते दोघेही परस्परांच्या शापानें पतित झाले. अहो, निमिराजा जर विदेही असता तर त्यानें गुरूला कधींही शाप दिला नसता. पण त्यानें ज्याअर्थीं पूज्य गुरूंनाही शाप दिला त्याअर्थीं तुह्मांस विदेही ह्मणणें हा विनोद[2] आहे असें मला वाटतें."

---

१ सूर्य. २ थट्टा, मस्करी.

जनकः—खरें आहे. अहो गुरुपुत्र, आपलें भाषण अक्षरशः खरें आहे. कारण, शब्दव्यवहार हा नेहमींच खोटा असतो. पण महाराज, मी काय ह्मणतों तें ऐका. माझ्या परमपूज्य [1]गुरूंनीं जें सांगितलें तेंच खरें आहे व त्यांतच तुमचें खरें हित आहे. पित्याची संगति टाकून अरण्यांत जाऊन राहण्याची जी तुमची इच्छा आहे, ती सफल होणार नाहीं. कारण, अहो, तुह्मी पित्याला जरी सोडून गेलांत तरी जाल तेथें पशु, पक्षी, किडे, मुंग्या, माशा इत्यादि प्राणी असणारच. त्यांना सोडण्याचें कांहीं तुमचें सामर्थ्य नाहीं. व ते असले कीं त्यांच्याशीं तुमचा नकळत तरी संसर्ग हा होणारच. मग तुह्मीं सोडलेंत तें काय ? निरापराधी, तुमच्यावर अकृत्रिम[2] प्रेम करणाऱ्या व जन्मापासून तुमच्याकरितां कष्ट सोसलेल्या पित्याला सोडण्यांत मोठेंसें भूषण आहे असें नाहीं. अहो, पित्याची संगति जरी सोडिली तरी पंचमहाभूतांची संगति का कोठें सुटणार आहे ? देह असेपर्यंत तीं तुह्मांला चिकटून राहणारच. तुमच्या इच्छेला तीं मुळींच भीक घालणार नाहींत. बरें, चिंतेविषयीं ह्मणाल, तर तीहि कोठें गेलें तरी सर्वथैव सुटणार नाहीं. कारण, तुह्मांला कांहीं आहार तर हवाना ? त्यावांचून तुमचा देह राहूं शकणार नाहीं. अर्थात् क्षुधा लागली कीं— खाण्यासारखीं फळें, मुळें किंवा निदान पानें तरी कोठें मिळतील ?—ही चिंता आली. त्याचप्रमाणें दंड पाहिजे; अजिन पाहिजे; उदक पाहिजे

---

१ व्यासांनीं. २ निर्मल, अहेतुक.

व हीं सर्व हवीशीं वाटलीं कीं त्यांची चिंता आलीच ! तात्पर्य, व्यासांना सोडून दूर गेल्यानें चिंता जाते असें नाहीं. यास्तव, अशक्य गोष्ट करण्याचें धैर्य धरण्यापेक्षां अनुभवी लोकांनीं योजिलेल्या युक्तीनें एका उपायानें दोन फळें मिळविण्याची इच्छा करावी हें चांगलें. गृहस्थाश्रमामध्यें स्वार्थ व परमार्थ हीं दोन्हीं साधतां येतात; इतर आश्रमांत तसा प्रकार नसतो. केवळ ग्राम्य कृत्यांकरितांच विवाह करणें हा आश्रम नव्हे. तो विषय झाला. आतां माझ्याविषयीं जें आपण कांहीं बोललां त्याचें उत्तर सांगतों. मी सर्व चिंता करितों, पण त्यांतील एकीच्या ठिकाणींही आसक्त होत नाहीं. ज्याला विकल्प त्याला दुःख. तुह्मांला माझ्याविषयीं संशय आला व पित्याचें वचन अप्रमाण वाटलें ह्मणूनच येथपर्यंत येण्याचे कष्ट सोसावे लागले. जेथें विकल्पच नाहीं तेथें दुःख तरी कोठलें ? मी राज्य करितों खरा, पण तें माझें आहे असें मी स्वप्नांतही ह्मणत नाहीं. देह पडेपर्यंत मला हें असेंच केलें पाहिजे असें ह्मणून ओझें वाहणाऱ्या उंटाप्रमाणेंच मी एकप्रकारचें हें ओझें वहात आहें. उंटाला जसा सारवान मागून हांकीत असतो त्याप्रमाणें मला माझें दैव मागून हांकीत आहे; आणि त्यामुळेंच मी हें सर्व करीत आहें. मला कशीही जरी अवस्था प्राप्त झाली तरी मी आनंदांतच असतों. मी निजतों सुखानें; खातों सुखानें; विहार करितों सुखानें व प्रसंग पडल्यास इतरांना बरें वाटावें ह्मणून रडतोंही सुखानेंच. सारांश, मला जिकडे तिकडे सुखच दिसतें आहे. मी बद्ध आहें

असें मला कधींच वाटत नाहीं व त्यामुळें मीं सर्वदां सुखी असतों. पण, शुकाचार्य, तुमच्या मनाची तशी स्थिति नसल्यामुळें 'मी बद्ध आहें' असें तुह्मांस वाटतें व त्यामुळेंच तुह्मी कष्ट सोसतां. माझ्याविषयीं व माझ्या पितरांविषयीं जो आपणांस संशय वाटला त्याचें कारण तरी हेंच. प्राणी आपणांवरून जगाची परीक्षा करीत असतो. पण त्यामुळें तो बहुतकरून फसतो. अहो महाराज, सर्व संशय सोडा व जें जें प्राप्त होईल तें तें मुकाट्यानें भोगा. ह्मणजे तुह्मी सुखी व्हाल. सुखाचा खरा उपाय हाच आहे. 'हा माझा देह' असें ह्मणतांच प्राणी बद्ध होतो व 'तो माझा नव्हे' असें निःसंशय समजतांच तो मुक्त होतो. हा उपाय बोलण्यास सोपा व ऐकण्यास फार गोड आहे, पण करण्यास अतिशय कठीण आहे. यास्तव, आश्रमरूपी उत्तरोत्तर उत्कृष्ट युक्तींचा आश्रय करावा. असें केल्यास पतित होण्याची भीति नाहीं. अहो आचार्य, आपण ज्ञानी आहांत. माझ्यासारख्या पामरानें आपणांस उपदेश करावा हें योग्य नव्हे. पण मला जें कांहीं ठाऊक आहे तें मीं तुह्मास सांगितलें. यापेक्षां अधिक मला कांहींएक सांगतां येणार नाहीं. शास्त्र व श्रद्धा हीं कल्याणाचीं साधनें व संशय हें नाशाचें साधन आहे असें समजावें. ह्या एका वाक्यांत सर्व धर्मोपदेश आला.

हें जनकाचें भाषण ऐकून शुकाचार्य अत्यंत संतुष्ट झाले. त्यांच्या सर्व संशयांची निवृत्ति झाली व--पित्याच्या आज्ञेप्रमाणें विवाह करून मीही जनकाप्रमाणेंच असंग

व हीं सर्व हवीशीं वाटलीं कीं त्यांची चिंता आलीच ! तात्पर्य, त्यासांना सोडून दूर गेल्यानें चिंता जाते असें नाहीं. यास्तव, अशक्य गोष्ट करण्याचें धैर्य धरण्यापेक्षां अनुभवी लोकांनीं योजिलेल्या युक्तीनें एका उपायानें दोन फळें मिळविण्याची इच्छा करावी हें चांगलें. गृहस्थाश्रमामध्यें स्वार्थ व परमार्थ हीं दोन्हीं साधतां येतात; इतर आश्रमांत तसा प्रकार नसतो. केवळ ग्राम्य कृत्यांकरितांच विवाह करणें हा आश्रम नव्हे. तो विषय झाला. आतां माझ्याविषयीं जें आपण कांहीं बोललां त्याचें उत्तर सांगतों. मी सर्व चिंता करितों, पण त्यांतील एकीच्या ठिकाणींही आसक्त होत नाहीं. ज्याला विकल्प त्याला दुःख. तुह्मांला माझ्याविषयीं संशय आला व पित्याचें वचन अप्रमाण वाटलें ह्मणूनच येथपर्यंत येण्याचे कष्ट सोसावे लागले. जेथें विकल्पच नाहीं तेथें दुःख तरी कोठलें ? मी राज्य करितों खरा, पण तें माझें आहे असें मी स्वप्नांतही ह्मणत नाहीं. देह पडेपर्यंत मला हें असेंच केलें पाहिजे असें ह्मणून ओझें वाहणाऱ्या उंटाप्रमाणेंच मी एकप्रकारचें हें ओझें वहात आहें. उंटाला जसा सारवान मागून हांकीत असतो त्याप्रमाणें मला माझें दैव मागून हांकीत आहे; आणि त्यामुळेंच मी हें सर्व करीत आहें. मला कशीही जरी अवस्था प्राप्त झाली तरी मी आनंदांतच असतों. मी निजतों सुखानें; खातों सुखानें; विहार करितों सुखानें व प्रसंग पडल्यास इतरांना बरें वाटावें ह्मणून रडतोंही सुखानेंच. सारांश, [illegible] आहे. मी बद्ध आहें

असें मला कधींच वाटत नाहीं व त्यामुळें मीं सर्वदां सुखी असतों. पण, शुकाचार्य, तुमच्या मनाची तशी स्थिति नसल्यामुळें 'मी बद्ध आहें' असें तुह्मांस वाटतें व त्यामुळेंच तुह्मी कष्ट सोसतां. माझ्याविषयीं व माझ्या पितरांविषयीं जो आपणांस संशय वाटला त्याचें कारण तरी हेंच. प्राणी आपणावरून जगाची परीक्षा करीत असतो. पण त्यामुळें तो बहुतकरून फसतो. अहो महाराज, सर्व संशय सोडा व जें जें प्राप्त होईल तें तें मुकाट्यानें भोगा. ह्मणजे तुह्मी सुखी व्हाल. सुखाचा खरा उपाय हाच आहे. 'हा माझा देह' असें ह्मणतांच प्राणी बद्ध होतो व 'तो माझा नव्हे' असें निःसंशय समजतांच तो मुक्त होतो. हा उपाय बोलण्यास सोपा व ऐकण्यास फार गोड आहे, पण करण्यास अतिशय कठीण आहे. यास्तव, आश्रमरूपी उत्तरोत्तर उत्कृष्ट युक्तींचा आश्रय करावा. असें केल्यास पतित होण्याची भीति नाहीं. अहो आचार्य, आपण ज्ञानी आहांत. माझ्यासारख्या पामरानें आपणांस उपदेश करावा हें योग्य नव्हे. पण मला जें कांहीं ठाऊक आहे तें मीं तुह्मास सांगितलें. यापेक्षां अधिक मला कांहींएक सांगतां येणार नाहीं. शास्त्र व श्रद्धा हीं कल्याणाचीं साधनें व संशय हें नाशाचें साधन आहे असें समजावें. ह्या एका वाक्यांत सर्व धर्मोपदेश आला.

हें जनकाचें भाषण ऐकून शुकाचार्य अत्यंत संतुष्ट झाले. त्यांच्या सर्व संशयांची निवृत्ति झाली व—पित्याच्या आज्ञेप्रमाणें विवाह करून मीही जनकाप्रमाणेंच असंग

रहाणार–असा त्यांनीं निश्चय केला. शुकाचार्यांचें समाधान झाल्यामुळें जनकालाही–आपण गुरूचें एक महत्कृत्य केलें–असें वाटलें. पुढें जनकाच्या आग्रहावरून शुकाचार्य त्या रम्य नगरींत निःस्पृहपणें कांहीं दिवस राहिले व नंतर ते शुभ मुहूर्तावर व्यासाश्रमीं परत येण्याकरितां निघाले.

---

## प्रकरण ७ वें.

### शुकाचार्यांचा गृहस्थाश्रम व शेवट.

कांहीं दिवस मिथिलानगरींत राहून शुकाचार्यांनीं जनकाचा हेतु पुरविला. त्यामुळें त्या उभयतांनाही एकमेकांच्या सहवासाचा लाभ घडला. मिथिलानगरींतले लोकही या महात्म्याच्या दर्शनानें पुनीत झाले; व शुकाचार्यांनीं त्या अवधींत जनकाचें सर्व वर्तन लक्ष्यपूर्वक पाहून ठेविलें. ठरलेल्या सुमुहूर्तावर शुकाचार्य निघाले. त्यांना पोंचविण्याकरितां जनकराजा आपल्या नगरींतील उत्तमोत्तम विद्वानांसह पायानेंच निघाला. शुकाचार्य जनकराजाला परत जाण्याविषयीं पुनः पुनः जरी सांगत होते तरी सासरीं निघालेल्या मुलीची माता जशी परत फिरत नाहीं तसे ते परत फिरेनात. जनकराजाला ह्या महात्म्याचा वियोग अत्यंत असह्य झाला. सर्व मिथिलानगरी ज्यावेळीं

जळली त्यावेळीं जनकानें जेवढा मनाचा कठोरपणा दाखविला होता तेवढाच त्याच्या मनाचा कोंवळेपणा यावेळीं दिसला. हे शुकाचार्य जात नाहींत तर माझे प्राण जात आहेत असें त्यानें पुष्कळ वेळां बोलून दाखविलें. शेवटीं शुकाचार्यांनीं एका झाडाखालीं बसून—राजा, तूं आतां येथून परत जर न जाशील तर मीही येथून हालणार नाहीं—असें सांगितलें. त्यामुळें त्याचा नाइलाज झाला. राजानें शुकाचार्यांचे दोन्हीं हातांनीं पाय धरले व त्यांवर मस्तक ठेवून तो घळघळ अश्रु ढाळूं लागला. " महाराज, आपल्यासारख्यांचें दर्शन फार दुर्लभ ! खरोखर माझें कांहीं महद्भाग्य होतें ह्मणूनच आपले चरण माझ्या मस्तकाला लागले. कृपानिधे, आतां पुनरपि मला हे चरण कशाला दिसणार आहेत ! झालें हेंच त्यांचें शेवटचें दर्शन ! आपल्यासारख्या निस्पृहांना सोडूं नये; हृदयाशीं घट्ट बांधून ठेवावें असें वाटतें. आपल्या नित्य दर्शनानेंही डोळ्यांची तृप्ति होणार नाहीं व मनाला वीट येणार नाहीं. सर्व व्यवहार सोडून आपलीच कृपामूर्ति पहात रहावें असें वाटतें. महाराज, माझ्यावर आपले केवढ उपकार हे ! व्यासांचा पुण्याश्रम कोठें ? व ही माझी अपवित्र नगरी कोठें ? पण आपण संशयाच्या मिषानें मला उद्धरण्याकरितां आलांत ! ठीक आहे. मी आतां परत जातों. पण हे चरण पुनः मला केव्हां दिसतील ? व आजच्यासारखाच मी त्यांना नेत्राश्रूंनीं केव्हां धुवीन? हें

१ हृदयामध्यें असा याचा गुह्यार्थ समजावा.

मला सांगा. ह्मणजे मी परत जातों. अहो विप्रराज, ज्यांचा मला कांहीं उपयोग नाहीं असे माझ्या राज्यांत पुष्कळ देह आहेत. पण त्यांना काय करावयाचें आहे ? असले चरण क्वचित्च दृष्टीं पडतात: असो. मी आतां जातों. माझ्यानें कांहींएक बोलवत नाहीं. माझें मन ह्या वेळीं विक्षिप्त झालें आहे. पण महाराज, मी गृहस्थाश्रमांत असल्यामुळें मला त्याचा प्रत्यवाय नाहीं. यति असून जर माझी अशी स्थिति झाली असती तर मी भ्रष्ट झालों असतों. सारांश, गृहस्थाश्रमांत जरी प्रमाद घडले तरी त्यांचें क्षालन करितां येतें, हें ध्यानांत धरा." ह्याप्रमाणें बोलून, शुकाचार्यांनीं त्याला उठविलें असतां तो उठून उभा राहिला व नंतर एकमेकांना आलिंगन देऊन ते आपापल्या मार्गाला लागले. प्रिय वाचकहो, वियोग हा नेहमीं दुःखद असतो. आपण ज्याच्यावर प्रीति ठेवितों त्याचा वियोग झाला कीं आपण दुःखी होतों. यास्तव, ज्याचा कधींच वियोग होण्यासारखा नसेल अशा पदार्थांवर प्रेम ठेवावें ह्मणजे दुःखाचा प्रसंगच येणार नाहीं. वेदांतशास्त्रांतलें हेंच गुह्य आहे.

असो. ह्याप्रमाणें जनकराजाच्या नगरांतून निघाल्यावर पूर्वीप्रमाणेंच अनेक उत्तमोत्तम तीर्थांचें व महात्म्यांचें दर्शन घेत शुकाचार्य व्यासांच्या आश्रमांत परत आले. आपला प्राणासारखा प्रिय पुत्र येत आहे असें पाहतांच व्यासांना मोठा हर्ष झाला. ते आश्रमांतून उठून बाहेर आले व चरणांवर मस्तक ठेवण्याकरितां खालीं वांकत असं-

लेल्या शुकाला रस्त्यांतच दृढ आलिंगन दिलें व "बाळा, तुझें कल्याण असो." असें ह्मणून "पुत्रा तूं कुशल आहेसना? जीवन्मुक्त जनकाचें तुला दर्शन झालें का? तुझ्या संशयाची निवृत्ति झालीना?" इत्यादि अनेक प्रश्न केले. शुकाचार्यांना मार्ग चालून आल्यामुळें जरी श्रम झाले होते तरी पित्याच्या प्रश्नांचीं त्यांनीं गंभीरपणें व थोडक्यांत उत्तरें दिलीं. व ते उभयतांही पितापुत्र हळू हळू आश्रमांत गेले. त्या दिवशींच्या सर्व नित्य व प्रवासादिकांमुळें अवश्य प्राप्त झालेल्या नैमित्तिक क्रिया आटोपल्यानंतर शुकाचार्य निद्रित झाले. व्यासांनींही सायंसंध्या, होम, जप इत्यादि कृत्यें संपविल्यावर नामस्मरण करीत विश्रांति घेतली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालचीं सर्व नित्यकृत्यें आटोपल्यावर व्यासांनीं शुकाचार्यास विवाहाविषयीं प्रश्न केला.—जनकाप्रमाणें व्यवहारांत राहूनही व्यवहारातीत होतां येत असल्यामुळें व गृहस्थाश्रमामध्यें आश्रमापासून भ्रष्ट होण्याची भीति नसल्यामुळें मी दुसरा आश्रम स्वीकारण्यास तयार आहें—असें शुकाचार्यांनीं सांगितलें. तें ऐकतांच व्यासांना परम संतोष झाला. व त्यांनीं आपल्या कुलाला व पुत्राच्या शीलाला योग्य अशी पितृगणांची कन्या पाहिली. शास्त्रोक्त लक्षणांनीं युक्त, सुस्वरूप, दक्ष व चतुर अशी ती कन्या आहे असें निश्चयपूर्वक समजून येतांच व्यासांनीं तिला शुकांकरितां नेमस्त केलें. शुकाचार्य जरी शहाणे, विद्वान् व स्वतःचें हिताहित जाणण्याइतके प्रौढ होते,

तरी ‘ वधू मलाच पाहिली पाहिजे ’ इत्यादि भलतेच हेतु त्यांनीं प्रदर्शित केले नाहींत. कारण, ते शास्त्रदृष्टि असल्यामुळें— ‘ योग्य कन्या पाहणें ’ हें पित्याचें कर्तव्य आहे व त्यांत त्यांची कधींही चूक होणार नाहीं— असें ते जाणत होते. शिवाय—‘ पिता पुत्राचें अनहित करील’ ही कल्पनाच संभवत नाहीं—अशी त्यांची समजूत होती. असो. वाङ्निश्चय होतांच दोन्ही पक्षांकडील लोक विवाहाच्या तयारीस लागले. व्यासांनीं त्या मंगल कृत्याकरितां ठिकठिकाणच्या मोठमोठ्या ऋषींना पाचारण केलें होतें. अनेक ऋषिपत्न्या व तापसीही तो शुभ समारंभ पाहण्याकरितां तेथें आल्या होत्या. पितृगणांचा मंडप सुशोभित करण्याकरितां सिद्ध, यक्ष व गंधर्व आपआपल्या स्त्रियांसह तेथें आले होते. अनेक वनदेवता व्यासांच्या मंडपांत आपल्या घरचेंच हें कृत्य आहे असें समजून काम करीत होत्या. असो. विवाहाचे दिवशीं व्यासांचे व बृहस्पतींचे अनेक वेदवेत्ते शिष्य सारखे वेदघोष करीत राहिले. व शुभ मुहूर्तावर देव, ब्राह्मण व अग्नि यांच्या समक्ष शुकाचार्यांनीं पीवरी नांवाच्या पितरांच्या कन्येचें पाणिग्रहण केलें. चार दिवस तो समारंभ उत्तम प्रकारें चालला होता. दोन्ही पक्षांकडील लोक संतुष्ट झाले. शुकाचार्यांसारखा अप्रतिम जामात मिळाल्यामुळें पीवरीच्या मातेचा आनंद गगनांत मावेनासा झाला: तिच्या पित्यालाही त्याची विद्वत्ता, निःस्पृहता, त्याच्या

---

१ शास्त्र हीच दृष्टि आहे ज्यांची. ह्मणजे प्रत्येक व्यवहार शास्त्रप्रमाणें करणारे.

ठिकाणचें ब्रह्मवर्चस तेज इत्यादि पाहून समाधान वाटलें. असो. ह्याप्रमाणें सोळा दिवस श्वशुरगृहीं राहून श्रीशुकाचार्य आपल्या आश्रमीं परत आले. शिष्टाचाराप्रमाणें स्नुषेचें मुख पाहून व्यासांनीं तिला आपल्या पित्याकडे पोंचतें केलें व स्वतः पुत्राच्या संसाराकरितां द्रव्य संपादन करूं लागले. सर्व क्षत्रिय राजे व्यासांना पूज्य मानीत होते. त्यामुळें त्यांना थोडक्या काळांत पुष्कळ वित्त मिळवितां आलें. कांहीं कालानें शुकांची भार्या गृहकृत्यास योग्य झाली असतां, तिच्या पित्यानें तिला जामाताच्या स्वाधीन केलें. व यथाशक्ति द्रव्य, गाय, शय्या इत्यादि पदार्थ अर्पण केले. व्यासांनीं पुत्राच्या सोयीकरितां आश्रम वाढविला व शुकाचार्य व स्नुषा यांना आपला उपसर्ग होणार नाहीं, अशा बेतानें त्यांनीं आपली होमशाळा अगदीं पृथक् केली. सारांश,शुकाचार्यांना कोणत्याही प्रकारची चिंता पडूं नये व त्यांना त्यांच्या आश्रमाचेंही उत्तम प्रकारें अनुष्ठान करितां यावें ह्मणून व्यासांनीं सर्व व्यवस्था करून दिली. असे भाग्यवान् पुत्र व्यवहारांत थोडेच आढळतात. ‘ जसें द्यावें तसें घ्यावें ’ असा जो लौकिक न्याय आहे तोच यावरून खरा ठरतो. ज्याला आपणास जगांतील चांगले पदार्थ मिळावे असें वाटत असेल, त्यानें ते स्वशक्तीप्रमाणें दुसऱ्यालाही दिले पाहिजेत. कारण, जें कधीं दिलेलें नाहीं तें कधीं मिळतही नाहीं असा न्याय आहे.

असो. गृहकृत्यास योग्य झालेली पत्नी आश्रमामध्यें

येऊन राहिल्यावर श्रौतस्मार्त अग्नीचें योग्य कालीं हवन व गृहस्थाश्रमाचीं सर्व योग्य कृत्यें करीत शुकाचार्यांनीं जनकाप्रमाणेंच तो आश्रम चालविला. लाभ व अलाभ[1], जय व अपजय[2], सुख व दुःख, शीत व उष्ण यांना सारखें मानून प्राप्त झालेल्या स्थितींत ते मोठ्या आनंदानें राहूं लागले. अग्निहोत्रादि सर्व कृत्यें जरी ते करीत होते तरी त्यांच्या ठिकाणीं त्यांनीं आसक्ति[3] ठेविली नाहीं " जीवंत असेपर्यंत प्राण्याला जसा श्वासोच्छ्वास अवश्य करावा लागतो, त्याप्रमाणें पत्नी असेपर्यंत मला हीं कृत्यें करावयाचीं आहेत. श्वासोच्छ्वासाचें जसें स्वर्गादि फल कधीं कोणी इच्छीत नाहीं, तसेंच मीही या नियत कर्मांचें फल इच्छित नाहीं. श्वासोच्छ्वासाचा जसा अजपाजपाकडे[4] सुज्ञ विनियोग करितात व त्यामुळें अपरिमित सुकृत वाढतें त्याप्रमाणें मी या कृत्यांचा ईश्वरप्रसन्नतेकरितां व्यय करितों; ह्मणजे माझीं सर्व कायिक, वाचिक व मानसिक कृत्यें मी ईश्वरास अर्पण करितों त्याच्या योगानें शास्त्रसिद्धान्ताप्रमाणें चित्तशुद्धि हें परम फल मला मिळेल." अशी भावना ठेवून ते प्रत्येक कृत्य करीत. त्यामुळें त्यांचें शारीरिक व मानसिक सामर्थ्य अतिशय वाढलें. ते अग्नीसारखे किंवा बालसूर्यासारखे देदीप्यमान दिसूं लागले व त्यांचें अंतःकरण सर्वदां आत्मचिंतनांत निमग्न राहूं लागलें. अहोरात्र वेदा-

१ हानि. २ पराजय. ३ प्रीति. ४ कांहीं मंत्र जप न करितांनाच केवळ श्वासोच्छ्वासाच्या ठिकाणच्या भावनेनें घडणारा जप.

ध्ययनावांचून ते कांहींही करीत नसत. वेदाचें अध्ययन व वेदार्थाचें परिशीलन या दोन कृत्यांपुढें त्यांना व्यवहारांतल्या कोणत्याच सुखाचें महत्त्व वाटेना ! त्यामुळें ऐन तारुण्यावस्थेंतही त्यांच्या हातून निषिद्ध आचरण घडलें नाहीं. आपल्या तरुण पत्नीशीं ते यथाशास्त्र व्यवहार करीत, त्यामुळें गृहस्थाश्रमांत राहूनही त्यांचें तेज कमी झालें नाहीं; ते सतत ईश्वराकडे अनुसंधान ठेवीत, त्यामुळें त्यांना संसार विषासारखा वाटला नाहीं; ते प्रतिदिनीं अनेक शिष्यांना पढवीत; त्यामुळें त्यांचें अध्ययन मलिन झालें नाहीं; ते आहार व विहार [1]मित करीत, त्यामुळें ते कधींही रोगी झाले नाहींत व ते नेहमीं सत्य बोलत असल्यामुळें त्यांची वाणी कधींही अन्यथा झाली नाहीं. सारांश, गृहस्थाश्रमामध्यें राहूनही त्यांनीं योगमार्गाला टाकिलें नाहीं. ह्याप्रमाणें जर गृहस्थाश्रम केला तर प्रपंच व परमार्थ भिन्न आहेत असें कोणालाही ह्मणण्याचा प्रसंग येणार नाहीं; इतकेंच नव्हे तर अशा पुरुषांचा गृहस्थाश्रम हा एक अलंकारच होऊन राहील. प्राण्याची नेहमीं अशीच स्थिति असते कीं तो आपला दोष दुसऱ्यावर लादतो व त्यामुळें त्याला " मी चांगला व जग वाईट, मी सद्गुणी व सर्व जग दोषी, मी मोठा व सर्व जग क्षुद्र " इत्यादि वाटूं लागतें.

असो. ह्याप्रमाणें शुकाचार्यांनीं गृहस्थाश्रमाचें उत्तम प्रकारें अनुष्ठान केलें. त्यांची पत्नीही त्यांना अनुरूप

---

१ नियमित, बेताचा.

अशीच होती. पतीच्या शुश्रूषेंत तिनें कधींही अंतर केलें नाहीं. पति हेंच माझें परम दैवत आहे असें ती नित्य समजत असे. पति अत्यंत धार्मिक असल्यामुळें तीही अतिश्रद्धालु व धर्मतत्पर झाली. पहांटेस पतींच्या पूर्वी उठून, नित्यक्रिया आटोपून, झाडसारवण करून, त्यांच्या नित्यक्रियांचें साहित्य तयार करून ठेवून ती त्यांना संतुष्ट करीत असे. पतींच्या संतोषांत माझा संतोष, पतींच्या आरोग्यांत माझें आरोग्य; पतींच्या सुखांत माझें सुख व पतींच्या धर्माचरणांतच माझें धर्माचरण आहे असें ती समजत असे. वेदघोष, शास्त्रांचे प्रगल्भ वाद व शिष्यांचें विविध शास्त्रांचें अध्ययन इत्यादि नित्य ऐकत असल्यामुळें ती बहुश्रुत झाली. पतींच्या संध्यावंदनादि क्रिया; अग्नि-होत्र; देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ व ब्रह्मयज्ञ हे पांच महायज्ञ व त्यांचा नित्य सहवास यांच्या योगानें तिचें चित्त शुद्ध झालें. त्रिकाल गंगास्नान, अजिनाची शय्या, अग्निकुंडांतील भस्माचा संसर्ग व कुश, समिधा, यव इत्यादि स्वभावतःच पवित्र असलेल्या पदार्थांचा स्पर्श यांच्या योगानें तिचें शरीर पवित्र झालें. या जगांत बहुतकरून असा नियमच आहे कीं, सहवासाप्रमाणें प्राणी बनतो. धार्मिक पतीची स्त्री बहुतकरून धार्मिक असते. अथवा तिला पतीकरितां तरी तसें व्हावें लागतें. तसेंच नास्तिक पतीची पत्नी नास्तिक होते; दुर्गुणी पतीची स्त्री दुर्गुणी होते व विषयी पुरुषाची स्त्रीही विषयी होते. व हाच न्याय ज्यांचा अत्यंत सहवास

दुष्कृत्यामुळें व त्यांच्या निष्काळजीपणामुळें शिष्याची मोठी हानि होत असते. विद्यार्थी नास्तिक, कर्तव्यपराङ्मुख, व्यसनी व विषयी जर निपजले तर त्याचा भार सर्वस्वीं गुरूवर असतो. पूर्ण अध्ययन, त्याचेंच परिशीलन व त्याचेंच अध्यापन करणें हें विद्वत्तेचें लक्षण आहे. यास्तव, मरेमरेतों अध्ययन करून ऐहिक इष्ट कार्य झाल्यावर तें टाकणें योग्य नव्हे. विषयांचें शास्त्रोक्त रीतीनें सेवन केल्यास अपमृत्यु येत नाहीं. ब्रह्मचर्य आयुष्य वाढवितें; यास्तव, गृहस्थाश्रमांतही ब्रह्मचर्य पाळावें. त्या आश्रमांत ब्रह्मचर्य कसें पाळतां येतें तें शास्त्रावरून समजून घ्यावें. व्यवहारांत राहूनही ईश्वरोपासनेनें व्यवहारातीत सिद्धि मिळवितां येतात. यास्तव, आळसानें किंवा नास्तिकपणानें ईश्वरसेवेंत कधींही अंतर पडूं देऊं नये. भोजनाप्रमाणेंच आश्रमकृत्यें व ईश्वरसेवा हीं नित्य आहेत असें समजावें. तिसरा आश्रम तपश्चर्येकरितां आहे. तिच्या योगानें शरीराला हळु हळु क्षीण करून टाकलें असतां मन विक्षेपरहित होतें व तें निश्चल होणें हाच परम पुरुषार्थ होय. यास्तव, शुकाचार्यप्रमाणेंच योग्य कालीं सर्व आश्रमकृत्यें पुत्राच्या स्वाधीन करून धन्य गृहस्थानें वनांत जावें. तपश्चर्येच्या योगानें सर्व सिद्धि प्राप्त होतात. त्या प्राप्त होईतों मोठे कष्ट पडतात हें खरें; पण त्यांच्या प्राप्तीसारखें अन्य कोणतेंच भाग्य नसल्यामुळें पुरुषानें त्यांचा अव्हेर करूं नये. वानप्रस्थाश्रम संपूर्ण झाल्यावर सर्वसंगपरित्यागरूप यतिआश्रम स्वीकारावा. हा आश्रम परम सुखानु-

भवाकरितांच आहे. तिसऱ्या आश्रमांत केलेल्या यत्नाचें या आश्रमांत फल मिळत असतें. यत्न कष्टद आणि फल सुखकर असा सिद्धांत आहे. यतिआश्रमाइतका पवित्र आश्रम दुसरा नाहीं. सर्वच द्विजांना याचा लाभ होतो असें नाहीं. पण ज्यांना तो सुदैवानें झाला असेल, त्यांनीं तरी त्याचें शास्त्रोक्त रीतीनें अनुष्ठान करणें उचित होय. अहो, ज्यांना संपत्ति मिळतच नाहीं त्यांची गोष्ट निराळी; पण ज्यांना ती मिळाली आहे त्यांनीं तिचा यथेच्छ उपभोग न घेणें ह्मणजे मूर्खपणा नव्हे का ? असो; सारांश, याप्रमाणें शुकचरित्रापासून आपणास आज बऱ्याच हितकर गोष्टी घेण्यासारख्या आहेत.

निश्चय हा गुण श्रीशुकांच्या ठायीं मूर्तिमंत वसत होता. त्याच्या योगानेंच त्यांनीं जनकासारख्यांनाही चकित केलें. त्यांची वैदिकधर्मावर अत्यंत श्रद्धा होती. ते पुराणांतील आख्यायिकांविषयीं कधीं साशंक होत नसत. कारण, त्यांना त्यांचें रहस्य पूर्णपणें समजत असे. जनकाला पहाण्यापूर्वी त्यांना जी गोष्ट अशक्यशी वाटत होती तीच पुढें प्रत्यक्ष अनुभवानें खरी ठरली. त्यावरून केवळ तर्क शहाण्यालाही कसे फसवितात हें व्यक्त होतें. ते पूर्ण शास्त्रदृष्टि पुरुष असल्यामुळें त्यांनीं केलेला स्त्रीपरिग्रह स्वतःची वासना तृप्त करण्याकरितां नसून केवळ धर्माकरितां होता. या गोष्टीची खरी प्रतीति ते जेव्हां अरण्यांत गेले तेव्हां आली. कृच्छ्रचांद्रायणादि व्रतांच्या योगानें देहाला क्षीण करून टाकण्याची

त्यांना मुळींच भीति वाटली नाहीं. कारण, देह हा विनाशी आहे; त्याला कितीही जरी पुष्ट केलें तरी केव्हांना केव्हां तरी तो क्षीण हा होणारच हें त्यांना ठाऊक होतें. पण देह पुष्ट केल्यास मनही पुष्ट होत असल्यामुळें व तसें होणें अत्यंत हानिकर असल्यामुळें कधीं तरी अवश्य क्षीण होणारें शरीर स्वेच्छेनेंच पण हळुहळु क्षीण करण्यास काय प्रत्यवाय आहे? असा ते स्वतःलाच प्रश्न करीत.– शरीर क्षीण झाल्यानें मनही क्षीण होतें व मन क्षीण झालें असतां परमपुरुषार्थ साधतो–असा शास्त्रसिद्धांत आहे, हें त्यांना माहित होतें. सारांश, या परमपूज्य, वेदान्तप्रवर्तक व्यासपुत्रांनीं साधनभूत अशा तीन आश्रमांचें यथाशास्त्र आचरण करून आपल्या ब्राह्मणजन्माचें सार्थक करून घेतलें. अशाच प्रकारें कोणाही भारतवर्षीय वैदिकाला आपल्या जन्माचें वैदिक धर्मद्वाराच सार्थक करून घेतां येण्यासारखें आहे. यास्तव, प्रत्येक वैदिकाला या अल्प चरित्रापासून बहुत प्रकारें उपदेश मिळून त्याची स्वधर्मावर पूर्ण निष्ठा बसावी व त्यांच्या गुणांचें व आचरणाचें यथाशक्ति अनुकरण करण्याची त्यांना सर्व जगाच्या नियंत्यानें बुद्धि द्यावी अशी मनापासून इच्छा करून हा ईशकृपेनें कसाबसा तडीस गेलेला ग्रंथ मी समाप्त करितों.

१२८.

श्रीकृष्णार्पणमस्तु.